




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ शनिवार २० डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







# चिखलदऱ्यात रेकॉर्ड ब्रेक थंडी!

## तापमान ५ अंशांवर

### आठवडाभर थंडी राहणार कायम



**चिखलदरा/ प्रतिनिधी:** :विदर्भाचे नंदनवन चिखलदरा पर्यटनस्थळावरील पारा घसरलेला आहे. गुरुवारी पहाटे ३ ते ५ दरम्यान ५ अंश सेल्सिअसची नोंद घेण्यात आली. यावर्षी सर्वात कमी ३ अंश सेल्सिअसपर्यंत पारा घसरला होता. तेव्हापासून कायम एक अंकी आकड्यावर विदर्भाच्या नंदनवनाचे तापमान स्थिरावले आहे. परिणामी परिसर गारठला आहे. स्थानिक तसेच पर्यटक उबदार कपड्यांसह शेकोटी पेटवून बचाव करीत आहेत.

आठवडाभर सर्वत्र थंडीची लाट जाणवणार असल्याचे हवामान खात्याने पूर्वीच जाहीर केले आहे. चिखलदरा येथे मागील महिन्याभरापासून तापमानात कमालीची घट आली आहे. कुडकुडत्या थंडीमुळे स्थानिक रहिवासी धास्तावले आहेत. सकाळच्या कोवळ्या व दुपारच्या उन्हातही गार वारे असल्याने अंगात उबदार कपडे सतत घालून राहावे लागत असल्याचे चित्र आहे.

सततच्या थंडीमुळे कोरड्या होणाऱ्या त्वचेमुळे अंगा-पायाला खाज व कोरड्या खोकल्याच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे, असे माजी नगरसेवक अरुण तायडे यांनी सांगितले.

नाताळ सुटी ते थर्टी फर्स्ट दरम्यान मोठ्या संख्येने पर्यटक चिखलदरा पर्यटनला येतात. त्यावेळी उबदार कपडे आणून पर्यटकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

चिखलदऱ्यात तापमानाची एक आकडी नोंद

चिखलदरा पर्यटनस्थळावरील सिपना महाविद्यालयात लावण्यात आलेल्या तापमान केंद्रावर गुरुवारी पहाटे ३ ते ५ च्या सुमारास ५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असल्याचे प्रा. विजय मंगळे यांनी लोकमतशी बोलताना सांगितले. मागील २० दिवसांमध्ये सर्वात कमी ३ अंश सेल्सिअसची नोंद ते ९ अंश सेल्सिअसपर्यंत एकेरी आकड्यांमध्ये मध्यरात्री पहाटेचे तापमान नोंदविले जात आहे.

## हार्दिक-तिलकचं वादळ, वरुणचा कहर

# नरेंद्र मोदी स्टेडियमवर टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेचा फडशा पाडला, मालिका ३-१ ने जिंकली

**अहमदाबाद/ वृत्तसंस्था-** भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाचवा व निर्णायक टी-२० सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगला होता. हार्दिक पांड्या आणि तिलक वर्माच्या वादळी फलंदाजीच्या जोरावर भारताने प्रथम फलंदाजी करताना ५ विकेट्स गमावून तब्बल २३२ धावांचा डोंगर उभारला. या आव्हानाचा पाठलाग करताना वरुण चक्रवर्तीच्या घातक गोलंदाजीसमोर दक्षिण आफ्रिकेने सपशेल शरणागती पत्करली. या विजयासह भारताने पाच सामन्यांची टी-२० मालिका ३-१ ने आपल्या नावावर केली. टी-२० वर्ल्ड कप २०२६ च्या तोंडावर मिळालेला हा मालिका विजय भारतीय संघासाठी आत्मविश्वास वाढवणारा ठरला आहे.

भारताकडून डावाची सुरुवात करणाऱ्या अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांनी आक्रमक सुरुवात करत पहिल्या विकेटसाठी ६३ धावांची भागीदारी रचली. अभिषेक शर्माने २१ चेंडूत ३४ धावा करताना ६ चौकार आणि १ षटकार लगावला, मात्र त्यानंतर तो बाद झाला. यानंतर संजू सॅमसनने चमकदार खेळी करत २२ चेंडूत ३७ धावा केल्या. या खेळीत त्याने ४ चौकार आणि २ षटकार ठोकले. मात्र, कर्णधार



सूर्यकुमार यादव पुन्हा एकदा अपयशी ठरला आणि केवळ ५ धावांवर तंबूत परतला.

हार्दिक – तिलकची वादळी खेळी

यानंतर मैदानावर उतरलेल्या तिलक वर्मा आणि हार्दिक पांड्या यांनी दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांवर अक्षरशः हल्ला चढवला. दोघांनी चौथ्या विकेटसाठी ४४ चेंडूत १०५ धावांची तुफानी भागीदारी केली आणि अर्धशतक झळकावले. हार्दिक पांड्याने २५ चेंडूत ६३ धावा करताना ५ चौकार आणि ५ षटकार लगावले. तर तिलक वर्माने ४२ चेंडूत ७३ धावांची जबरदस्त खेळी साकारली, ज्यात १० चौकार आणि १ षटकाराचा समावेश होता. तो अखेरच्या षटकात रनआउट झाला. शिवम दुबे १० धावांवर नाबाद राहिला. ज्यामुळे प्रथम फलंदाजी करताना भारताने ५ विकेट्स गमावून २३२ धावांचा डोंगर उभा केला. दक्षिण आफ्रिकेकडून कॉर्बिन बॉश याने २ विकेट्स घेतल्या.

भारताने दिलेल्या २३२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला क्विंटन डी कॉकने आक्रमक सुरुवात करून दिली. मात्र त्यांचा सलामीवीर साथीदार रिझा हेंड्रिक्स अपेक्षेप्रमाणे खेळ करू शकला नाही. तो १२ चेंडूंमध्ये १३ ☞(पान २ वर)

# १४५ कोटींच्या ड्रग्स प्रकरणात एकनाथ शिंदेंच्या भावाच्या रिसॉर्टचे नाव

## ठाकरे गटाचे थेट अमित शाहांना पत्र



**सातारा/ वृत्तसंस्था-** जिल्ह्यातील सावरी गावात मुंबई पोलिसांनी टाकलेल्या धाडीत जप्त करण्यात आलेल्या ४५ किलो एमडी ड्रग्स प्रकरणाने आता राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप घडवून आणला आहे. जप्त केलेल्या ड्रग्सची किंमत १४५ कोटी रुपये असून, या प्रकरणाचे धागेदोरे थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कुटुंबापर्यंत जात असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना ठाकरे गटाने केला आहे. या प्रकरणी ठाकरे गटाच्या खासदारांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी या प्रकरणात थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बंधू प्रकाश शिंदे यांच्यावर निशाणा साधला. 'ज्या शेडमध्ये ड्रग्स बनवले जात होते, तिथे काम करणाऱ्या तिघांना प्रकाश शिंदे यांच्या जावळी तालुक्यातील हॉटेल तेज यश मधून जेवण पुरवले जात होते,' असा दावा अंधारे यांनी केला. या आरोपाने पोलीस प्रशासन आणि सत्ताधारी गोटात मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून खासदार अरविंद सावंत, प्रियंका चतुर्वेदी आणि अनिल देसाई यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून काही गंभीर प्रश्न उपस्थित केले. अमली पदार्थ साठवलेल्या शेडपासून तेज यश रिसॉर्टपर्यंत थेट रस्ता का बांधण्यात आला? या मार्गाचा हेतू काय होता? असा सवाल अरविंद सावंत यांनी केला.

हे रिसॉर्ट कोयना धरणाच्या प्रतिबंधित क्षेत्रात असून ते बेकायदेशीर असल्याचा आरोप पत्रात करण्यात☞(पान २ वर)

# SIR मुळे तामिळनाडूत खळबळ, मतदार यादीतून हटवली तब्बल ९८ लाख नावं

**तामिळनाडू /वृत्तसंस्था-** सध्या देशातील काही राज्यांत सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या पुनरीक्षणादरम्यान, तामिळनाडूमधून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. एसआयआरनंतर तयार करण्यात आलेल्या तामिळनाडूमधील मतदार यादीच्या मसुद्यामधून तब्बल ९७ लाख ३७ हजार ८३२ नावं हटववण्यात आली आहेत. तर नव्या मतदार यादीच्या मसुद्यामध्ये ५ कोटी ४३ लाख, ७६ हजार ७५५ मतदारांचा समावेश आहे.

तामिळनाडूच्या मुख्य निवडणूक अधिकारी अर्चना पटनायक यांनी सांगितले की, मतदार याद्यांच्या पुनरीक्षणानंतर तयार करण्यात आलेल्या राज्यातील मतदार याद्यांच्या मसुदा यादीमध्ये ५ कोटी ४३



लाख, ७६ हजार ७५५ मतदारांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये २ कोटी ६६ हजार महिला आणि २ कोटी ७७ लाख पुरुषांचा समावेश आहे. एसआयआर पूर्वी तामिळनाडूमध्ये सुमारे ६ कोटी ४१ लाख नोंदणीकृत मतदार होते. तसेच या प्रक्रियेनंतर त्यापैकी तब्बल ९७ लाख ३७ हजार ८३२ मतदारांची नावं हटववण्यात आली आहेत.

हटववण्यात आलेल्या मतदारांमध्ये तब्बल २६ लाख ९४ हजार मृत मतदारांचा समावेश आहे. तर ६६ लाख ४४ हजार मतदार असे आहेत जे कायमस्वरूपी स्थलांतरीत झालेले आहेत. त्याशिवाय ३ लाख ३९ हजार २७८ दुबार मतदारांची नावंही यादीतून हटवण्यात आली आहेत. या मतदारांची नावं एकापेक्षा अधिक ठिकाणी नोंवललेली दिसून आली, अशी माहिती अर्चना पटनायक यांनी दिली.

अर्चना पटनायक यांनी सांगितले की, ज्या मतदारांना स्थलांतरीत म्हणून चिन्हांकित करण्यात आलं होतं.☞(पान २ वर)

# माणिकराव कोकाटे यांची अटक टळली हायकोर्टाने शिक्षेला दिली स्थगिती

**मुंबई/ प्रतिनिधी :** सदनिका घोटाळा प्रकरणी दोन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आलेले राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि आमदारमाणिकराव कोकाटे यांना आज मुंबई उच्च न्यायालयाने थोडासा दिलासा दिला आहे. माणिकाराव कोकाटे यांना नाशिक सत्र न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेला मुंबई हायकोर्टाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे त्यांच्यावरील अटकेची कारवाई टळली आहे. कोर्टाने १ लाख रुपयांच्या जामिनावर माणिकराव कोकाटे यांची सुटका केली आहे. मात्र



नाशिक न्यायालयातील दोषसिद्धीला कोर्टाने स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे माणिकराव कोकाटे यांच्या आमदारकीवर टांगती तलवार कायम आहे.

अजित पवार गटाचे मंत्री माणिकराव कोकाटे यांना सदनिका घोटाळाप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाने दोषी धरत दोन वर्षांची सक्तमजुरी व दहा हजारांचा दंड, अशी शिक्षा मंगळवारी सुनावली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी बुधवारी न्यायालयाने त्यांना अटक करण्यात यावी, असे वॉरंटही काढले होते. कोर्टाने अटक वॉरंट काढल्यानंतर माणिकराव कोकाटे यांच्यावर अटकेची कारवाई करण्यासाठी पोलीस नाशिकहून रवाना झाले होते. मात्र तत्पूर्वीच प्रकृती अस्वस्थ्याच्या कारणावरून माणिकराव कोकाटे रुग्णालयात दाखल झाले☞(पान २ वर)






# प्राथमिक शिक्षक आता अंगणवाडीतही शिकविणार

## शिक्षण विभागाचे आदेश

**सांगली/ वृत्तसंस्था-:** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांतीलशिक्षकांना आता अंगणवाडीतही शिकवावे लागणार आहे. या शिक्षकांनी आठवड्यातून किमान एक दिवस अंगणवाडीत शिकवावे, अशी शासनाची अपेक्षा आहे.



याबाबतचे पत्र शालेय शिक्षण विभागाने जारी केले आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षक आपल्या शाळेच्या १ किलोमीटर परिघातील अंगणवाडीतील मुलांचा पाया भक्कम करण्यासाठी अंगणवाडी सेविकांना शैक्षणिक गरजांनुसार मार्गदर्शन करतील. पूर्व बालशिक्षण व संगोपन या विषयावर लक्ष केंद्रित करतील. विशेषत: पहिलीच्या वर्गाला शिकविणाऱ्या शिक्षकांवर ही जबाबदारी असेल.

नव्या शैक्षणिक धोरणात अंगणवाडी (पूर्व प्राथमिक) व पहिलीचा वर्ग एका स्तरावर आणण्यात येणार आहे. त्यामुळे अंगणवाडीतील मुलांना प्राथमिक शिक्षणाची ओळख व्हावी, त्यांचा प्राथमिक शिक्षणाचा पाया तयार व्हावा, हादेखील हेतू आहे. यासाठीच प्राथमिक शिक्षकांना आता आठवड्यातील एक दिवस अंगणवाडीसाठी द्यावा लागणार आहे.

अंगणवाडीतील मुलांसाठी पुण्यातील विद्या प्राधिकरणाच्या मदतीने आकार अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणाचे धडे आहेत. हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी अंगणवाडी सेविकांना प्राथमिक शिक्षकांची मदत घ्यावी ☞(पान २ वर)

# भंडारा जिल्ह्यातील १४८ ग्रामपंचायतीच्या निवडणुका लांबणीवर जाण्याची शक्यता

**भंडारा /वृत्तसंस्था-:** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लांबत चाललेल्या निवडणुकांमुळे १५ जानेवारीला ग्रामपंचायतीच्या मुदत संपणाऱ्या निवडणुकाही लांबणीवर पडण्याची चिन्हे आहेत. येत्या १५ जानेवारीला जिल्ह्यातील १४८ ग्रामपंचायतींच्या मुदती संपणार आहेत. त्यांच्या निवडणुका किमान सहा महिने लांबणीवर पडण्याची शक्यता प्रशासकीय पातळीवर व्यक्त होत आहे.

निवडणुका लांबल्याने ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीची शक्यता आहे. येत्या फेब्रुवारी महिन्यात जिल्हाभरात ग्रामपंचायतींची पाच वर्षांची मुदत संपणार आहे. तेथे निर्धारित वेळेत नवे सदस्य निवडून येण्यासाठी डिसेंबर महिन्यातच ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होणे अपेक्षित आहे; पण सध्या राज्यात नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्या आणि महापालिकांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू आहे. या सर्व निवडणुका ३१ जानेवारीअखेर संपविण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. निवडणूक आयोगाच्या दृष्टीने हा कालावधी अपुरा आहे. त्यातच ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे नवे ओझे अंगावर घेण्याची आयोगाची परिस्थिती नाही हे स्पष्ट दिसत आहे. निवडणुका लांबणीवर टाकण्याशिवाय पर्याय उरणार नाही. फेब्रुवारी महिन्यात मुदत संपणाऱ्या बहुतांश ग्रामपंचायती मोठ्या



लोकसंख्येच्या आहेत.

### ...तर ग्रामपंचायतीच्या निवडणुका दिवाळीतच

फेब्रुवारीतील निवडणुका लांबल्यास त्या आगामी किमान सहा ते आठ महिने घेता येणार नाहीत. मार्चपासून शाळा-महाविद्यालयांच्या परीक्षांचा हंगाम सुरू होतो. त्यामुळे निवडणुकीसाठी शाळांतील वर्गखोल्या आणि शिक्षक उपलब्ध होणार नाहीत. जूनपासून पावसाळा सुरू होतो. निवडणुका पावसाळा संपल्यावर म्हणजे दसरा-दिवाळीतच घ्याव्या लागणार आहेत.

### निवडणुका का लांबणार?

ग्रामपंचायतीच्या निवडणुका सहा महिन्यांसाठी लांबणीवर पडण्याची चिन्हे दिसत आहेत, कारण प्रभाग रचना, आरक्षण प्रक्रिया आणि मतदार याद्या पूर्ण होण्यास वेळ लागणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात मुदतवाढ मागितली असून, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित असल्याने ग्रामपंचायतीवरही परिणाम होत आहे.

कायदेशीर तरतुदी

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ नुसार प्रशासकाला सरपंचाचे सर्व अधिकार-कर्तव्य मिळतात, जसे ग्रामसभा अंमलबजावणी व कर्मचारी नियंत्रण. निवडणुका न झाल्यास गावचा रहिवासी व मतदार असलेल्या व्यक्तीला प्रशासक नेमता येईल, ज्यामुळे दैनंदिन कामकाज सुरळीत चालेल.

**विद्यमान सरपंचांना संधी**

निवडणुका लांबल्यास विद्यमान सरपंचांना प्रशासक पदासाठी प्राधान्याने संधी मिळू शकते, ज्यामुळे त्यांचे पद सुरू राहील, अशी शक्यता आहे. मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमणुकीचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे असून, पालकमंत्र्यांच्या सल्ल्याने ही नियुक्ती होईल.

**मुदत संपणाऱ्या तालुकानिहाय ग्रामपंचायती** - भंडारा तालुका - ३५ तुमसर तालुका - १८ मोहाडी तालुका - १७ पवनी तालुका - २७ साकोली तालुका - २० लाखनी तालुका - २० लाखांदूर तालुका - ११




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# स्पर्धा परिक्षेची तयारी करताना अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रीत करा

## सहायक जिल्हाधिकारी आकाश वर्मा

**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्रीय आणि राज्य शासनात सेवेमध्ये रूजू होण्यासाठी स्पर्धा परिक्षा हा मार्ग आहे. यात प्राथमिक चाचणी, मुख्य परिक्षा आणि मुलाखत अशा टप्प्यातून निवड केली जाते. या परिक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रीत करावे, असा सल्ला वाशिम येथील सहायक जिल्हाधिकारी आकाश वर्मा यांनी दिला. जिल्हा नियोजनच्या सभागृहात आज स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सहायक जिल्हाधिकारी आकाश वर्मा आणि उपजिल्हाधिकारी सुनिल टाकळे यांचे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यावेळी सहायक जिल्हाधिकारी कौशल्या एस., सहायक आयुक्त विकास खंदारे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी, ग्रंथालय सहायक



संचालक राजेश पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे आदी उपस्थित होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२४ च्या परिक्षेत २० वा क्रमांक पटकाविलेले आकाश वर्मा यांनी यावेळी मार्गदर्शन केले. वर्मा यांनी, परिक्षा देण्यामागील उद्देश काय आहे, याचा विचार करून ही परिक्षा द्यावी. परिक्षा देण्याची संधी ही प्रत्येकाला असल्याने शासनात काम करण्याची संधी प्राप्त होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षांमुळे देशपातळीवर तसेच देशाबाहेरही सेवेची संधी प्राप्त होते. या परिक्षांची तयारी करीत असताना प्रामुख्याने अभ्यासक्रमावर लक्ष्य केंद्रीत करणे आवश्यक आहे. परिक्षांमध्ये काही प्रश्न हे अत्यंत कठिण असतात. त्यावेळी दिलेल्या पर्यायापैकी कोणते उत्तर योग्य राहिल, याची पडताळणी केल्यास मार्क वाढविण्यास मदत होईल. प्रामुख्याने राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, चालू घडामोडी या विषयांचा प्रामुख्याने अभ्यास करावा.

परिक्षांमध्ये वेळेचा सदुपयोग आणि यश मिळविण्यासाठी चाचणी परिक्षा देणे आवश्यक आहे. यामुळे परिक्षेचा सराव होण्यास मदत मिळते. निबंध लिहिताना दिलेल्या विषयाला न्याय देणे गरजेचे आहे. यासाठी भारतीय संविधान, चालू घडामोडी आणि इतर साहित्याचा उपयोग होऊ शकतो. तसेच मुलाखतीला समोर जाताना समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय देण्याची तयारी केलेली असणे आवश्यक आहे. स्पर्धा परिक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी सातत्य आणि संयम असणे आवश्यक असल्याचे वर्मा यांनी सांगितले. विकास खंदारे यांनी स्पर्धा परिक्षांची कार्यशाळा आयोजनामागील उद्देश सांगितला. स्पर्धा परिक्षांमध्ये यशस्वी झालेल्यांकडून स्थानिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचा लाभ देण्यासाठी हा उपक्रम असल्याचे सांगितले. सारिका काळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले.

# मार्डी मार्गावर अपघातात अज्ञाताचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलजवळ मार्डी मार्गावर एका अज्ञात इसमाचा रस्ता अपघातात मृत्यू झाला.

ही घटना गुरुवारी रात्री समोर आली आहे.मृतकाची अजून पर्यंत ओळख पटलेली नाही. माहितीनुसार गुरुवारी सायंकाळी मार्डी मार्गावर हा अपघात घडला होता.

घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. जेथे डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले.

# पोलिसांच्या सतर्कतेमुळे वाचले तरुणाचे प्राण

**अमरावती/प्रतिनिधीः-** मी ट्रकाखाली उडी मारून आत्महत्या करत आहे, असा व्हिडिओ एका २८ वर्षीय तरुणाने आपल्या कुटुंबीयांना पाठवला. यानंतर घाबरलेल्या कुटुंबीयांनी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी प्रकरणाची गंभीरता पाहून त्याचा मोबाईल ट्रेस केला आणि त्या तरुणाला सुखरूप कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे त्याचे प्राण वाचले. या तरुणाचे नाव शहजाद (वय २८, पाटीपुरा छाया नगर) असे आहे. माहितीनुसार शहजाद विवाहित आहे. त्याची सासुरवाडी बडनेरा मध्ये आहे. त्याला एक मुलगी आहे.

शहजाद लग्नसोळ्यामध्ये जेवण बनवण्याचे काम करतो. पत्नीसोबत पटत नसल्याने त्याची पत्नी आपल्या माहेरी बडनेरा मध्ये मुलीला घेऊन राहते. पत्नीच्या माहेरी राहण्यामुळे तो



त्रस्त होता. शुक्रवारी सकाळी तो अचानक घरून बेपत्ता झाला. कुटुंबीयांनी त्याचा सर्वत्र शोध घेतला पण तो नाही मिळाला. शेवटी त्याच्या बेपत्ता होण्याची तक्रार दाखल करण्यासाठी ते नागपुरी गेट पोलीस ठाण्यात गेले. त्याचवेळी शहजादने त्यांच्या मोबाईलवर मी ट्रकखाली उडी मारून आत्महत्या करत आहे असा व्हिडिओ पाठवला. यामुळे कुटुंबीय आणखीन घाबरले आणि त्यांनी पोलिसांना हा व्हिडिओ दाखवला.

हा व्हिडिओ पाहून पोलिसांनी त्याच्या मोबाईलचे लोकेशन ट्रॅक केले. त्याचे लोकेशन नवसारी ते राजपूत ढाबा परिसरातील रिंग रोड जवळ दाखवले. लोकेशन मिळाल्यानंतर नागपुरी गेट पोलीस आणि त्याचे कुटुंबीय रिंग रोड जवळ पोहोचले. शहजाद तेथे उभा राहून ट्रकच्या खाली उडी मारण्याच्या तयारी मध्ये होता पण पोलिसांनी तिथे पोहोचून समय सूचकता दाखवली आणि शिताफिने त्याला पकडले. समजुत काढत त्याला नागपूर गेट पोलीस ठाण्यात आणले. कायद्यानुसार प्रक्रिया पूर्ण करून त्याला कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले.

# १ व १० वरील उर्वरित

### हार्दिक-तिलकचं वादळ, वरुणचा

धावा करून बाद झाला. यानंतर डी कॉकने जबाबदारी घेत ३५ चेंडूंमध्ये ६६ धावांची शानदार खेळी साकारली, पण मोठी खेळी करण्यात तो अपयशी ठरला आणि बाद झाला. त्यानंतर डेवाल्ड ब्रेविसने १७ चेंडूंमध्ये ३१ धावा करत काहीसा प्रतिकार केला, मात्र तोही पॅव्हेलियनमध्ये परतला.

दक्षिण आफ्रिकेची ढासळलेली फलंदाजी

यानंतर दक्षिण आफ्रिकेची फलंदाजी पूर्णपणे कोलमडली. कर्णधार एडन मार्करम अवघ्या ६ धावा करून माघारी गेला, तर डोनोव्हन फरेराला खातेही उघडता आले नाही. जॉर्ज लिंडेने ८ चेंडूंमध्ये १६ धावा केल्या, मात्र तोही बाद झाला. अनुभवी फलंदाज डेव्हिड मिलर १४ चेंडूंमध्ये १८ धावा करून तंबूत परतला. मार्को यान्सनने ५ चेंडूंमध्ये १४ धावांची झटपट खेळी केली, पण त्यालाही आपली विकेट गमवावी लागली. या अपयशी फलंदाजीमुळे दक्षिण आफ्रिकेचा संघ २० षटकांत आठ गडी बाद २०१ धावाच करू शकला आणि सामना गमावला.

### १४५ कोटींच्या ड्रग्स प्रकरणात

आला आहे. जलसाठ्यापासून ठराविक अंतरात बांधकाम करण्यास मनाई असताना याला परवानगी कोणी दिली? इतक्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांची हालचाल सुरू असताना स्थानिक सातारा पोलिसांना याची माहिती कशी नव्हती? राजकीय दबावामुळे कारवाई टाळण्यात आली का? असाही सवाल पत्रातून विचारण्यात आला आहे.

### एंिं मुळे तामिळनाडूत खळबळ,

त्यामधील ६६ लाख ४४ हजार ८८१ मतदार संपूर्ण राज्यात घरोघरी जाऊन करण्यात आलेल्या पडताळणीच्या तीन टप्प्यांनंतरही आपल्या नोंदणीकृत पत्त्यावर आढळून आले नाहीत.

दरम्यान, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी केलेल्या तीव्र विरोधानंतरही तामिळनाडूमध्ये एसआरआयची प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे. स्टॅलिन यांच्या डीएमके पक्षाने एसआयआरविरोधात सर्वोच्च न्यायालयात एक याचिकादेखील दाखल केली होती. आता एसआयआरवर टीका करताना स्टॅलिन यांनी त्याचा लोकशाहीविरोधी पाऊल असा उल्लेख केला आहे. तसेच निवडणुकीच्या काही महिने आधी मतदार याद्यांचे पुनरीक्षण करण्याचा निर्णय हा मतदारांना हटवण्याचा जाणीवपूर्वक केलेला कट आहे, असा आरोपही स्टॅलिन यांनी केला.

### माणिकराव कोकाटे यांची अटक टळली

होते. तसेच शिक्षेपासून दिलासा मिळावा यासाठी माणिकराव कोकाटे यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

माणिकराव कोकाटे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर आज मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी दोन्ही बाजूंनी जोरदार युक्तिवाद झाला. त्यानंतर मुंबई हायकोर्टाने माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. तसेच कोर्टाने माणिकराव कोकाटे यांना १ लाख रुपयांचा जामीन मंजूर केला आहे. मात्र कोर्टाने माणिकराव कोकाटे यांना दोषमुक्त करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे माणिकराव कोकाटे यांची आमदारकी जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, सदनिका घोटाळ्याप्रकरणी नाशिकच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावणल्यानंतर माणिकराव कोकाटेंकडील क्रीडा व अल्पसंख्याक विकास ही खाती काढून घेण्यात आली होती. त्यानंतर माणिकराव कोकाटे हे बिनखात्याचे मंत्री राहिले होते. अखेरीस गुरुवारी त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोकाटेंचा राजीनामा राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे पाठवल्यानंतर राज्यपालांनी तो स्वीकारून कोकाटे यांना मंत्रिपदावरून मुक्त केले होते.

### प्राथमिक शिक्षक आता

लागेल. त्यामुळेच शालेय शिक्षण विभागाने हे आदेश दिले आहेत.

कार्यक्रमातही सहभागी करून घ्या

जिल्हा परिषदेच्या शाळांतील १५ ऑगस्ट व २६ जानेवारी हे राष्ट्रीय सण, स्नेहसंमेलने, विविध सांस्कृतिक कार्यक्रम यातही अंगणवाडीच्या मुलांना सहभागी करून घ्यायचे आहे. वार्षिक परीक्षा संपल्यावर अंगणवाडीतील मुलांनीही वयोगटानुसार आकार अभ्यासक्रम पूर्ण केल्याची खात्री करुन शिक्षक व अंगणवाडी सेविकांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र मुलांना दिले जाईल. त्यानंतर त्यांना पहिलीच्या वर्गात प्रवेश मिळेल. या माध्यमातून प्राथमिक शाळांची पटसंख्या वाढविण्याचेही शासनाचे प्रयत्न आहेत.

### भंडारा जिल्ह्यातील १४८ ग्रामपंचायतीच्या

सरपंचपदासाठी मोर्चेबांधणी सुरू

दोनच महिन्यांत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीत इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. विशेषतः थेट सरपंचपदावर अनेकांचा डोळा असून पहिल्या टप्प्यात समाजमाध्यमांतून त्यांनी मतदारांवर फासे फेकायला सुरुवात केली आहे.

### भरदिवसा युवकाची निर्घृण

एका आरोपीने मंथनला मॅसेज करून वाळकी रोड वर बोलावले होते. मंथन साडेतीन वाजताच्या दरम्यान विना नंबरप्लेटच्या स्पोर्ट बाईक ने बोरनदी प्रकल्पाच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोहचला आणि काही समजण्याच्या आतच चार जणांनी त्याला घेरून त्याच्या मानेवर,हातावर आणि पोटावर चाकूने वार केले. मंथन रक्ताच्या थारोळ्यात घटनास्थळी पडलेला असतांना रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांनी घटनेची माहिती नांदगाव पेठ पोलिसांना दिली. माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे पोलीस पथकासह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.फॉरेन्सिक टीम देखील घटनास्थळी पोहचली होती. परिसराची नाकाबंदी करून पंचनामा सुरू करण्यात आला. स.पो.आ. कैलास फुंडकर,गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी उपस्थित झाले होते.प्राथमिक माहितीनुसार, मृतक मंथन पाळनकर हा काही दिवसांपूर्वी घडलेल्या यश रोडगे हत्याकांडातील आरोपी असल्याचे समोर आले आहे. याच पार्श्वभूमीवर यश रोडगेच्या हत्येचा बदला घेण्याच्या उद्देशानेच मंथनची हत्या करण्यात आल्याची जोरदार चर्चा परिसरात सुरू होती.

दिवसाढवळ्या झालेल्या या हत्येमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. पोलीस प्रशासनाने हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना केली असून सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती व प्रत्यक्षदर्शींच्या आधारे तपास वेगात सुरू आहे. या थरारक घटनेने नांदगाव पेठ परिसर हादरून गेला असून पुढील तपासातून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**प्रवेशद्वारावर हत्या,धरणावर रासलीला-**बोरनदी प्रकल्पाच्या प्रवेशद्वारावर मंथनची हत्या होऊन परिसरात पोलीस छावणी उभी राहिली असतानाच, धरण परिसरात ४ ते ५ अल्पवयीन जोडप्यांची रासलीला सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत सर्वांना हुसकावून लावून समज दिली. हा परिसर अनैतिक कृत्यांचा अड्डा बनत असून दररोज शेकडो प्रेमीयुगल येथे येतात. यामुळे अनेक अनुचित घटना घडत असल्याचे वास्तव समोर येत आहे. त्यामुळे या परिसरात कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त व कडक कारवाईची गरज व्यक्त होत आहे.

### भरधाव ट्रकची दुचाकीला

यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नांदगावकर, हवालदार मंगेश श्रीराव, वेदेश्वर पिसे यांनी घटनास्थळी धाव घेऊन ट्रकसह चालकाला ताब्यात घेतले.पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे.

### प्रलंबित मागण्यासाठी शेकडो

सचिव यांना चांगलेच धारेवर धरले होते. आठ दिवसाच्या आत हे सर्व प्रलंबित मुद्दे मार्गी न लागल्यास पंचायत समिती कार्यालयावर करो या मरो आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा सुद्धा यावेळी प्रभाकर चौरपगार यांनी प्रशासनाला दिला आहे. मागिल वर्षी ज्या लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर झाले त्यांना ५ ब्रास रेती देण्याचा आदेश असतानाही आजवर एकाही लाभार्थ्याला रेती मिळाली नाही. विशेष म्हणजे रेती तस्कर याच लाभार्थ्यांना रेती विकत आहेत. सामदा ते नांदरून रस्त्याचे खडीकरण मंजूर असताना टाळले जात आहे. गाव तलावातील गाळ काढणे, घरकुल लाभार्थ्यांचे मस्टरचे पैसे तातडीने काढणे आदी मागण्या यावेळी ग्रामस्थांनी मांडल्या. यावर तातडीने मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले. ग्रामस्थांनी केलेल्या सर्व मागण्या अगोदरच मंजूर झाल्या आहेत. या संबंधातील प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयात पाठवण्यात सुद्धा आले आहेत. लवकरात लवकर हे सर्व कामे मार्गी लावण्याचा ग्रामपंचायतीचा प्रयत्न आहे.

-दिनेश टोळे, ग्रामविस्तार अधिकारी

### मनपा निवडणूकीसाठी

पक्षांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

### दर्यापूर पंचायत समितीत

आवास योजना, महिला व बालकल्याण यासारख्या महत्त्वाच्या योजना तसेच घरकुल विभागातील काही कर्मचारी घरकुल लाभार्थी यांच्या कडून मोठ्या प्रमाणात पैशाची मागणी करतात व स्वतःच्या फोन पे वरती सदर रक्कम बोलावल्या जात असल्याचा आरोप काही घरकुल लाभार्थी यांनी केला आहे. विकास कामे वेळेत पूर्ण न झाल्याने शासनाच्या उद्दिष्टावरही प्रश्न निर्माण होत आहे. पंचायत समिती ही ग्रामिण विकासाची कणा मानली जाते मात्र आज हीच संस्था नेतृत्वाच्या अभावामुळे निष्क्रितेकडे झुकताना दिसत आहे. दर्यापूर तालुक्यातील ग्रामिण भागातील नागरिकांनी दर्यापूर पंचायत समिती मध्ये कायमस्वरूपी पूर्णवेळ गटविकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, याबाबत वरिष्ठांना सूचनाही दिल्या आहेत. जोपर्यंत सक्षम अधिकारी मिळत नाही. तोपर्यंत कर्मचारी शिस्त, पारदर्शकता आणि जनतेला न्याय मिळणे अशक्य आहे.जिल्हा प्रशासन व राज्य शासनाने या गंभीर बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन केवळ प्रभारी व्यवस्थेवर चालणारा हा कारभार तात्काळ थांबवावा अन्यथा पंचायत समितीतील ही अवस्था अधिक तीव्र होऊन त्याची मोठ्या प्रमाणात किंमत ग्रामीण जनतेला मोजावी लागेल.

ग्रामिण भागातील जनतेच्या विविध समस्याचे तात्काळ निराकरण करण्यासाठी गटविकास अधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी. रामेश्वर इंगळे, माजी उपसभापती पंचायत समिती, दर्यापूर

### दारू पिऊन शिवीगाळ

मात्र उपचार सुरू असताना रात्री त्यांचा मृत्यू झाला. मृताच्या मुलाने दिलेल्या तक्रारीवरून ब्राह्मणवाडा थडी पोलीस ठाण्याचे ठाणेदार प्रशांत जाधव यांनी तिन्ही आरोपींविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला असून तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुशील धावसे, शिवा आठवले, शेषराव कोकरे व राजू मरसकोल्हे करीत आहेत.

### उपजिल्हा रुग्णालय मोर्शी

देऊन रक्त विकत आणावे लागते. जिल्ह्यामध्ये रक्तदान शिबिरे कमी होत असल्यामुळे रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. अपघात घडल्यास वेळेवर रक्त उपलब्ध होत नसल्यास रुग्णाला प्राणास मुकावे लागते ही गंभीर समस्या लक्षात घेऊन उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदाता संघाचे अध्यक्ष डॉ.प्रदीप कुऱ्हाडे,कार्याध्यक्ष मिलिंद ढोले,सचिव गजानन हिरुळकर, सहसचिव अजय पाटील यांनी या रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.या रक्तदान शिबिरासाठी पोलीस स्टेशन मोर्शी, शहरासह तालुक्यातील सर्व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी,युवा उद्योजक उमेश मंत्री, नवीनकुमार पेठे यांचे सहकार्य लाभले. रक्त संकलनासाठी नागपूर येथील डॉ.हेडगेवार व जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती तसेच उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील चमू उपस्थित होती. त्यामध्ये स्वाता बुरंगे,मंगेश उमक, संगीता गायधने,प्रवीण कळसकर,ज्ञानेश्वरी बोकडे,विशाखा जावरकर,डॉ.वैदवी चौकशे,डॉ संकेत कुगेकर,डॉ.अमित शार, राहुल वानखडे,डॉ. राहुल खराटे,डॉ.प्रफुल्ल पेदाम,मिलिंद तायडे, योगेश पानझाडे,कांचन राऊत यांचा समावेश होता. या रक्तदान शिबिराला शहरातील सर्व डॉक्टर्स मंडळी, अधिकारी,पदाधिकारी, सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते,शहरातील नेते मंडळी,पत्रकार बांधव,व्यापारी, उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रभाग क्र.१० बेनोडा

नगर मधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने सुद्धा उमेदवारी जाहीर करण्यात आली.

अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक -१० बेनोडा -दस्तूर नगर मधून अमरावती महानगरपालिका स्थायी समिती माजी सभापती -अविनाश मार्डीकर व माजी नगरसेवक मंगेश मनोहर यांची उमेदवारी जाहीर झाल्या नंतर आता अर्चना मनीष पाटील यांना उमेदवारी मिळाल्याने या प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची मोठी ताकद वाढली आहे. यावेळी मार्गदर्शन करतांना आ.संजय खोडके यांनी सांगितले कि, समाजविकास व मानवविकास करीत असतांना त्याला राजकारणाची जोड हि महत्वाची आहे. समाजासाठी चांगले काम करण्याची भावना बाळगणाऱ्या व्यक्तींना पक्षात स्थान देऊन संधी दिली जात आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीला मोठी ताकद मिळत असून हे येणाऱ्या परिवर्तनाचे द्योतक आहे.

### सेंट्रल बँक ऑफ

वतीने वृद्धाश्रमासाठी प्रवेशद्वाराची कमान, फूड ट्रॉली आणि सुका मेवा प्रदान करण्यात आला. बँकेतील अधिकाऱ्यांनी आपल्या वैयक्तिक वर्गणीतून किराणा माल, फळे आणि ४ सीलिंग फॅनची भेट देऊन वृद्धाश्रमातील सोयी-सुविधांमध्ये भर घातली. बँकेचा हा सेवायज्ञ केवळ वृद्धाश्रमापुरता मर्यादित न राहता, अमरावती येथील अपंग कल्याण संस्थेलाही १० सीलिंग फॅन भेट देण्यात आले. पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या उद्देशाने बँकेने शहराच्या विविध भागांत ११५व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ११५ वृक्षांची लागवड केली. या सर्व उपक्रमांविषयी बोलताना जिल्हा अग्रणी प्रबंधक नरेश हेडाऊ यांनी ग्वाही दिली की, सेंट्रल बँक ऑफ इंडिया भविष्यातही समाजातील विविध घटकांच्या कल्याणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी सदैव तत्पर राहील. या यशस्वी आयोजनासाठी मुख्य प्रबंधक दीपक दाभोळे, शीतल मेश्राम, राजकुमार तरटे यांच्यासह बँकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रजनी अंबादे यांच्या

अंतर्मुख करणारी आहे . अकोल्याचे कलावंत सतीश पिंपळे यांनी पोर्ट्रेट प्रकारचे लाईव्ह डेमो देताना कमालीचे पोर्ट्रेट तयार केले .पांढरी टोपी,दाढी,व शर्ट असताना पोर्ट्रेट मध्ये अनेक प्रकारचा रंग वापरून चित्र तयार केले आणि उपस्थितांना बारकावे समजावून सांगितले. उद्घाटनप्रसंगी मान्यवर, कलाक्षेत्रातील तज्ज्ञ, कलाकार, तसेच अनेक रसिक प्रेक्षक उपस्थित होते. सर्वांनीच रजनी अंबादे यांच्या कलेचे मनापासून कौतुक करत या प्रदर्शनीला उत्कृष्ट प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ .ए.टी देशमुख, संचालन किशोर इंगळे, व आभार प्रदर्शन डॉ मोहोड यांनी केले. यावेळी अंबादे परिवारातील सदस्य तसेच शिव परिवारातील नागरिक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ही प्रदर्शनी कला रसिकांसाठी एक वेगळा आणि समृद्ध अनुभव ठरत आहे .ही कला प्रदर्शनी सात दिवसासाठी अमरावतीकराकरिता उपलब्ध असून पहिल्यांदाच श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या प्रदर्शनीचा आस्वाद घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### मनपा आयुक्त सौम्या

यांनी सांगितले की, सारंग राऊत यांचे निवासस्थानी तब्बल दोनशे मतदार नोंदणीकृत आढळून आले होते. याबाबत आक्षेप नोंदवला परंतु प्रशासनाने कोणतीही दुरुस्ती न करता नावे कायम ठेवली आहे. पुन्नीबाई शिकारी घर क्रमांक २०२ या एकाच पत्त्यावर सुमारे ४५ मतदार नोंदवले आहे.या मतदारांचा मूळ पत्ता आजही प्रशासनाला सापडलेला नाही. या नोंदी रद्द न करता मतदान कायम ठेवण्यात आले आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमध्ये सत्ताधारी पक्षाचा थेट हस्तक्षेप असल्याचा आरोप काँग्रेस नेत्यांनी केला आहे. महापालिकेतील काही अधिकारी दबावाखाली काम करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. मनपा आयुक्तांनी पारदर्शक निवडणूकीचा केलेला दावा व प्रत्यक्ष मतदार यादीतील गोंधळामुळे पारदर्शक निवडणुकीचा दावा फोल ठरलेला आहे.नवसारी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स ही खेळाची आर्थिक जागा असताना तेथे नियमबाह्य पद्धतीने कमर्शिअल कॉम्प्लेक्स उभारण्यात आले आहे. या प्रकरणाची चौकशी ही शासन स्तरावर सुरू असताना याच जागेवर मतमोजणी केंद्र निश्चित करणे हे नियमबाह्य व आक्षेपार्ह आहे. अमरावती महानगरपालिकेची निवडणूक लोकशाहीची थट्टा आहे. मतदारांची नावे वेगवेगळ्या प्रभागा मध्ये स्थलांतरित झाल्यामुळे प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदारांची मोठी तारांबळ उडण्याची दाट शक्यता आहे. यामुळे कायदा व सुवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकते. आतापर्यंत केलेले आरोप सर्व सिद्ध झाले आहेत, परंतु निवडणूक विभाग याबाबत गप्प असल्याचाही आरोप राठोड आणि जंवजाळ यांनी संयुक्तपणे केला आहे.


**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - २८७६/२०२५
मेघा अधिक एक विरुध्द वत्सलाबाई
पुढील तारीख २०.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1) **Megha Prashant Charthal**, Age 51 yrs., Occu.- Service
2) **Vedant Prashant Charthal**, Age 26 yrs., Occu.- Service
All R/o. Sammati Colony, Shegaon Road, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : 1. **Vatsalabai Rupraoji Charthal,** Age 81 yrs., Occu.- NIL
R/o. Sammati Colony, Shegaon Road, Amravati, Tq. & Dist. Amravati

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत प्रशांत रुपरावजी चारथळ हे दि.१९.१०.२०२५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार मेघा प्रशांत चारथळ अधिक एक विरुध्द वत्सलाबाई रुपरावजी चारथळ** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मेघा प्रशांत चारथळ अधिक एक विरुध्द वत्सलाबाई रुपरावजी चारथळ** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १५.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
शिक्का दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री. एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - २८४०/२०२५
श्री कमल अधिक चार विरुध्द निरंक
पुढील तारीख २०.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1) **Smt. Kamal Prabhakar Shankhe**, Age 78 yrs., Occu.- Housewife
2) **Amar Prabhakar Shankhe**, Age 41 yrs., Occu.- Business
1 & 2 Both R/o.613, Behind Gadge Baba Mandir, Gadge Nagar, Amravati- 444603
3) **Sau. Vaishali Sanjay Wane,** Age 46 yrs., Occu.- Housewife
R/o. Makan No.09. Ward No. 35. Shah Gulal Ka Takiya Rajpura, Burhanpur, M.P. 450331.
4) **Sau. Swati Sunil Wane,** Age 43 yrs., Occu.- Housewife
R/o. Makan No.260/2. Ward No. 35, Shah Gulal Ka Takiya Rajpura, Burhanpur, M.P. 450331.
5) **Sau. Priti Mohan Chitara,** Age 38 yrs., Occu.- Housewife
R/o. Shobharun Plot No.04, Krida Sankul Road, Near I.T.I. Colony, Deshpande Layout, Jay Gajanan Nagar, Buldhana- 443001.

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत प्रभाकर जानकीरामजी शंखे हे दि.२६.०७.२०२३** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार कमल अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा श्रीमती **कमल अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १८.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
शिक्का दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती



**जाहीर सूचना**

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी सौ.वंदना दिलीप मेहरे, वय ६० वर्षे, व्यवसाय-शेती व गृहकार्य, रा.मेहरे निवास, पारस हॉटेल जवळ, नमुना गल्ली क्र.४ अमरावती, ता.जि.अमरावती ४४४६०१ यांचे सामाईक मालकी व ताब्यातील खालील वर्णनाची शेत मालमत्ता विकत घेण्याबाबत इसारचिठ्ठी केली आहे.

**मालमत्तेचे वर्णन** :- नोंदणी पोट तुकडी भातकुली ग्रामीण विभाग कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावतीचे हददीतील ग्रा.पं. असलेले **मौजे-शिवणी बु.** ता.भातकुली, जि. अमरावती येथील **शेत भुमापन व उपविभाग क्र.२६ अंतर्गत एकूण क्षेत्र ४ हे ७६ आर** (पोटखराब ०.०४.००) पैकी, लिहून देणारे यांचे स्वतंत्र मालकी हक्क व ताब्यातील **२ हे ०१ आर,** भोगवटदार वर्ग-१ व आ.रु.१९.३९ पै.असलेली शेतजमीन यातील झाडाझुडपासह व तसेच इतर तदंगभुतवस्तूसह,

**ज्याची चर्तुसिमा :**

पुर्वेस - संजय काळे व बुंदेले यांचे शेत
पश्चिमेस - शिवणी ते उत्तमसरा रस्ता
उत्तरेस - वंदना दिलीप मेहरे यांचे उर्वरित शेत
दक्षिणेस - मनिष बुंदेले यांचे शेत

माझे पक्षकार यांनी सदहू शेत विकत घेणे बाबत इसारचिठ्ठी व करार केलेला असून लवकरच ते त्याची रितसर खरेदी करणार आहेत. तरी सदहू शेतमालमत्तेवर कोणाचे कर्ज, गहाण, बोजा,वारसा हक्क,कुळ, ताबा, दत्तक,वारस, दान, लीज, बक्षीस, करारमदार वा इतर हितसबंध असल्यास ही जाहीर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून खालील पत्यावर लेखी पुराव्यासह **१५ दिवसांचे आंत** संपर्क करावा असे न झाल्यास संबंधित शेत मालमत्तेचे संदर्भात कोणाचेही काही म्हणणे नाही असे समजून रितसर खरेदी प्रक्रिया केली जाईल व तसेच त्यानंतर इतर कोणाचीही कोणतीही उजर अथवा हरकत चालणार नाही, सबब जाहीर नोटिस दिली आहे.

**ॲड.गजेंद्र एस.हिंगणकर**
२० अ, अनुप्रभा, विठ्ठलनगर
शिवाजी मार्ग (अकोली रोड)
साईनगर, अमरावती
संपर्क - ९८२२२६३११०

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, २० डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com




*वाशिम : केंद्र आणि राज्यात भाजप सरकार येताच विकासाला गती मिळाली. वाशिमच्या विकासासाठी विकासाची चारचाकी गाडी नगर पालिकेच्या प्रांगणात उभी आहे. या गाडीत पेट्रोल टाकून गती देण्यासाठी आलो असून शहराच्या विकासासाठी भाजपला साथ देण्याचे आवाहन चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. स्थानिक पोस्ट ऑफीस चौकातील देशमुख ले आऊट मध्ये दि. १९ डिसेंबर रोजी आयोजीत प्रचार सभेत ते बोलत होते.*

## शहराच्या विकासासाठी भाजपला साथ दया

### चंद्रशेखर बावणकुळे यांचे प्रतिपादन, सभेला प्रचंड प्रतिसाद



याप्रसंगी व्यासपिठावर भाजप नेते माजी मंत्री आ.संजय कुटे, आ.श्याम खोडे, माजी मंत्री अनंतराव देशमुख, भाजप निवडणूक प्रमुख राजु पाटील राजे, जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, वाशिम नगराध्यक्षपदाचे उमेदवार अनिल केंदळे, माजी आ. पुरुषोत्तम राजगुरु, शहराध्यक्ष मनीष मंत्री, नकुल देशमुख, जिल्हा सरचिटणीस गणेश खंडाळकर, संगीताताई इंगोले, कविताताई खराट नरेंद्र गोलेच्छा, दौलत हिवराळे, गोपाल राऊत, अनिल ताजणे, नितेश राठी यांच्यासह पालिकेचे सर्व उमेदवार व भाजप पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले की, विरोधी पक्षात राम उरला नसल्याने त्यांची गाडी रिकामी होत आहे. त्यामुळे काँग्रेससह विरोधी पक्षाला सर्व प्रभागात उमेदवार मिळू शकले नाहीत. मात्र,भाजपने सर्व प्रभागासह अध्यक्षपदासाठी देखील चारित्र संपन्न उमेदवार दिले असल्याचे त्यांनी सांगीतले. वाशिम शहरातील रस्ते, पाणी, वीज यासह इतर मुलभूत समस्या सोडविण्यासोबतच शहराला विकासाच्या वाटेवर नेण्यासाठी भाजपला साथ देण्याचे आवाहन याप्रसंगी बावनकुळे यांनी केले. दरम्यान, आ. संजय कुटे यांनी मार्गदर्शन करताना भाजपचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासोबतच सर्व प्रभागातील उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. या सभेला शहरातील हजारोंच्या संख्येत महिला, पुरुषांची उपस्थिती होती.

## प्रधानमंत्री आवास योजनेत उत्कृष्ट काम : सीईओ चौहान

### सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांचा सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेचे काम उत्कृष्ट असल्याचे उद्गार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी काढले.

प्रधानमंत्री आवास योजना टप्पा १ आणि २ तसेच राज्य पुरस्कृत घरकुल योजना अंतर्गत जिल्ह्यातील घरकुलांच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी सीईओ चौहान यांनी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, सहायक प्रकल्प अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता आणि संगणक परिचालक यांची बैठक (१८ रोजी) आयोजित केली होती. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, जिल्हा ग्रामिण विकासचे सहायक प्रकल्प अधिकारी तथा जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक धैर्यशील पाटील यांची उपस्थिती होती. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रलंबित असलेल्या कामांना गती देण्याचे निर्देश तालुकास्तरावर कार्यरत यंत्रणेला दिले तसेच प्रलंबित असलेले घरकुलाचे कामे तात्काळ पूर्ण करण्याची ताकीद दिली.

**घरकुलासाठी जागा उपलब्ध करून द्या:** घरकुलाचा कोणताही लाभार्थी घरापासून वंचित राहू नये याची विशेष दक्षता घेण्याची निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले. ज्या कुटुंबांना घर बांधण्यासाठी स्वतःची जागा नाही त्यांना ग्रामपंचायत मार्फत शासकीय जागा उपलब्ध करून देणे, अतिक्रमण नियमानुकूल करणे, गावातील नातेवाईकांची जागा मिळवून देणे हे पर्याय वापरून घरकुलाकरिता जागा उपलब्ध करून देण्याची निर्देशही यावेळी देण्यात आले.

**सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांचा सत्कार :**



**प्रधानमंत्री आवास योजना, तालुकानिहाय मस्टर (हजेरीपत्रक) उद्दिष्ट आणि साध्य**

| तालुका, | उद्दिष्ट, | साध्य |
|---|---|---|
| कारंजा | ५०४७, | ४४३६ |
| मालेगाव | १४६३०, | ५३४५ |
| मंगरूळपीर | ८३६८, | ५९३८ |
| मानोरा | १३३३५, | ७०६० |
| रिसोड | ११५२६, | ६३५० |
| वाशिम | १०५३६, | ४९३८ |

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत उत्कृष्ट काम करणारे नरेगा चे सहाय्यक प्रकल्प अधिकारी संदीप ज्ञानेश्वर खिल्लारे (जिल्हा परिषद वाशिम) आणि संजय गणेश राऊत (पंचायत समिती, कारंजा) यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ए.पी.ओ. संजय राऊत यांनी कारंजा तालुक्यातील ५०४७ पैकी ४४३६ मस्टर (८८३) काढले आहेत. या कमी त्यांना जिल्हास्तरावर कार्यरत ए.पी.ओ. संदीप खिल्लारे यांची मदत झाली.

प्रधानमंत्री आवास योजनेचे जिल्ह्याचे उद्दिष्ट ६९२१२ असून यापैकी ६४२४३ लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले आणि यापैकी ३४०६७ लाभार्थ्यांचे मस्टर (हजेरीपत्रक) काढण्यात आले आहेत.

## भाजपने मनपा निवडणुकीसाठी रणशिंग फुंकले

### - उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच प्रभागनिहाय घराघरांत संपर्क मोहीम
### - विकासकामांच्या पॅम्पलेटद्वारे मतदारांना थेट संवादाचा प्रयत्न

■ विशेष प्रतिनिधी ■

**अकोला : आगामी अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने इतर राजकीय पक्षांच्या तुलनेत एक पाऊल पुढे टाकत निवडणूक रणधुमाळीला जोरदार सुरुवात केली आहे. उमेदवारी अधिकृत जाहीर होण्यापूर्वीच भाजपच्या संभाव्य उमेदवारांनी प्रभागनिहाय संघटितपणे थेट मतदारांच्या दारात जाऊन संपर्क साधण्यास सुरुवात केली असून, या 'प्रभागफेरी' मोहिमेला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.**



राज्य निवडणूक आयोगाने नुकतीच महानगरपालिकांच्या निवडणुकीची घोषणा केल्यानंतर सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले असताना, अकोल्यात मात्र भाजपने नियोजनबद्ध आणि आक्रमक पद्धतीने निवडणूक प्रक्रियेत आघाडी घेतल्याचे चित्र आहे. इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवणे, त्यांची मुलाखत प्रक्रिया पूर्ण करणे यानंतर आता पक्षाने सर्व संभाव्य उमेदवारांना प्रभागातील मतदारांशी थेट संवाद साधण्याचे निर्देश दिले आहेत.

त्याच अनुषंगाने भाजपचे सर्व संभाव्य उमेदवार एकजुटीने मैदानात उतरले असून, कोणताही अंतर्गत मतभेद न दाखवता संघटनात्मक ताकद दाखवण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रभागफेरी दरम्यान उमेदवार मतदारांच्या घरोघरी भेटी देत स्वतःचा परिचय करून देत आहेत. त्याचबरोबर भाजपच्या कार्यकाळात संबंधित प्रभागात राबविण्यात आलेल्या विकासकामांची माहिती देणारे आकर्षक पॅम्पलेट वाटप करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, भाजपने निवडणूक प्रचारात वैयक्तिक आश्वासनांपेक्षा विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवत मतदारांना पटवून देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, ड्रेनेज, स्ट्रीट लाईट, नागरी सुविधा आदी विकासकामांचा थेट लेखाजोखा मतदारांसमोर मांडण्यात येत असल्याने अनेक ठिकाणी नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

प्रभाग क्रमांक १२ मध्ये भाजपच्या संभाव्य उमेदवारांनी विशेष मेहनत घेत संपूर्ण प्रभाग अक्षरशः पिंजून काढला असून, बहुतांश मतदारांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचा दावा भाजप कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. काही नागरिकांनी थेट प्रश्न विचारत विकासकामांबाबत जाबही विचारला असून, त्यावर उमेदवारांनी खुल्या मनाने संवाद साधल्याचे चित्र दिसून आले. यामध्ये माजी नगरसेवक अजय शर्मा, संजय गोटफोडे, जानवी डोंगरे, विजय शिरसाट, नितेश पाली, चंदा ठाकूर, रविता शर्मा, ॲड. कल्पना गोटफोडे, निशा कडी, नीता बागडे, दीपिका ठाकूर, पल्लवी नगरे, शीतल रुपारेल, चंद्रकांत रुपारेल, कृष्णा पांडे, संतोष पांडे, महेश गोंधळेकर, सुगत गवई, प्रमोद गवई यांचा समावेश आहे.

भाजपच्या या आगळ्या-वेगळ्या आणि एकत्रित प्रचार पद्धतीमुळे इतर पक्षांवर देखील दबाव वाढला असून, आगामी काळात निवडणूक प्रचार अधिकच रंगणार असल्याचे संकेत मिळत आहेत. उमेदवारी जाहीर होण्याआधीच जमिनीवर उतरून मतदारांशी नाते जोडण्याची भाजपची रणनीती आगामी निवडणुकीत कितपत यशस्वी ठरते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## 'मतदानासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज'
## दिव्यांग मतदारांसाठी विशेष सुविधा



**वाशिम :** वाशिम नगरपरिषदसाठी आणि रिसोड, प्रभाग ५ ब आणि प्रभाग १० अ निवडणुकीसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार असून जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली असून यंत्रणा सज्ज झाली आहे.

मतदान प्रक्रिया सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत पार पडणार असून मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, स्वयंसेवकांची मदत, शौचालये तसेच दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअर आणि रॅम्प उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू असून पाच व्यक्तींपेक्षा अधिक जमावास मनाई करण्यात आली आहे.

मतदारांना मतदान केंद्राची माहिती प्ूेः//सैंपिम्दीत्ूे.गह या संकेतस्थळावर नाव किंवा इंॅ्य क्रमांकाद्वारे मिळू शकते तसेच 'मताधिकार' या ॲपमध्येही माहिती उपलब्ध आहे. निवडणूक कामकाजासाठी वाशिम ३९ आणि रिसोड २१ शासकीय व खाजगी वाहने अधिग्रहित करण्यात आलेली आहेत.

**'वोटर आयडी' सह १२ पुरावे ग्राह्य :** मतदानासाठी पासपोर्ट, आधारकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, सरकारी ओळखपत्र, बँक पासबुक, दिव्यांगत्व प्रमाणपत्र, मनरेगा जॉब कार्ड, पेन्शन कार्ड, खासदार-आमदार ओळखपत्र, स्वातंत्र्यसैनिक ओळखपत्र आणि विमा कार्ड इत्यादी ओळखपत्रे ग्राह्य धरली जातील. नगरपरिषद निवडणुकीत बहुसदस्यीय पद्धत लागू असून एका मतदाराने एकूण तीन मते देणे अपेक्षित आहे.

## कष्टाळू प्रशांत लांडकर झाला सैन्य दलात दाखल!



■ प्रतिनिधी | वाशिम ■

मालेगाव तालुक्यातील बोरगाव येथील प्रशांत रामदास लांडकर यांची भारतीय सैन्य दलात तांत्रिक (टेक्निकल ) पदावर नियुक्ती झाली आहे. या पदावर पोहोचण्यासाठी त्यांनी घेतलेल्या परिश्रमाला फळ आले आहे.

बोरगाव येथील अल्पभूधारक शेतकरी रामदास लांडकर हे अतिशय कष्टाळू म्हणून ओळखले जातात. त्यांचा मुलगा प्रशांत हा त्यांना शेती कामात मदत करतो. हे कुटुंब एवढे कष्टाळू आहे की शेतातील कामासोबत इतके दिवस शेतकरी रामदास लांडकर यांनी प्रवासी ऑटो चालवला. त्यांचा मुलगा प्रशांत यांनी गावात डबल रोट्या विकल्या. शेतातील सर्व कामे करून, अभ्यास करून मैदानावर घाम गाळून नंतर त्याने हे यश प्राप्त केलेले आहे . मेहनतीने, शिस्तीने आणि जिद्दीने आज हे यश मिळवले आहे. प्रशांतला त्याचे काका बाबाराव लांडकर यांचे मार्गदर्शन मिळाले. बोरगाव परिसरातील आणि वाशिम जिल्ह्यातील युवकांकरिता त्याची ही कामगिरी प्रेरणादायी ठरली आहे. देश सेवेच्या मार्गावर पाऊल टाकल्याबद्दल प्रशांत रामदास लांडकर यांचे परिसरात कौतुक होत आहे.

## अल्ट्रा हाय डेन्सिटी केसर आंबा लागवडीतून उत्पादनवाढीचा नवा मार्ग

### करडा येथील प्रगत बागेची पाहणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून कमी क्षेत्रात अधिक उत्पादन मिळविण्याच्या दृष्टीने अल्ट्रा हाय डेन्सिटी प्लांटिंग (UHDP) पद्धतीने केसर आंबा लागवड ही एक आशादायक संकल्पना ठरत आहे.

याच अनुषंगाने कृषी विज्ञान केंद्र, वाशिम (KVK-Washim) यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली करडा (ता. रिसोड, जि. वाशिम) येथील प्रगत शेतकरी गोविंद देशमुख यांच्या केसर आंबा बागेची अलीकडेच सविस्तर पाहणी कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञान द्वारे करण्यात आली. सदर आंबा बाग १.१० एकर क्षेत्रावर विकसित करण्यात आलेली असून १४ × ५ फूट अंतरावर एकूण ७०० केसर आंबा रोपांची अल्ट्रा हाय डेन्सिटी पद्धतीने लागवड करण्यात आली आहे. या पद्धतीत योग्य रोप



अंतर, नियोजित छाटणी (कॅनोपी व्यवस्थापन), संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन व सूक्ष्म सिंचनाचा प्रभावी वापर करण्यात येतो. सध्या बागेतील सर्व झाडे सुदृढ अवस्थेत असून एकसमान व भरघोस फुलोऱ्यात असल्याचे निदर्शनास आले. यावरून शास्त्रीय पद्धतीने केलेले कॅनोपी व्यवस्थापन व पोषण नियोजन अत्यंत यशस्वी ठरत असल्याचे स्पष्ट होते.

सध्याची पीक अवस्था, फुलोऱ्याची तीव्रता व फळधारणा लक्षात घेता येत्या हंगामात या बागेतून सुमारे ४ टन केसर आंबा उत्पादन अपेक्षित आहे. कमी क्षेत्रातून तुलनेने अधिक व दर्जेदार उत्पादन मिळाल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होणार आहे.(कृषी विज्ञान केंद्र वाशिमच्या सातत्यपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण व प्रत्यक्ष शेतस्तरीय मार्गदर्शनामुळे आतापर्यंत जिल्ह्यातील एकूण ११ शेतकऱ्यांनी अल्ट्रा हाय डेन्सिटी केसर आंबा लागवड तंत्रज्ञानाचा यशस्वी अवलंब केला आहे. या शेतकऱ्यांच्या अनुभवातून ही पद्धत उत्पादनक्षमता, दर्जा व आर्थिक लाभ या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे दिसून येत आहे. या पाहणी कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्रातील वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर.एल. काळे व त्यांचे सहकारी डॉ. डी. एन. इंगोले, श्री. एन. बी. पाटील, मयूर देशमुख, थोरात (कृषी महाविद्यालयाचे कर्मचारी) उपस्थित होते. यावेळी वैज्ञानिक बाग व्यवस्थापन, कॅनोपी व छाटणी तंत्र, फुलोरा नियमन, अन्नद्रव्य व पाणी व्यवस्थापन, तसेच UHDP आंबा लागवडीची आर्थिक व्यवहार्यता व जिल्ह्यातील व्यापक प्रसाराच्या शक्यता यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. अल्ट्रा हाय डेन्सिटी केसर आंबा लागवड तंत्रज्ञानामुळे पारंपरिक पद्धतीपेक्षा लवकर उत्पादन, अधिक घनता, सुलभ व्यवस्थापन व जास्त आर्थिक परतावा मिळत असून, येत्या काळात वाशिम जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही पद्धत एक प्रभावी व शाश्वत पर्याय ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

जा.क्र. :- ३३८१ / जीपवा / बांध / तांत्रिक / २०२५
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वाशिम
दिनांक :- १८/१२/२०२५

## - दरपत्रक सूचना -

कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद वाशिम, यांच्या आधिपत्याखालील जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत विविध ठिकाणी सोलर हाय मास्ट / सोलर स्ट्रीट लाईट पुरवठा करणे व बसविण्यासाठी विद्युत कंत्राटदार / पुरवठादार यांचेकडून दर पत्रक मागवणे आहे.

करिता विद्युत कंत्राटदार / पुरवठादार यांचेकडून बंद लिफाफा मध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहेत. खालील कामाकरिता बंद लिफाफा दिनांक - २६/१२/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जिल्हा परिषद वाशिम आवक जावक विभागात मागवीत आहे.

1) Providing, Erecting & Testing of All In One Integrarted Solar Device 12V 40W led luminaries IP 66 Grade. LifePo4 battery with capacity of 12.8V-30Ah. min. 125 Wp. 12v SPV modules, mounted on MS Decorative Pole with 8 mtr height along with brackets, foundation, and necessary accessories light arm. Panel Stand, waterproof inbuild light Luminary battery box, timer setting arrangement Auto Dimming Mode. Powder coated module structure for Sv Panel & Cuvred Designer arm for Light, with first 6 hr. full intensity light output and following 6 hr. with half intensity light output along with solar power supply charging facility complete With earthing protection & Power Factor Protector.

**QTY 01 NO**

2) Providing, Erecting & Testing of All In One Integrarted Solar Device 12V 30W led luminaries IP 66 Grade. LifePo4 battery with capacity of 12.8V-36Ah. min. 125 Wp. 12v SPV modules, mounted on octagonal Galvnised Pole with bottom of 130 mm A/F. top 70 mm A/F 6 mtr height along with brackets, foundation, and necessary accessories light arm. Panel Stand, waterproof inbuild light Luminary battery box, timer setting arrangement Auto Dimming Mode. Powder coated module structure for Sv Panel & Galvnised Cuvred Designer arm for Light, with first 6 hr. full intensity light output and following 6 hr. with half intensity light output along with solar power supply charging facility complete With earthing protection, above housing of Pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete, Power Factor Protector. QTY 01 NO

**QTY 01 NO**

3) Supplying, Installing, Testing And Commissioning Solar LED Mini Hi Mast 20 W X 5 Nos. LED Luminaries, 150 AH 12 V Lithium Battery, Min. 400 Wp SPV Modules, Mounted On GI Octagonal Pole With Bottom Of 130 Mm A/F, Top 70 Mm A/F 6 Mtr Height Along With Brackets, Foundation, Earthling And Necessary Accessories, Waterproof Battery Box, Suitable Solar Inverter, Timer Setting Arrangement, GI/Powder Coated Module Structure, With First 6 Hr. Full Intensity Light Output And Following 6 Hr. With Half Intensity Light Output Along With Solar Supply Charging Facility Complete.

**QTY 01 NO**

4) Providing, Erecting & Testing of All in One Integrarted Solar Device 12V 30W x 4 Nos led luminaries IP 66 Grade. LifePo4 battery with capacity of 12.8V-36Ah x 4Nos., min. 120Wp. 12v SPV modules. mounted on octagonal Galvnised Pole with bottom of 200 mm A/F, top 100 mm A/F 7 mtr height along with J Bol M24x 750mm brackets, Reinforced cement concrete foundation by considering the safe soil bearing capacity at site as 10 T/sq.m at 1.5m depth including supply of stee concrete, excavation and fixing provided nut bolts with the help of template, as per design complete and necessary accessories light arm, Panel Stand, Waterproof inbuild light Luminary battery box, timer setting arrangement Auto Dimming Mode, Gi/Powder coated module structure, with first 6 hr. full intensity light output and following 6 hr. with half intensity light output along with solar power supply charging facility complete. With earthing protection, above bousing of Pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete, Power Factor Protector.

**QTY 01 NO**

5) Providing, Erecting & Testing of All In One Integrarted Solar Device lamp 12V 50W x 4 Nos. led luminaries IP 66 Grade, LifePo4 battery with capacity of 12.8V-72Ah x 4 Nos., min. 170Wp. 12v SPV modules, mounted on octagonal Manualpully Gaivnised Pole with bottom of 360mm A/F. top 150mm A/F 9mtr height along with J Bolt M24x 900mm, brackets. Reinforced cement concrete foundation by considering the safe soil bearing capacity at site as 10 T/sq.m at 1.5m depth including supply of steel, concrete, excavation and fixing provided nut bolts with the help of template, as per design complete and necessary accessories light arm, Panel Stand, Waterproof inbuild light Luminary battery box, timer setting arrangement Auto Dimming Mode, GI/ Powder coated module structure, with first 6 hr. full intensity light output and following 6 hr. with half intensity light output along with solar power supply charging facility complete, With earthing protection, above housing of Pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete, Power Factor Protector.

**QTY 01 NO**

अटी व शर्ती - वरील कामाबाबतचे दरपत्रक दि. २६ /१२/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जिल्हा परिषद वाशिम आवक जावक विभागात सादर करता येतील. शक्य झाल्यास दरपत्रके दिनांक २६/१२/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता उपस्थित कंत्राटदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात येतील. बंद लिफाफ्यात पुरवठा दार यांनी दरपत्रक, जी. एस. टी. प्रमाणपत्र जोडावे. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद वाशिम यांनी राखून ठेवला आहे. वरील कामासंमधी इतर शर्ती व अटी कार्यालयीन वेळेत जिल्हा परिषद वाशिम बांधकाम विभागात पहावयास मिळतील.

**कार्यकारी अभियंता,**
जिल्हा परिषद वाशिम

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २५ ■ शनिवार, २० डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


# देवळी-वर्धा-हिंगणघाट नगरपालिकांमध्ये आज मतदान

## -४७ केंद्रांवरून ४२,६४४ नागरिकांचे मतदान, पोलिसांचा तगडा बंदोबस्त

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील नगरपालिकांच्या निवडणुकीसाठी आज मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावण्यास सुरुवात केली आहे. देवळी नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासह २० नगरसेवक, हिंगणघाट, वर्धा व पुलगाव येथील सदस्य पदांसाठी ४७ मतदान केंद्रांवरून ४२,६४४ मतदारांना मतदानाची संधी मिळणार आहे. प्रशासनाने पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवत सुरक्षित मतदानाची तयारी पूर्ण केली आहे.



शुक्रवार, १९ डिसेंबर रोजी ईव्हीएम व निवडणुकीसाठी आवश्यक साहित्य पोलिंग पार्ट्यांमार्फत सर्व केंद्रांवर पोहोचले. मतदान केंद्रांवर पोलिसांची उपस्थिती, पोलिंग पार्ट्यांची तयारी आणि सुरक्षा यंत्रणेची कडक तपासणी झाली असून कोणत्याही प्रकारच्या अनुचित घडामोडी होऊ नयेत, यासाठी प्रशासन सतर्क आहे.

**मतदान केंद्रांचे वितरण**

वर्धा – प्रभाग ९ 'ब', १९ 'ब' : १० केंद्र, हिंगणघाट – प्रभाग ५ 'अ', ५ 'ब', ९ 'अ' : ११ केंद्र, पुलगाव – प्रभाग २ 'अ', ५ 'अ' : ६ केंद्र, देवळी – नगराध्यक्ष व २० नगरसेवक पदासाठी : २० केंद्र

उमेदवारांनी प्रचाराच्या अधिकृत मुदतीनंतर घराघरांत भेट देत छुप्या प्रचारावर भर दिला, पण मतदारांचा उत्साह उंचावर आहे. वर्धा, देवळी आणि हिंगणघाट येथील नगरपालिकांच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले असून, मतदारांनी बहुमताचा कौल कुणाला दिला, हे उद्या २१ डिसेंबर रोजी स्पष्ट होणार आहे.

**मतमोजणीची तयारी**

रविवार, २१ डिसेंबर रोजी वर्धा, हिंगणघाट, आर्वी, पुलगाव, देवळी व सिंदी रेल्वे येथे मतमोजणी होणार आहे.

वर्धा – ८६ कर्मचारी<br>
हिंगणघाट – ११६ कर्मचारी<br>
आर्वी – ४२ कर्मचारी<br>
पुलगाव – ३२ कर्मचारी<br>
देवळी – १४ कर्मचारी<br>
सिंदी रेल्वे – २५ कर्मचारी

मतमोजणी केंद्र परिसरात कोणताही अनुचित प्रकार होऊ नये, म्हणून पोलिसांचा कडक तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**मतदारांची स्थिती**

वर्धा – पुरुष ४,८०१ : महिला ५,१२८ । एकूण ९,९२९, हिंगणघाट – पुरुष ५,३३० : महिला ५,३०८ । एकूण १०,६३८, पुलगाव – पुरुष २,७९६ : महिला २,८२३ । एकूण ५,६१९, देवळी – पुरुष ८,१६७ : महिला ८,२९१ । एकूण १६,४५८

**ठळक मुद्दे**

मतदानाच्या दिवशी शांतता राखण्यासाठी प्रत्येक केंद्रावर पोलिस तैनात

मतदान केंद्रांवर ईव्हीएम व साहित्य पूर्ण तयारीसह पोहोचले

मतदानानंतर २१ डिसेंबरला मतमोजणी होईल आणि बहुमताचा कौल स्पष्ट होईल

वर्धा जिल्ह्यातील ही निवडणूक स्थानिक राजकारणाचा निर्णायक टप्पा असून, मतदारांचा उत्साह शिखरावर आहे. प्रशासन, पोलिस व पोलिंग कर्मचारी सज्ज असून निर्भय व सुरक्षित मतदान सुनिश्चित करण्यासाठी तत्पर आहेत.

# बनावट कागदपत्रांचा खेळ उघड, तरीही ठेकेदार मोकाट!

## -शासकीय कागदपत्रांवर हात साफ... कामगार कल्याण मंडळाची दिशाभूल

**-रामनगर ठाण्यात तक्रार दाखल होऊनही ३८ दिवस कारवाई शून्य**
**-ठेकेदाराला वरदहस्त कुणाचा? पोलिस तपासावर संशयाची छाया**



**वर्धा जनमाध्यम :** शासकीय कागदपत्रांची उघडपणे छेडछाड करून गवंडी कामगारांना नियमबाह्य ९० दिवसांच्या कामाचे बनावट प्रमाणपत्र देण्याचा गंभीर प्रकार उघडकीस येऊनही संबंधित ठेकेदारावर अद्याप गुन्हा दाखल न झाल्याने संपूर्ण यंत्रणाच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. शासकीय कामगार अधिकारी (जीएलओ) कार्यालयाने अपर कामगार आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली रामनगर पोलिस ठाण्यात फौजदारी तक्रार दाखल केली असतानाही तब्बल एक महिना आठ दिवस उलटूनही तपास थंड बस्त्यात असल्याने, कायद्याचा धाक नेमका कुणासाठी? असा आक्रमक प्रश्न उपस्थित झाला आहे.

प्राप्त माहितीनुसार, ठेकेदार मोहन रामाजी ब्राह्मणकर याच्या नावाने नोंदणी क्रमांक २१५३००२३१०००९४०२ असलेले प्रमाणपत्र १८ फेब्रुवारी २०२५ रोजी अपर कामगार आयुक्त कार्यालय, नागपूरकडून निर्गमित झाल्याचे भासवण्यात आले. या प्रमाणपत्रावर एम. पी. लोहिया, अडिशनल कमिशनर ऑफ लेबर असे नाव वापरण्यात आले. मात्र वर्धा येथील कामगार अधिकारी कार्यालयाने केलेल्या पडताळणीत हे प्रमाणपत्र पूर्णतः बनावट असल्याचे स्पष्ट झाले.

**सरकारी शिक्क्यावर हात साफ**

चौकशीत धक्कादायक बाब समोर आली ती म्हणजे या प्रमाणपत्रात खोटे नाव, चुकीचे पद, तसेच शासकीय शिक्क्यांची छेडछाड करण्यात आली होती. हा बनावट दस्तऐवज वापरून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात कामगारांची नोंदणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. म्हणजेच कंत्राटदाराने थेट शासन यंत्रणा आणि कामगार कल्याणकारी मंडळाची दिशाभूल करण्याचा गंभीर गुन्हा केल्याचा आरोप आहे.

**तक्रार दाखलष्ठ पण गुन्हा कुठे?**

या संपूर्ण प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन शासकीय कामगार अधिकारी कार्यालयाने ११ नोव्हेंबर २०२५ रोजी रामनगर पोलिस ठाण्यात आवश्यक कागदपत्रे व पुरावे जोडून तक्रार दाखल केली. तरीही आजतागायत संबंधित ठेकेदाराविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आलेला नाही. त्यामुळे चौकशीचा फार्स करून दोषींना अभय दिले जात आहे का? असा संशय बळावत आहे.

कामगारांच्या हक्कांवर घाला घालणाऱ्या आणि सरकारी कागदपत्रांची बनवाबनवी करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यास होत असलेला विलंब हा केवळ निष्काळजीपणा नसून, कुणाच्या तरी दबावाखाली तपास रेंगाळतोय का? असा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे.

संबंधित प्रकरण सध्या चौकशीत आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर कायद्यानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल. अशी प्रतिक्रिया रामनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजय भुसारी यांनी दिली.

### महामार्गावर वेगाचा कहर

# अज्ञात वाहनाने बिबट्यास चिरडले

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** राष्ट्रीय महामार्गावर भरधाव वेगाचा जीवघेणा फटका पुन्हा एकदा समोर आला. रस्ता ओलांडत असलेल्या बिबट्याला अज्ञात वाहनाने चिरडून ठार केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (दि. १८) रात्री सुमारे ८.३० वाजताच्या सुमारास कारंजा टोल प्लाझा नजीकच्या बोरगाव फाटा परिसरात घडली. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून महामार्गावरील वन्यजीव सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



घटनेनंतर काही वेळातच या मार्गाने जाणाऱ्या वाहनचालकांच्या लक्षात रस्त्यावर पडलेला बिबट आला. नागरिकांनी तत्काळ प्रादेशिक वनविभागाला माहिती दिली. माहिती मिळताच कारंजा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी सावंत यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृत बिबट्याचा मृतदेह ताब्यात घेतला.

शवविच्छेदनासाठी पशुवैद्यकीय तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. शुक्रवारी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मेघा अनकर, डॉ. दिक्षा पाटील आणि डॉ. मयूर थूल यांनी मृत बिबट्याचे शवविच्छेदन (पीएम) केले. प्राथमिक अहवालानुसार वाहनाच्या जोरदार धडकेमुळे बिबट्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

यानंतर सहाय्यक वनसंरक्षक सरोदे आणि कारंजा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत मृतदेहाची नियमानुसार जाळून विल्हेवाट लावण्यात आली. या घटनेची अधिकृत नोंद प्रादेशिक वनविभागाकडून घेण्यात आली आहे.

दरम्यान, राष्ट्रीय महामार्गालगत घनदाट वनक्षेत्र असल्याने या मार्गावर वन्यप्राणी वारंवार रस्ता ओलांडतात. मात्र, महामार्गावरील वेगमर्यादांकडे होणारे दुर्लक्ष, अपुऱ्या सूचना फलकांमुळे आणि वाहनचालकांच्या बेफिकीरपणामुळे अशा घटना सातत्याने घडत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. वन्यजीव संरक्षणासाठी संवेदनशील पट्ट्यांमध्ये वेगमर्यादा काटेकोरपणे अंमलात आणणे, ठळक सूचना फलक लावणे आणि रात्रीच्या वेळी विशेष खबरदारी घेणे आवश्यक असल्याची मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे.

### हिंगणघाट गांजाच्या विळख्यात

# स्थानिक गुन्हे शाखेचा छापा; गांजा विक्रेता व अल्पवयीन साथीदार जेरबंद

**-१.७५ लाखांचा मुद्देमाल जप्त : शहर बनतंय अंमली पदार्थांचा अड्डा?**

**हिंगणघाट । जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याला चाप बसावा, यासाठी पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांनी दिलेल्या कडक आदेशांनंतर स्थानिक गुन्हे शाखेने थेट कारवाई करत हिंगणघाट शहरात गांजाची खुलेआम विक्री करणाऱ्या आरोपीसह त्याच्या अल्पवयीन साथीदारास अटक केली आहे. या कारवाईमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली असून, हिंगणघाट गांजाचे 'हब' बनत चालल्याचे भयावह वास्तव पुन्हा एकदा उघड झाले आहे.

दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन हिंगणघाट हद्दीत गस्त घालत असताना, मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे संत ज्ञानेश्वर वार्डातील संतोषी माता मंदिर परिसरात सापळा रचण्यात आला. एन.डी.पी.एस. कायद्याच्या सर्व तरतुदींचे काटेकोर पालन करून



टाकलेल्या छाप्यात निशांत संजय रीठेकर (रा. संत ज्ञानेश्वर वार्ड, हिंगणघाट) व त्याचा एक अल्पवयीन साथीदार संशयास्पद स्थितीत आढळून आले. पंचासमक्ष घेतलेल्या झडतीत आरोपींकडून ५१४ ग्रॅम गांजा अंमली पदार्थ सापडला. चौकशीदरम्यान आरोपीने हा गांजा नागपूर येथील कमाल चौक परिसरात राहणाऱ्या 'विनायक' नावाच्या इसमाकडून विक्रीसाठी खरेदी केल्याची धक्कादायक कबुली दिली. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत गांजा, पल्सर २२० मोटरसायकल (एम एच ४० बी झेड ८६१६) व मोबाईल फोन असा एकूण ? १,७५,२८०/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपी व अल्पवयीन बालकाविरोधात पोलीस स्टेशन हिंगणघाट येथे एन.डी.पी.एस. कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, गांजा पुरवठा करणाऱ्या साखळीचा शोध घेण्यासाठी तपास वेगाने सुरू आहे.

**हिंगणघाटच का? गंभीर प्रश्न ऐरणीवर-** वर्धा जिल्ह्यात सर्वाधिक गांजासंबंधी गुन्हे हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीतच नोंदले जात असल्याची चिंताजनक बाब समोर येत आहे. इतर कोणत्याही पोलीस ठाण्याच्या तुलनेत येथे अंमली पदार्थांचे गुन्हे अधिक असल्याने, हिंगणघाट शहर गांजाच्या अवैध व्यापाराचे केंद्र तर बनत नाही ना? असा थेट प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. तरुण पिढी या अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकत असताना प्रशासनाने आणखी कडक पावले उचलण्याची मागणी जोर धरत आहे. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखा वर्धा चे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सलाम कुरेशी, पोलीस अंमलदार अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवि पुरोहित, अक्षय राऊत, अभिषेक नाईक यांनी यशस्वीपणे पार पाडली.

# जागतिक ध्यान दिनानिमित्त 'हार्टफुलनेस'चा विशेष ऑनलाइन ध्यान कार्यक्रम

## -डॉ. कमलेश पटेल (दाजी) यांच्या मार्गदर्शनाखाली जगभरातील लाखो साधक एकत्र

**वर्धा जनमाध्यम :** जागतिक ध्यान दिनाचे औचित्य साधत हार्टफुलनेस संस्थेतर्फे रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ८ वाजता विशेष ऑनलाइन ध्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात हार्टफुलनेसचे जागतिक मार्गदर्शक डॉ. कमलेश पटेल (दाजी) यांच्या सोबत जगभरातील लाखो साधक एकाच वेळी ध्यान साधना करणार आहेत.

सध्याच्या धावपळीच्या व तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक शांतता, अंतरिक समतोल आणि सकारात्मक दृष्टीकोन निर्माण व्हावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. एक विश्व, एक हृदय या संकल्पनेवर आधारित या ध्यान सत्रातून शांती, करुणा आणि एकतेचा संदेश देण्यात येणार आहे.

व्यक्तीगत कल्याणासोबतच सामूहिक शांततेचा अनुभव साधकांना घेता येईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

या विशेष ध्यान कार्यक्रमात अंतर्मुखता, भावनिक स्थैर्य, मानसिक संतुलन आणि आत्मिक शांती यांवर भर देण्यात येणार आहे. ध्यानाच्या माध्यमातून जीवनातील तणाव कमी होऊन सकारात्मक ऊर्जा निर्माण होण्यास मदत होते, असे हार्टफुलनेस संस्थेचे मत आहे. त्यामुळे युवक, विद्यार्थी, कर्मचारी, गृहिणी तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठीही हा कार्यक्रम उपयुक्त ठरणार आहे.

हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून जगातील कोणतीही व्यक्ती यामध्ये सहभागी होऊ शकते. सहभागासाठी इच्छुकांनी ँ ण्द्र किंवा दिलेल्या लिंकद्वारे (र्फ्.त्न्हव/सर्ृ्गदह) नोंदणी करावी, असे आवाहन हेमंत खोरगडे (विभागीय समन्वयक) यांनी केले आहे.

# सावंगी-देरड्यात वाघाचा धुमाकूळ

## -शेतात बांधलेली गाय ठार; सात गावांमध्ये भीतीचे सावट, वनविभागाचा सतर्कतेचा अलर्ट

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील सावंगी-देरडा परिसरात पट्टेदार वाघाचा मुक्त संचार सुरू असल्याने नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाघाने शेतात बांधून असलेली गाय ठार केल्याची धक्कादायक घटना समोर येताच मानव वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वनविभागाने सावंगी, देरडा व परिसरातील सात गावांना तातडीचा सतर्कतेचा इशारा दिला आहे.

सावंगी येथील शेतकरी मधुकर भुसारी यांच्या मालकीची गाय वाघाने फस्त केल्याची माहिती मिळताच प्रादेशिक वनविभागाचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाची सखोल पाहणी करून पंचनामा करण्यात आला. वाघाचा वावर वारंवार दिसत असल्याने शेतकरी व शेतमजूरांमध्ये भीती वाढली असून रात्रीच्या वेळी शेताकडे जाणे धोकादायक ठरत आहे.

परिसरात वाघ मनुष्य संघर्ष होऊ नये यासाठी वनविभागाने कडक उपाययोजना सुरू केल्या आहेत. नागरिकांना मार्गदर्शनात्मक सूचना देण्यात आल्या असून रात्री उशिरा बाहेर पडू नये, जनावरे मोकळ्या जागेत न बांधता सुरक्षित ठिकाणी ठेवावीत, तसेच संशयास्पद हालचाली दिसताच तात्काळ वनविभागाला माहिती द्यावी, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

### मध्यरात्री ट्रकला भीषण आग

# नांदगाव मार्गावर 'द बर्निंग ट्रक'; चालकाचा थरारक बचाव

**हिंगणघाट जनमाध्यम :** नांदगाव मार्गावरील सेंट जॉन्स कॉन्व्हेंटसमोर मध्यरात्री धावत्या ट्रकला अचानक भीषण आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली. ट्रकमधून धूर निघत असल्याचे लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखत वेळीच वाहनाबाहेर उडी घेतल्याने त्याचा जीव थोडक्यात बचावला. ही घटना मंगळवारी रात्री साडेबारा वाजताच्या सुमारास घडली.



एम. एच. ४० सी. एम. ७४११ क्रमांकाचा ट्रक नियोजित ठिकाणी जात असताना अचानक धुराचे लोट दिसू लागले. चालक संकल्प डंभारे याने क्षणाचाही विलंब न करता ट्रक रस्त्याच्या कडेला थांबवून बाहेर पळ काढला. काही क्षणांतच ट्रकने पेट घेतल्याने आगीचे लोळ उसळू लागले.

आगीची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांच्या मदतीने हिंगणघाट अग्निशमन दलाला कळविण्यात आले. तत्काळ अग्निशमन बंबासह जवान घटनास्थळी दाखल झाले. मात्र तोपर्यंत आगीने ट्रकला पूर्णपणे कवेत घेतले होते. जवानांनी जळत्या ट्रकवर सातत्याने पाण्याचा मारा करत सुमारे एक तासाच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले.

या आगीत ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला असून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून शॉर्टसर्किटचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेची नोंद हिंगणघाट पोलिसांनी घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

# महाराष्ट्रात ९८ नव्या दिवाणी न्यायाधिशांची नियुक्ती

## -प्रकरणे दुरुस्त करण्यासाठी न्यायालयीन कामकाजात गती

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्यात दिवाणी न्यायालयातील प्रकरणे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असलेल्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ९८ नव्या दिवाणी न्यायाधिशांची नियुक्ती केली आहे. सन २०२२ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कनिष्ठ दिवाणी न्यायाधिश व न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी पदासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यानंतर २०२३ मध्ये पूर्व परीक्षा आणि २०२४ मध्ये मुख्य परीक्षा घेतली गेली होती.

या प्रक्रियेनंतर मार्च २०२५ मध्ये एकूण ११४ जागांची तात्पुरती यादी जाहीर करण्यात आली होती. मात्र काही उमेदवार वयोमर्यादेत बसले नसल्यामुळे किंवा इतर कारणास्तव त्यांनी उच्च न्यायालयात निवेदन दाखल केले. त्याचा निकाल राखीव ठेवून ऑगस्ट २०२५ मध्ये अंतिम निवड यादीत १०३ परीक्षार्थींची नावे जाहीर केली गेली आणि १० उमेदवारांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात आली. पुढील तपासण्या आणि दस्तऐवज पडताळणीनंतर, दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी विधी व न्याय विभागाने ५ उमेदवारांना वगळून ९८ उमेदवारांची नियुक्ती अधिसूचित केली. त्याचबरोबर सर्व निवड झालेल्या न्यायाधिशांना नियुक्तीपत्रेही जारी करण्यात आली.

कनिष्ठ न्यायालयात प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे या नियुक्तीला महत्त्वाचे मानले जात आहे. वर्धा आणि नागपूर जिल्ह्यातील न्यायालयीन कामकाजाला ही नियुक्ती मोठ्या प्रमाणावर गती देईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**नागपूरमध्ये नियुक्त झालेल्या दिवाणी न्यायाधिशः** श्रीमती युक्ता विनोद कडू, खुशबु गोपाल झंझोटे, हर्षवर्धन आनंद कान्नव

**वर्धा जिल्ह्यात नियुक्त झालेल्या दिवाणी न्यायाधिशः** श्रीमती योजना अशोक बावरे, श्री अनिकेत लींबाराव कोकरे, श्री आशिश जयंद्र बोरकर, श्रीमती अनुजा अनिल तेलंग, श्री कृष्णा भगवान गावंडे राज्यातील न्यायालयीन कामकाजाच्या गतीसाठी आणि प्रलंबित प्रकरणांची वेळेत सुनावणी करण्यासाठी या नव्या नियुक्त्या निर्णायक ठरतील. स्थानिक प्रशासन आणि न्यायालयीन अधिकारी म्हणतात की, नव्या न्यायाधिशांच्या नियुक्तीमुळे प्रकरणांची लांबी कमी होऊन नागरिकांना लवकर न्याय मिळण्यास मदत होईल.

### नापिकी-कर्जाच्या विळख्यात शेतकरी संपला

# आकोलीतील अल्पभूधारक शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**सेलू जनमाध्यम :** शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केवळ घोषणा, पण मदतीचा थांगपत्ता नाही. हीच वास्तवाची विदारक झळ पुन्हा एकदा तालुक्यातील आकोली येथे पाहायला मिळाली. सततची नापिकी, शेतीमालाला मिळणारा अत्यल्प दर आणि डोक्यावर वाढत चाललेले कर्ज याला कंटाळून आकोली येथील अल्पभूधारक शेतकरी भिमराव कुडमते (वय ४५) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे.

गेल्या काही वर्षांपासून शेतीतून उत्पन्न होत नसताना उत्पादन खर्च मात्र वाढत चालला होता. निसर्गाच्या अवकृपेने पीक हातचे गेले, तर बाजारात मालाला कवडीमोल भाव मिळाल्याने कर्जाचा डोंगर अधिकच वाढत गेला. बँक, खासगी सावकार आणि घरखर्च यांचा ताण भिमराव कुडमते यांच्या मनावर खोलवर बसला होता, अशी माहिती गावकऱ्यांनी दिली. याच विवंचनेतून आज शुक्रवार, दि. १९ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास त्यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्येचा टोकाचा निर्णय घेतला. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी आक्रोश केला. काही वेळातच ही बातमी गावात पसरताच संपूर्ण आकोली परिसरात शोककळा पसरली.या घटनेची माहिती मिळताच सेलू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र कधी थांबणार? असा संतप्त सवाल ग्रामस्थांमधून उपस्थित होत आहे. कर्जमाफी, हमीभाव आणि प्रत्यक्ष मदत याबाबत शासनाची धोरणे केवळ कागदावरच राहतात की काय, अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.


**कार्यालय ग्राम पंचायत पिंपरी, पं.स.समुद्रपूर, जि.प.वर्धा**
**निविदा सूचना**

सर्व नोंदणीकृत कंत्राटदारास सुचित करण्यात येते की, ग्रामपंचायत पिपरी येथे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे अंतर्गत मंजूर प्राकलनानुसार कामाकरीता पंजीबध्द कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | योजनेचे नांव | साहित्याचे नांव | प्राकलन किंमत | १०℅ अनामत रक्कम | तांत्रिक मंजूरी | निविदा शुल्क | कामाची कालावधी | निविदा स्विकृतीचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १५ वा वित्त आयोग | सिमेंट रस्ता बांधकाम | १८७००० | १८७० | २७९ २०२५-२६ | ५०० | ३ महिने | २०.१२ २०२५ ते २७.१२. २०२५ | २८.१२ २०२५ किंवा मासिक सभेत |

**अटी व नियम-**

सविस्तर अटी व शर्ती कार्यालयीन दिवशी व वेळेत ग्रामपंचायत कार्यालय येथे पाहण्यास उपलब्ध आहे. निविदा अनामत रकमेचा भरणा सामान्य निधी खाते क्र.३३०५५७०३३४६ स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा गिरड तह.समुद्रपूर, जि.वर्धा IFSC No.SBIN0007222 मध्ये ऑनलाईन आर.टी.जी.एस./ऑनलाईन किंवा नगदी स्वरुपात करावे.

**सरपंच,**
**ग्रा.पं.पिपरी**
**पं.स.समुद्रपूर, जि.प.वर्धा**

**ग्रा.पं.अ.**
**ग्रा.पं.पिपरी**
**पं.स.समुद्रपूर, जि.प.वर्धा**

# मुंबईत महायुतीत ७७ जागांवर तिढा

## शिंदे गटात नसलेल्या नगरसेवकांचे प्रभाग सोडण्यास भाजपचा विरोध



**मुंबई**- महानगरपालिका निवडणूक महायुती करून लढण्याचा निर्णय भाजप आणि शिंदे गटाने घेतला आहे. मात्र, शिंदे गटात नसलेल्या नगरसेवकांचे प्रभाग सोडण्यास भाजपने विरोध केला आहे. तसेच २०१७ च्या निवडणुकीत कमी फरकाने हरलेल्या जागांवरही भाजपने दावा ठोकल्यामुळे महायुतीच्या जागावाटपात ७७ जागांवरून तिढा निर्माण झाला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या जागावाटपाबाबत महायुतीच्या नेत्यांची दुसरी बैठक आज मुंबईत पार पडली. या बैठकीत मुंबई पालिकेच्या २२७ प्रभागांपैकी १२५ जागा मिळाव्यात असा आग्रह शिंदे गटाने धरला. मात्र, भाजपने १५० जागांवर दावा सांगत त्यांची मागणी फेटाळून लावत फारफार तर ७७ जागा शिंदे गटाला सोडण्याची तयारी दाखवली आहे. ज्या जागांवरून दोन्ही पक्षांत तिढा आहे, अशा जागांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक घेऊन तोडगा काढण्यात येणार आहे.

महायुतीच्या बैठकीत १५० जागांवर एकमत झाल्याचे सांगितले जात आहेत. यामध्ये भाजपने २०१७ च्या निवडणुकीत जिंकलेल्या अलीकडच्या काळात भाजपमध्ये अन्य पक्षातून जे प्रवेश झाले आहेत अशा ८७ जागांचा समावेश आहे. शिवसेनेचे जे नगरसेवक शिंदे गटात आहेत तसेच काँग्रेस व अन्य पक्षातून ज्यांनी प्रवेश केला आहे अशा ६३ जागा शिंदे गटाकडे ठेवण्याबाबत दोन्ही पक्षांत एकमत झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघांपैकी ८ ते १० विधानसभा क्षेत्रांमध्ये शिंदे गटाला एकही जागा सोडण्यास भाजपचा विरोध आहे. यामध्ये मागाठणे, गोरेगाव, अंधेरी पश्चिम, विलेपार्ले, वांद्रे पश्चिम, घाटकोपर पश्चिम, वडाळा, मलबार हिल आदी मतदारसंघांचा समावेश आहे. याशिवाय मराठीबहुल भागांमध्येही भाजपकडून दावा केला जात आहे.

महायुतीच्या बैठकीनतर मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम आणि मंत्री उदय सामंत यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत जागावाटप दोन-तीन दिवसांमध्ये पूर्ण होईल, अशी माहिती दिली. जागा किती कोण लढत याच्यापेक्षा आम्ही महायुतीने पुढे जात आहोत.

ही अतिशय चांगली गोष्ट आहे. अमित शहा यांनी सांगितल्याप्रमाणे १५० पेक्षा जास्त जागा जिंकण्याचे लक्ष्य असल्याचे उदय सामंत म्हणाले.

## संक्षिप्त

### शहापूरचा झेंडा आयपीएलमध्ये फडकला



**शहापूर**- दुर्गम व असुविधांच्या विळख्यात असलेल्या शहापुरातील ओंकार तारमळे तरुणाने आयपीएलमध्ये झेंडा फडकावला आहे. ओंकारने उत्कृष्ट वेगवान गोलंदाजी करत क्रिकेटच्या राष्ट्रीय व्यासपीठावर आपला ठसा उमटवला आहे. त्याची आयपीएलच्या सनरायझर्स हैदराबाद संघात निवड झाली असून ओंकारवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.ओंकार तारमळे हा शहापूरच्या शेरे गावातील रहिवासी आहे. आई गृहिणी व वडील ट्रॅक्टर चालवून कुटुंबाचा गाडा चालवतात. शेतीवर मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांचा उदरनिर्वाह सुरू आहे. लहानपणापासूनच हलाखीचे दिवस असल्याने ओंकारचे शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. पुढे बारावीपर्यंतचे शिक्षण वासिंदच्या सरस्वती विद्यालयात घेतले. क्रिकेट आणि कबड्डीची आवड असलेल्या ओंकारने परिस्थितीवर मात करत जिद्द आणि चिकाटीने प्रयत्न सुरू ठेवले. कोणत्याही अकादमीकडे न जाता त्याने गेरसे गावातील मोकळ्या मैदानात मित्रांसोबत अथक परिश्रम घेतले. त्यानंतर स्थानिक जिल्हा स्पर्धांसह विभागीय स्तरावर गोलंदाजी करत थेट आयपीएल गाठले. आयपीएलच्या सनरायझर्स हैदराबाद संघात वेगवान गोलंदाजपदी निवड झाली आहे.

### नव्या वर्षात रिचार्ज महागणार!



**मुंबई**- महागाईने आधीच मेटाकुटीला आलेल्या सर्वसामान्यांना नव्या वर्षात जोरदार झटका बसणार आहे. टेलिकॉम कंपन्या रिचार्जच्या किमतीत २० टक्क्यांपर्यंत वाढ करणार आहेत. देशातील रिलायन्स जिओ, एअरटेल आणि व्होडाफोन-आयडिया कंपन्या रिचार्ज प्लानमध्ये वाढ करणार असून गेल्या ८ वर्षांत रिचार्जमधील ही चौथी वाढ असणार आहे. अमेरिकन फायनान्शियल सर्व्हिस कंपनी मॉर्गन स्टॅनलीच्या माहितीनुसार, हिंदुस्थानातील सर्व टेलिकॉम कंपन्या आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत म्हणजेच एप्रिल ते जून यादरम्यान शुल्क २० टक्क्यांपर्यंत वाढवणार आहेत. हे शुल्क वाढवल्यानंतर ग्राहकांना ४ जी आणि ५ जी प्लानसाठी जास्तीचे पैसे मोजावे लागतील.

### राज्यातील २१ जिल्ह्यांत सिकलसेल तपासणी विशेष मोहीम

**मुंबई**-सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा मोहिमेअंतर्गत राज्यातील सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांतील प्रत्येक नागरिकाची सिकलसेल तपासणी झाली पाहिजे. एकही नागरिक सिकलसेल तपासणीपासून वंचित राहू नये, याची काटेकोर दक्षता घेण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या.आरोग्यमंत्री आबिटकर यांच्या मंत्रालयीन दालनात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध विषयांबाबत आढावा बैठक झाली. या बैठकीस आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, आरोग्य आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालिका डॉ. सुनिता गोल्हाईत यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने राज्यात दि. १८ डिसेंबर ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत सिकलसेल अभियानाची पूर्व तयारी करण्यात येईल. त्यानंतर दि. १५ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत 'सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा' राबविण्यात येणार आहे. या तपासणी मोहिमेदरम्यान सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये एकही नागरिक तपासणीपासून वंचित राहू नये, यासाठी सर्व यंत्रणांनी प्रभावी नियोजन करावे.

सिकलसेल आजाराचे लवकर निदान, रुग्णांना योग्य उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे असून, राज्यात एकही सिकलसेल रुग्ण तपासणीपासून वंचित राहू नये, असेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

### न्यायाधीशांनी सेवानिवृत्तीपूर्वी घाईघाईने निकाल देणे चुकीचे

**मुंबई**- न्यायपालिकेत कार्यरत असताना आणि सेवानिवृत्तीच्या काही दिवसाआधी न्यायाधीशांनी घाईघाईने निर्णय देणे हे अत्यंत दुर्दैवी आहे, असे स्पष्ट मत सर्वोच्च न्यायलयाच्या खंडपीठाने नोंदवले. निवृत्तीच्या अगदी आधी न्यायाधीशांनी बाह्य कारणांमुळे प्रभावित होऊन घाईघाईने निर्णय देणे चुकीचे आहे, असे सांगत सुप्रीम कोर्टाने न्यायपालिकेत भ्रष्ट आचरणाबाबत अप्रत्यक्षपणे महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे.सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायाधीश जॉयमाल्या बागची आणि विपुल एम पंचोली यांच्या खंडपीठाने यावर आपले परखड मत व्यक्त केले आहे. खंडपीठाने म्हटले की, न्यायाधीशांमध्ये निवृत्तीच्या काही दिवसांपूर्वी खूप जास्त आदेश पारित करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. ते असे आदेश देतात जणू काही सामन्याच्या शेवटच्या षटकात षटकार मारत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी मध्य प्रदेशातील एका प्रधान जिल्हा न्यायाधीशांच्या याचिकेवर सुनावणी करताना केली. त्या न्यायाधीशांनी उच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाला आव्हान दिले आहे, ज्या अंतर्गत निवृत्तीच्या केवळ १० दिवसांपूर्वी त्यांना निलंबित करण्यात आले होते. याचिकाकर्त्यांचा आरोप आहे की, न्यायाधीशांनी काही संशयास्पद आदेश पारित केले. याचिकाकर्त्या न्यायाधीशांची निवृत्ती ३० नोव्हेंबर होती. परंतु, त्यांना १९ नोव्हेंबर रोजी दोन न्यायिक आदेशांच्या आधारे निलंबित करण्यात आले. न्यायाधीशांची संपूर्ण कारकीर्द निर्दोष राहिली आहे, असे याचिकाकर्त्याची बाजू मांडणाऱ्या ज्येष्ठ वकील विपीन सांघी यांनी कोर्टात सांगितले.

### आयपीएल लिलावानंतर काही दिवसातच LSG ला झटका!

मुंबई : आयपीएल २०२६ च्या मिनी ऑक्शनचा धडाका संपला असला तरी, चर्चा मात्र अजूनही सुरूच आहे. लिलावात खेळाडूंवर पैशांचा पाऊस पडला, पण आता फ्रँचायझींच्या डोकेदुखीत वाढ करणारी एक मोठी बातमी समोर आली आहे.

लखनऊ सुपर जायंट्स (LSG) संघाने ज्या ऑस्ट्रेलियन स्फोटक फलंदाजासाठी ८.६ कोटी रुपये मोजले, तो जोस इंग्लिश (Josh Inglis) आता आगामी हंगामातील सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार आहे.लिलावात जोस इंग्लिशला खरेदी करण्यासाठी सनरायझर्स हैदराबाद आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात जबरदस्त 'बिडिंग वॉर' पाहायला मिळाले. अखेर ८.६ कोटींची मोठी रक्कम मोजून लखनऊने बाजी मारली. पण ही आनंदाची बातमी फार काळ टिकली नाही.

# सातारा ड्रग्ज प्रकरणात सीएम फडणवीसांची प्रतिक्रिया



**सातारा** - सावरी गावातील एमडी बनविण्याच्या कारखान्या वर कारवाई करताना ओंकार तुकाराम डिगे याचा उल्लेख होता. त्यामुळे त्याच्याकडे चौकशी केली. मात्र, त्याचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न न झाल्याने अटक केली नाही. कामगारांकडे फक्त सहा हजार रुपये सापडले, असे सांगितले जात आहे. राजकीय द्वेषातून आपले नाव या प्रकरणात गोवले जात असल्याचा दावा ठाण्यातील माजी नगरसेवक प्रकाश शिंदे यांनी केला. तो कारखाना आणि ती जमीन आपली नाही. जिथे छापा पडला ती जमीन आपल्या जमिनीपासून अडीच ते तीन किलोमीटर लांब आहे, असेही त्यांनी सांगितले. या प्रकरणावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांचे अभिनंदन केले आहे.

साताऱ्यात पोलिसांनी धाड टाकून ड्रग्जचा इतका मोठा साठा जप्त केला, त्यासाठी मी सर्वप्रथम पोलीस दलाचे अभिनंदन करतो. जो धंदा चालला होता, त्याचा पर्दाफाश पोलिसांनी केला. या प्रकरणात जाणीवपूर्वक एकनाथ शिंदे यांचे नाव आणण्याचा प्रयत्न चुकीचा आहे, अयोग्य आहे, निषेधार्ह आहे. आतापर्यंत समोर आलेल्या पुराव्यात एकनाथ शिंदे यांच्या परिवाराचा संबंध दुरावन्याने आढळून आलेला नाही. आम्ही याप्रकरणाची पूर्ण चौकशी करत आहोत, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. ते पत्रकारांशी बोलत होते.

दरम्यान, माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याबाबतही देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला होता. यावर बोलताना ते म्हणाले की, माणिकराव कोकाटे यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. त्यांच्याकडील खात्यांची जबाबदारी आता अजित पवार यांच्याकडे देण्यात आली आहे.

# 'कुठेही लिहिलेले नाही की, काळे कपडे घालून...!'

### भाजप नीतीश कुमारांच्या पाठीशी

### हिजाबवर बंदी घातली जाणार



**पाटणा** : सध्या बिहारमध्ये हिजाबच्या मुद्द्यावरून जबरदस्त राजकारण पेटले आहे. या वादात आता भारतीय जनता पक्षाने मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या भूमिकेचे उघडपणे समर्थन केले आहे. सार्वजनिक ठिकाणे, सरकारी नोकऱ्या आणि मतदान केंद्रांवर हिजाब परिधान करण्यावर बंदी घालण्यात यावी, अशी मागणीच बिहार भाजपच्या वतीने करण्यात आली आहे.

**इस्लाममध्ये कोठेही चेहरा पूर्णपणे झाकण्याचा उल्लेख नाही**

भाजपचे मीडिया प्रभारी दानिश इक्बाल यांनी यासंदर्भात थेट भाष्य केले आहे. ते म्हणाले,'काळे कपडे परिधान करून संपूर्ण चेहरा झाका, असे कुरानमध्ये कुठेही लिहिलेले नाही. इस्लाममध्ये कोठेही चेहरा पूर्णपणे झाकण्याचा उल्लेख नाही. इस्लाममध्ये शालीनतेने पडदा पाळण्यास सांगितले आहे.' तसेच, विरोधी पक्ष मुस्लीम महिलांना मुख्य प्रवाहापासून दूर ठेवून चार भिंतीतच कैद करू इच्छितो, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

नीतीश कुमार खऱ्या अर्थाने महिलांचे हितैशी -नीतीश कुमार यांनी एका कार्यक्रमादरम्यान एका महिलेचा हिजाब आपल्या हाताने बाजूला करण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेवर भाष्य करताना भाष्य करताना इक्बाल म्हणाले, मुख्यमंत्री हे महिलांचे खऱ्या अर्थाने हितैषी आहेत. त्यांच्या कार्यामुळेच आज मुस्लीम समाजातील मुली डॉक्टर होऊन नियुक्ती पत्रे स्वीकारत आहेत. संबंधित महिलेने नोकरीसाठी कोलकाता येथे जाण्याची गरज नसून बिहारमध्येच राहून सेवा करावी, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. दानिश इक्बाल यांच्या या विधानाने बिहारमधील राजकारणात पुन्हा एकदा हिंदुत्व आणि महिला सक्षमीकरणाच्या मुद्द्यावरून चर्चा होताना दिसत आहे.

# 'नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्या': सपकाळ




**नवी मुंबई**- विमानतळाला भूमिपुत्र दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची लोकांची तीव्र भावना आहे. या भावनांचा आदर सरकारने केला पाहिजे. भाजपा महायुती सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जाणीवपूर्वक दि. बा. पाटील यांचे नाव देण्यास टाळाटाळ करत आहेत, परंतु कोणत्याही परिस्थितीत दुसरे नाव खपवून घेतले जाणार नाही, वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरून लढा देऊ, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे.

प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, नवी मुंबईच्या विकासासाठी स्थानिकांनी जमिनी दिल्या. त्यावेळी भूमिपुत्राच्या हक्कांसाठी दि. बा. पाटील यांनी दीर्घ लढा दिला. १२.५ टक्के योजना ही दि. बा. पाटील यांच्या आंदोलनामुळेच शक्य झाली आहे. दि. बा. पाटील यांची आमदार व खासदार अशी प्रदिर्घ राजकीय कारकिर्द राहिली आहे. नवी मुंबईत, जेएनपीटी, नैना प्रकल्प, नवी मुंबई विमानतळ विकसीत होत असताना भूमिपुत्रांनी दिलेल्या योगदाना कडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी रास्त असून जनभावनेचा आदर केला पाहिजे, असे सपकाळ यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जरी दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचे आश्वासन दिले असले तरी त्यांचा कावा सर्वांना माहित आहे. 'फडणविसांचा कावा ना कळे ब्रम्हदेवा', असा आहे, असे सपकाळ म्हणाले. नवी मुंबई विमानतळाचा उल्लेख सध्या एनएम विमानतळ असा केला जात आहे.

विमानतळाच्या कुंपनाच्या भिंतीवरही एनएम अक्षरे कोरली जात आहेत. हे एनएम म्हणजे नरेंद्र मोदी विमानतळ असे तर नाही ना असा दाट संशय बळावत चालला आहे.

# महुआ मोइत्रा यांच्याविरुद्ध 'कॅश-फॉर-क्वेरी'ला स्थगिती

## दिल्ली उच्च न्यायालयाचे निर्देश

**नवी दिल्ली**- कॅश-फॉर-क्वेरी प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा यांना दिलासा दिला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने सीबीआयला आरोपपत्र दाखल करण्याची परवानगी देणाऱ्या लोकपालच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. तसेच लोकपालांना महुआ यांच्या युक्तिवादांचा विचार करून एका महिन्याच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत.

नॅशनल हेराल्ड प्रकरणातील विशेष न्यायालयाने ईडीच्या आरोपपत्राची दखल घेण्यास नकार दिला होता. या न्यायालयाच्या निर्णयामुळे काँग्रेस पक्षाला नॅशनल हेराल्ड प्रकरण राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचे सांगत सरकारविरुद्ध आक्रमक होण्याची संधी मिळाली. आता, विरोधकांना सरकारविरुद्ध आक्रमक होण्याची आणखी एक संधी मिळाली आहे. पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या (टीएमसी) सदस्या महुआ मोइत्रा यांच्याविरुद्ध कॅश-फॉर-क्वेरी प्रकरणात सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्राशी संबंधित खटलाही संपला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने महुआ यांना महत्त्वपूर्ण दिलासा देत सीबीआयला आरोपपत्र दाखल करण्याची परवानगी देण्याच्या लोकपालच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे.

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अनिल क्षेत्रपाल आणि हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने लोकपालांना या प्रकरणात मोइत्रा यांच्या युक्तिवादांचा काळजीपूर्वक विचार करून एका महिन्याच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश दिले. लोकपालांनी यापूर्वी सीबीआयला या प्रकरणात मोइत्रा यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्याची परवानगी दिली होती.महुआ मोइत्रा यांनी लोकपालांच्या निर्णयाला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सर्व पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने महुआ मोइत्रा यांनी दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णय राखून ठेवला. दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी महुआ मोइत्रा यांच्या याचिकेवर निर्णय दिला. महुआ मोइत्रा यांच्या वतीने वरिष्ठ वकील निधेश गुप्ता उपस्थित राहिले. सुनावणी संपल्यानंतर गुप्ता यांनी सीबीआयच्या कार्यवाहीवर अंतरिम स्थगिती देण्याची विनंती केली. दिल्ली उच्च न्यायालयाने अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला. महुआ मोइत्रा यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की लोकपालांनी त्यांच्या युक्तिवादांचा योग्य विचार न करता सीबीआयला आरोपपत्र दाखल करण्याची परवानगी दिली आहे.

टीएमसी खासदार महुआ मोइत्रा यांनी दिल्ली उच्च न्यायालयात असा युक्तिवाद केला की सीबीआयला आरोपपत्र दाखल करण्याची परवानगी देण्याचा लोकपालांचा निर्णय चुकीचा होता. मोहुआ मोइत्रा यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की लोकपालांचा निर्णय लोकपाल कायद्याच्या विरुद्ध आहे आणि न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन आहे. उच्च न्यायालयाने आता लोकपालांना मोइत्रा यांच्या युक्तिवादांचा काळजीपूर्वक विचार करून एका महिन्याच्या आत निर्णय देण्याचे निर्देश दिले आहेत.

# मेळघाटातील कुपोषण समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू

## उच्च न्यायालयात राज्य सरकारचा अडचणींचा पाढा



**मुंबई**- मेळघाटसह अन्य आदिवासी भागांतील कुपोषणाची समस्या दूर करण्यासाठी, तेथील परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी राज्य सरकारकडून कसोशीने प्रयत्न केले जात असल्याचा दावा करतानाच समस्येचे निवारण करण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा पाढा सरकारतर्फे उच्च न्यायालयात वाचण्यात आला.

पौष्टिक आहार आणि वैद्यकीय सुविधा न मिळणे हे मेळघाटातील कुपोषणाने होणाऱ्या मृत्युचे एकमेव कारण नाही. तर, तेथे मुलींची लग्न लहान वयात होतात. वयाच्या पंधराव्या वर्षी मुलगी एकापेक्षा अधिकवेळा गर्भधारणा करते. आदिवासी भागांतील सामाजिक-सांस्कृतिक परंपरांशी संबंधित ही स्थिती देखील कुपोषणामुळे होणाऱ्या मृत्यूसाठी कारणीभूत असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक यांनी न्यायालयाला सांगितले. तसेच, ही स्थिती कशी बदलावी हा आमच्यासमोर प्रश्न असल्याचा दावाही त्यांनी केला. याशिवाय, सर्वतोपरी प्रयत्न करूनही डॉक्टर या भागांत सेवा देण्यास तयार होत नसल्याची हतबलताही व्यक्त केली.

न्याय मूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने मात्र डॉक्टर या परिसरात पुरेसे आणि योग्यवेळी डॉक्टर उपस्थित असतील याची व वैद्यकीय सेवेअभावी कोणत्याही बालकाचा किंवा मातेचा मृत्यू होणार नाही, याची खात्री करणे हे सरकारचे कर्तव्य असल्याचे सुनावले. तसेच, न्यायालयाच्या मागील आदेशानंतर मेळघाटमध्ये चार मुलांचा आणि दोन मातांचा मृत्यू झाल्याच्या माहितीच्या पार्श्वभूमीवर मेळघाट आणि आसपासच्या कुपोषणग्रस्त भागांतील प्राथमिक आरोग्य केंद्रात एक आठवड्यात आत स्त्री आणि बालरोग तज्ज्ञांची नियुक्ती करण्याचे आदेश राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाला दिले. निकड लक्षात घेता ही नियुक्ती कंत्राटी किंवा प्रतिनियुक्तीवर करण्याचेही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले. प्रत्येक सुनावणीच्या वेळी एवढे मृत्यू झाल्याचे ऐकणे वेदनादायी असल्याचेही न्यायालयाने सुनावले.तत्पूर्वी, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या एका समितीने मेळघाटाला भेट देऊन तेथील परिस्थितीचे सद्यस्थिती मांडणारा आणि त्यावर उपाय सुचवणारा सविस्तर अहवाल तयार केला आहे. हा अहवाल सुनावणीच्या वेळी न्यायालयात सादर केला गेला. खंडपीठाने तो थोडक्यात वाचल्यावर, मेळघाट परिसरात स्त्रीरोग आणि बालरोगतज्ज्ञ का नाहीत, हे पाहण्यासाठी कोणीतरी तिथे जायला हवे, असे ताशेरे ओढून स्त्रीरोग-बालरोगतज्ज्ञांची आठवड्याभरात नियुक्ती सुनिश्चित करण्याचे आदेश दिले.

तसेच यासंदर्भात महिला व बाल कल्याण विभाग आणि आदिवासी कल्याण विभागाच्या प्रधान किंवा सहसचिवांना प्रत्यक्ष किंवा दूरचित्रसंवाद प्रणालीच्या माध्यमातून (व्हिसी) पुढील सुनावणीच्या वेळी उपस्थित राहण्याचे आदेश दिले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## शिल्पकलेचे जादूगर

**निर्जीव मूर्तींमध्ये प्राण फुंकणारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिल्पकार राम सुतार यांच्या निधनामुळे शिल्पकलेतील एका पर्वाचीच समाप्ती झाली आहे. त्यांच्या शिल्पकलेत भारतीय संस्कृती इतिहास आणि भावना यांचा अनोखा संगम झाला होता. देशभरातच नाही, तर जगभरात त्यांनी महात्मा गांधी यांची शिल्पे साकारली. सरदार वल्लभभाई पटेल यांचा गुजरात राज्यातील केवडिया येथे जगातील सर्वात उंच १८२ मीटर उंचीचा पुतळा त्यांच्याच हातातून सिद्ध झाला. भगवान बुद्ध, महावीर आणि विवेकानंद यांच्यासह इतर महान विभूतींच्या मूर्ती अत्यंत सुबक आणि चित्तवेधक पद्धतीने त्यांनी साकारल्या. अगदी अलीकडे अनावरण करण्यात आलेला अंदमान येथील स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा त्यांनी घडवला. मालवणच्या राजकोट येथील समुद्रकिनाऱ्यालगतचा छत्रपती शिवरायांचा नवा पुतळा सुतार आणि त्यांचे पुत्र अनिल यांनीच तयार केला. भारतीय शिल्पकलेला देदीप्यमान इतिहास आहे. पश्चिम बंगालमधील शांतिनिकेतनमधील रामकिंकर बैज यांनी १९३० पासून आधुनिक भारतीय शिल्पकलेच्या पायाभरणीचे कार्य सुरू केल्यावर, विविध भागांत या कलेचा हळूहळू विकास होत गेला. सदानंद बाकरे, ए. एम. दवेरवाला, पिलू पोचखानवाला, धनराज भगत यासारख्या शिल्पकारांनी आत्मप्रकटीकरणाचे माध्यम म्हणून शिल्पकलेत प्रयोगशीलता आणून, ही कला अधिक पुढे नेली. वि. पां. करमरकर यांनी रवींद्रनाथ ठाकूर यांच्या अर्धपुतळ्याच्या निर्मितीद्वारे आधुनिकतेच्या खुणा दर्शवून दिल्या. १९६० नंतरच्या दशकात भारतीय शिल्पकलेमध्ये पौर्वात्य आणि पाश्चिमात्य कलाप्रवाहांचा संगम दिसू लागला.शिल्पकार नवनवीन द्रव्ये आणि तंत्रे वापरू लागले. घाटांच्या बाबतीतही नवनवे प्रयोग होऊ लागले. याच आधुनिक शिल्प परंपरेचे एक पाईक असलेले सुतार हे स्वातंत्र्योत्तर भारतीय स्मारक शिल्पांच्या इतिहासातील एक लखलखीत पानच होते. प्रचंड आकाराची शिल्पे हे त्यांच्या कलेचे वैशिष्ट्य. सुतार हे धुळे जिल्ह्यातील गोंदूरचे. त्यांचे वडील लोहारकाम आणि सुतारकाम करत असत. त्यामुळे शेतीची अवजारे तयार करणे, बैलगाडी बनवणे, लाकडावर कोरीव काम करणे, मातीची खेळणी बनवणे, शेणाने सारवलेल्या भिंतींवर चित्रे रंगवणे या गोष्टी ते बालवयातच शिकले. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये त्यांनी शिल्पकलेचे औपचारिक शिक्षण घेतले. परंतु, त्यापूर्वीच त्यांचे मूर्तिकौशल्य हेरून, चित्रकलेचे शिक्षक श्रीराम जोशी यांनी १९४८ साली त्यांच्याकडून महात्मा गांधीजींचा पुतळा बनवून घेतला होता. त्यांनीच राम यांना घडवले. १९४७ साली एका शरीरसौष्ठवपटूचा पुतळा सुतार यांनी प्रथम घडवला.चंबळ नदीवरील गांधीसागर धरणानजीकचे 'चंबळा आणि तिला बिलगलेली दोन बालके' (या धरणाचे लाभ मिळणाऱ्या मध्य प्रदेश व राजस्थान या राज्यांचे प्रतीक) असे ४५ फुटी शिल्प, हा सुतार यांच्या कलेतील भारतीयतेचा आदर्श मानला जातो. विचारमग्न स्थितीत असलेले महात्मा गांधी यांचे संसदभवन येथील कलात्मक व्यक्तिशिल्प आणि वल्लभभाई पटेल यांचे सरदार सरोवर येथील उत्तुंग शिल्प, ही सुतार यांची सर्वात लोकप्रिय अशी शिल्पे. सुतार यांची शिल्पे अत्यंत चैतन्यशील आणि जिवंत वाटतात. अयोध्येच्या राम मंदिरात अनेक उत्कृष्ट मूर्ती स्थापित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी एक मूर्ती जटायूची असून, ती सुतार यांनी बनवलेली. व्यक्तिशिल्पे, म्यूरल्स, एखाद्या संकल्पनेला धरून शिल्प, असे शिल्पकलेचे विविध प्रकार त्यांनी हाताळले. तिशीत असतानाच त्यांनी अजिंठा-वेरूळ येथील शिल्पांच्या डागडुजीचे आणि नंतर पंचवार्षिक योजनांचे लाभ सांगणारी लघुशिल्पे बनवण्याचे काम सरकारी नोकरीत राहून केले.रवींद्रनाथ टागोर यांचा टोकियोतील पुतळा त्यांच्याच हातांनी घडवला. फ्रान्स, इटली, अर्जेंटिना, रशिया, ब्रिटन अशा विविध देशांत त्यांनी साकारलेली शिल्पे उभी आहेत. महात्मा गांधीजींचे त्यांच्या स्टुडिओत घडलेले अनेक अर्धपुतळे भारत सरकारने परदेशी राष्ट्रप्रमुखांना भेट म्हणून दिलेले आहेत. दगड आणि संगमरवरातील शिल्पकामात सुतार यांचा हातखंडा होताच, ब्राँझ धातूत शिल्पकाम करण्याची विशेष आवड त्यांना होती. प्रमाणबद्धता व सूक्ष्मता हे त्यांच्या कलेचे एक वैशिष्ट्य. दिल्लीतील रफी मार्गावरील गोविंद वल्लभ पंत यांचे दहा फुटी शिल्प म्हणजे सुतार यांचे अद्वितीय कौशल्य, प्रतिभा आणि अचूकता यांचा उत्कृष्ट नमुना आहे. दिल्लीस भेट देणाऱ्या कोणाच्याही नजरेत हे शिल्प भरते. त्यांनी बनवलेल्या इतर प्रसिद्ध शिल्पांमध्ये दिल्लीतील हरिजन सेवक संघातील महात्मा गांधी वुईथ हरिजन किडस्, महाराजा रणजितसिंह यांचा अमृतसर येथील पुतळा आणि गंगा-यमुना देवींचे लुधियाना येथील शिल्प यांचा समावेश आहे.मध्य प्रदेशातील ४५ फूट उंचीचे 'चंबळ स्मारक' हे त्यांच्या कारकिर्दीतील मोठे आणि कौतुक झालेले काम. हे स्मारक एकाच खडकापासून बनवण्यात आले. शिल्पकलेसारख्या अवघड कलेला आपल्या परीसस्पर्शाने सुतार यांनी नवीन आयाम मिळवून दिला. दोनशेहून अधिक भव्य पुतळ्यांच्या उभारणीचे अवघड काम त्यांनी करून दाखवले. सुतार यांना गेल्या मार्च महिन्यातच 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. त्यांची प्रकृती बरी नसल्यामुळे हा पुरस्कार त्यांना मुंबईत भव्य सोहळ्यात प्रदान करता आलेला नव्हता. गेल्या नोव्हेंबरमध्ये नोएडा येथील त्यांच्या घरी जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तो सन्मानपूर्वक प्रदान केला होता. तो स्वीकारल्यानंतर सुतार यांच्या तोंडी 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' हेच बोल होते. आजारी अवस्थेतदेखील त्यांच्या तोंडून महाराष्ट्राच्या राज्यगीताच्या ओळी ऐकताना मुख्यमंत्र्यांचादेखील ऊर साहजिकच अभिमानाने भरून पावला होता. शिल्पकला हे सर्जनशील काम. त्या त्या व्यक्तीच्या जीवनाचे सार पुतळ्यात किंवा स्मारकात अक्षरशः ओतावे लागते. शारीरिक परिश्रमासह शिल्पकाराची जीवनदृष्टीही त्यातून प्रतिबिंबित होत असते. महापुरुषांच्या स्मारकातून नवीन पिढ्यांना प्रेरणा मिळत असते. या पुतळ्यांमधून इतिहास जिवंत होतो आणि नवा इतिहास घडवण्याचे सामर्थ्यही त्यात असते. राम सुतार शतायुषी होईपर्यंत इतरांची शिल्पे घडवत राहिले. परंतु, शिल्पांच्या या किमयागाराचे जीवनशिल्पदेखील कोट्यवधी लोकांना प्रेरणादायी वाटेल, असेच आहे.**

## ओबीसीहक्कांसाठी 'न्याय्य' पर्याय

**महाराष्ट्रात नगरपंचायत, नगर परिषदा, महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीसाठी आरक्षणमर्यादा ओलांडल्याचा मुद्दा समोर आला. यानिमित्ताने पुन्हा एकदा ओबीसी आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आला आहे.**




ओबीसी आरक्षणासाठीच्या प्रदीर्घ लढ्यानंतर १९९२ सालच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने ओबीसींना २७टक्के आरक्षण लागू झाले. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना घटनादत्त आरक्षण असल्याने लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना हक्क मिळतो. ओबीसींची लोकसंख्या अधिक प्रमाणात असली तरी, आरक्षण मर्यादेची अट असल्याने एससी आणि एसटींची संख्या अधिक असलेल्या भागांत निर्धारित आरक्षण ओबीसी समाजाला मिळत नाही. ओबीसींच्या जागांना कात्री लागते. हा अन्याय असल्याचा मुद्दा समोर करीत ओबीसी समाजाकडून आंदोलनांच्या माध्यमातून आरक्षण मागणीकडे वारंवार लक्ष वेधले जात आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणनेची मागणी करीत ओबीसींची नेमकी लोकसंख्या समोर आणण्याचा मुद्दा लावून धरला. सरकारने ही मागणी पूर्ण केली. येत्या काळात जातनिहाय जनगणना होणार आहे. मुळात २७ टक्के किंवा लोकसंख्येच्या जातनिहाय आरक्षणासा मिळकियासाठी कि कवळया जनगणना करून भागणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय आरक्षण कायद्याच्या चौकटीत टिकण्यासाठी संविधानातील कलम २४३ डी (६) व कलम २४३ टी (६) मध्ये सुधारणा गरजेची आहे. केंद्र सरकारने कायदा केला तरच, स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत ओबीसींना २७ टक्के आरक्षण मिळू शकेल. केंद्र सरकारने २०१९मध्ये आर्थिक दुर्बल घटकांना (ईडब्ल्यूएस) दहा टक्के आरक्षण लागू करताना १०३वी घटनादुरुस्ती केली होती. यानंतर या घटकातील नागरिकांना नोकऱ्या, शिक्षण आणि खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण लागू झाले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील सध्याच्या प्रश्नाचे बीज वाशीम जिल्ह्यातील विकास गवळी यांच्या याचिकेत आहे. गवळी यांनी ५०टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडली गेल्याचा मुदादा सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेतून केला होता. या याचिकेवर न्यायालयाने मार्च २०२१ला निकाल दिला. हा निकाल देताना न्यायालयाने 'ट्रिपल टेस्ट' सांगितली. आयोग नेमा, इम्पेपिकल डेटा तयार करा आणि एससी, एसटींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देऊन उर्वरित ओबीसींना ५० टक्क्यांच्या मयदित आरक्षण देण्याचे आदेश दिले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील तत्कालीन राज्य सरकारने बांठिया आयोग नेमून इम्पेरिकल डेटा गोळा केला. राजकीय उलथापालथ होऊन नंतर सरकार बदलले. एकनाथ शिंदे यांचे सरकार आल्यानंतर हा डेटा सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आला. न्यायालयाने हा डेटा स्वीकारला, मात्र अनेक याचिका असल्याने राजकीय आरक्षणातील अडचणी लक्षात घेता निवडणुका लांबल्या. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींसाठी आरक्षित जागांवर जिंकून येणाऱ्या उमेदवारांबाबत सर्वोच्च न्यायालय २१ जानेवारीला काय निकाल देते हे महत्त्वाचे आहे. म्हणजेच, या उमेदवारांचे भवितव्य न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून राहणार आहे.

जिल्हा परिषदांचा विचार करता ३२पैकी १७ठिकाणी, तर ३३६ पंचायत समित्यांपैकी ८३मध्ये आरक्षणमर्यादा ओलांडण्यात आल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. राज्यातील २९ महापालिकांपैकी केवळ नागपूर आणि चंद्रपूर या दोनच ठिकाणी आरक्षण मर्यादपलीकडे जात आहे. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आता नव्याने आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. यापूर्वी २०२१मध्ये धुळे, नंदुरबार, वाशीम आणि अकोला अशा काही जिल्ह्यांमध्ये ओबीसी आरक्षणावर निवडून आलेल्या २८९ सदस्यांचे नगरसेवकपद सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने रद्द झाले होते. केवळ मलमपट्टी केली जात असल्याने आरक्षणाचा तिढा वाढू लागला आहे.

ओबीसी आरक्षण हा विषय तसा जुना आणि तिदधाचा आहे. ओबीसी समाजाला अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीप्रमाणे सरसकट आरक्षण नाही. क्रिमिलेअरची मर्यादा घालण्यात आली आहे. ब्रिटिश राजवटीत १८७१ ते १९३१ पर्यंत दर दहा वर्षांनी ओबीसीची जनगणना करण्यात येत होती. या आधारावर देशात एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ५२ टक्के ओबीसी असल्याचे स्पष्ट झाले होते. कोल्हापूर संस्थानात छत्रपती शाहू महाराजांच्या शासनकाळात ओबीसींना ५० टक्के आरक्षण देण्यात आले होते. या आरक्षणाचा लाभ स्वांतत्र्यापर्यंत मिळत होता. स्वातंत्र्यानंतर घटनेतील कलम ३४०नुसार ओबीसी प्रवर्गाला आरक्षण दिले गेले. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीची जातनिहाय सूची तयार असल्याने त्यांना अनुक्रमे पंधरा आणि साडेसात टक्के आरक्षण निर्धारित करण्यात आले. ओबीसी संवर्गात समाविष्ट जातींची यादी तयार नसल्याने सूची तयार होऊ शकली नाही. स्वातंत्र्यापूर्वी मिळणारे आरक्षण रद्द झाले आणि ओबीसी हक्काच्या आरक्षणापासून वंचित राहिला.

आरक्षणाच्या सुविधा लागू करण्याच्या हेतूने आयोगाचे संविधानाच्या ३४०व्या कलमानुसार ओबीसींना गठन होत नसल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५१मध्ये आपल्या मंत्रिपदाचा त्याग केला होता. यानंतर २९ जानेवारी १९५३ला खासदार काका कालेलकरांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी आयोगाची स्थापना केली गेली. या आयोगाचा अहवाल १९५५ला राष्ट्रपतींना सादर करण्यात आला. या आयोगाच्या अहवालात ओबीसींना शिक्षण आणि नोकरीमध्ये आरक्षण, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, पदोन्नतीमध्ये आरक्षणाची शिफारस केली गेली. आयोगाच्या अध्यक्षांनी अहवालाला आपली व्यक्तिगत सहमती नसल्याचे पत्र राष्ट्रपतींना दिले. पुढे २५ वर्षांपर्यंत हा अहवाल लोकसभेच्या पटलावर आलाच नाही.

मोरारजी देसाई यांच्या सरकारने कालेलकर आयोगाचा अहवाल रद्द करून १९७८ मध्ये खासदार बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली नवा आयोग नेमला. या आयोगाने दोन वर्षे अभ्यास करून १९८० मध्ये अहवाल राष्ट्रपतींना सादर केला. हा अहवालही दहा वर्षांपर्यंत लोकसभेत पटलावर आलाच नाही. १९८९मध्ये व्ही. पी. सिंग पंतप्रधान झाले आणि दुसऱ्याच वर्षी मंडल आयोगाला मंजुरी प्रदान करून शिफारसी लागू करण्याची घोषणा केली. याविरोधात काही व्यक्ती सर्वोच्च न्यायालयात गेल्या. शेवटी १९९२ला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार एकूण आरक्षण उत्पन्नमयदिच्या अटी घालण्यात आल्या. या निर्णयामुळे एससी संवर्गाचे १५ टक्के व एसटी संवर्गाचे ७.५ टक्के असे एकूण २२.५ टक्के ५० टक्के टक्क्यापको ओबीसींना २७ टक्के आरक्षण लागू करण्यात आले. त्यासोबतच क्रिमिलेअरची अट लावण्यात आली. मात्र हक्काच्या आरक्षणापासून ओबीसी ४० वर्षे वंचित राहिला. अजूनही आरक्षणावरून न्यायालयात दाखल याचिकांवर हा प्रश्न सुटलेला नाही.

जातनिहाय जनगणना होणार असल्याने समाजाची स्वातंत्र्यानंतर आता पहिल्यांदा ओबीसींची नेमकी आकडेवारी समोर येण्याचा विश्वास वाढला आहे. हे आकडे समोर आल्यानंतर ओबीसींना अपेक्षित निधी, सुविधा आणि आरक्षण मिळणार काय याविषयी अजून तरी कुणीही ठामपणे सांगत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ओबीसी आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात सर्वाधिक ओबीसी असल्याचे वारंवार अधोरेखित होते. सत्तेत ओबीसींचा हा वाढता टक्का नक्कीच सुखावणारा आहे. ओबीसी संघटनांच्या माध्यमातून समाजाच्या प्रश्नांवरचा आवाजही बुलंद होऊ लागला आहे. कधी महाराष्ट्र, तेलंगण, दिल्ली, तमिळनाडू तर कधी पंजाबमध्ये ओबीसींच्या प्रश्नांवरील आंदोलनांतून सरकारचे लक्ष वेधले जाते. महासंघाच्या अधिवेशनातही हेच झाले. होते. ऑगस्ट महिन्यात गोव्याच्या राष्ट्रीय ओबीसी संमेलनांतून समाजाच्या आजच्या परिस्थितीवर मंथन महाराष्ट्रासोबतच गोवा, तेलंगण, पंजाबसह देशभरातून ओबीसी एकवटले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर आणि काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार एका व्यासपीठावर आले होते. यावेळी फडणवीस यांनी ओबीसींच्या हक्कांसाठीच्या चळवळीशी असलेला संबंध विशद केला. कार्यकाळात ओबीसी हिताच्या निर्णयांचे दाखले देताना ५८ शासन निर्णय काढल्याची माहिती दिली. राज्यात 'सारथी' आणि 'बार्टी'च्या धर्तीवर ओबीसींच्या हितासाठी 'महाज्योती'ची नागपुरात स्थापना झाली. लोकसंख्येच्या प्रमाणात याव संस्थेला निधी देऊन सरकारकडून समाजविकास केला जात असल्याचे मानले जाते, पण महाज्योतीला केवळ ३०० कोटी रुपये दिले जातात. लाभार्थ्यांची संख्या आणि निधीचा मेळ जुळविणे कठीण होत असल्याने समाजोपयोगी नव्या योजनांसाठी निधी उरत नाही. अपुऱ्या निधीच्या मुद्द्यावरून समाजातून अजूनही अपेक्षित आवाज उठविण्यात आलेला नाही. गावगाड्यातील ओबीसी विद्यार्थ्यांना आपल्यासाठी 'महाज्योती' सारखी संस्था काम करीत असल्याचीही माहिती नाही.

ओबीसीहिताचे निघालेले ५८ शासन निर्णय ही सुरुवात आहे. या यशाने हुरळून न जाता समाजाची लागणार आहे. पेरियार रामास्वामी यांनी मद्रास प्रांतात शेवटची मागणी पूर्ण होईपर्यंत लढा सुरूच ठेवावा लढा दिल्याने ओबीसी समाजाला तामिळनाडूत ६९ टक्के आरक्षण आहे. रामास्वामींचा लढा, त्यांची जिद्द समाजाच्या प्रत्येक ओबीसीत गरजेची आहे. त्याशिवाय 'जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी हिस्सेदारी' हा नारा प्रत्यक्षात येणे कठीण आहे, असे जाणकारांचे ठाम मत आहे. (साभार मटा)

**विनोद वाघमारे**

## शिल्पकलेचा युगनिर्माता



प्राचीन भारतीय वैभवी शिल्पकलेचा वारसा आपल्या शिल्पकलेल्या तपश्चर्येने पुढे नेणारा, देशात आणि जगभरात आपल्या पुतळ्यांनी कीर्ती मिळवणारा आधुनिक शिल्पकलेचा युगनिर्माता श्रीराम वानजी सुतार यांच्या निधनाने जागतिक शिल्पकला क्षेत्रात आपली नाममुद्रा कोरणारा शिल्पकलेचा जादूगार काळाच्या पडद्याआड गेला आहे. गुजरात राज्यातल्या नर्मदा सरोवरच्या परिसरात १८२ मीटर उंचीचा सरदार वल्लभभाई पटेल यांचा जगातला सर्वात उंच पुतळा निर्माण करून त्यांनी जागतिक शिल्पकलेत नवा विक्रम प्रस्थापित केला. महात्मा गांधीजी, नेताजी सुभाषचंद्र बोस, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अश्वारूढ छ. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासह थोर नेत्यांचे पुतळे साकारणाऱ्या सुतार यांनी श्रीराम, श्रीकृष्ण, शंकर अशा देवतांचे भव्य पुतळेही साकारले आहेत. महात्मा गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षात केंद्र सरकारने त्यांनी तयार केलेल्या महात्मा गांधीजींचे पुतळे जगातल्या अनेक राष्ट्रांना भेट दिले होते. या पुतळ्यांमुळे जगभरात सुतार यांच्या प्रतिभेचा लौकिक पसरला. धुळे जिल्ह्यातल्या गोंदूर या गावात १९ फेब्रुवारी १९२५ रोजी जन्मलेल्या सुतार यांना बालपणापासून शिल्पकलेची दगडातून मूर्ती घडवायची प्रचंड ओढ होती. त्यांचे शिक्षक श्रीराम जोशी यांनी या आपल्या प्रतिभावान विद्यार्थ्याला मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट या जागतिक कीर्तीच्या संस्थेत मूर्ती शिल्पकलेचे शिक्षण घेण्याची प्रेरणा दिली आणि या संस्थेतून सुतार यांनी सुवर्णपदकासह मूर्तिकलेची पदवी संपादन केली. केंद्र सरकारच्या माहिती प्रसारण खात्यात प्राचीन शिल्पाच्या खात्यात त्यांनी काही काळ नोकरी केली आणि अजंठा, वेरूळमधल्या लेण्यातल्या प्राचीन शिल्पांची डागडुजीही त्यांनी केली होती. पुढे संपूर्ण जीवन मूर्ती आणि पुतळ्यांच्या निर्मितीसाठी घालवायचे असे ठरवून त्यांनी १९५९ मध्ये पूर्ण वेळ शिल्पकलेसाठी आपले जीवन समर्पित केले. गेल्या ६० वर्षात त्यांनी अक्षरशः हजारो पुतळे निर्माण केले.

महात्मा गांधीजींचे वेगवेगळ्या मुद्रेचे, स्वरूपातले ३५० च्या वर पुतळे हे त्यांच्या शिल्पकलेच्या प्रतिभेची साक्ष देणारे ठरले आहेत. गेल्याच आठवड्यात अंदमान येथे त्यांनी निर्माण केलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले होते. वयाच्या नव्वदीनंतर त्यांची मूर्तिकलेतील जादू जगाने अनुभवली. अयोध्येत लता मंगेशकर चौकात साकारलेले श्रीराम आणि विणेचे भव्य शिल्प, गोव्यातील श्रीरामाचा भव्य पुतळा, सिंधुदुर्ग किल्ल्यावरील छ. शिवरायांचा ६० मीटर उंचीचा पुतळा त्यांच्या शिल्पकलेतल्या तपश्चर्या आणि साधनेचे प्रतीक होय. सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा जगात सर्वात उंच तर आहे. १,७०० मेट्रिक टन वजनाचा त्यांनी घडवलेला पुतळा हा त्यांच्या अभियांत्रिकी क्षेत्रातल्या प्रचंड अभ्यासाची प्रचिती होय. आधुनिक विश्वकर्मा, शिल्पकलेचा कोहिनूर, असा लौकिक असलेल्या सुतार यांनी आयुष्यभर आपले गुरू आणि शिल्पकलेत जीव ओतून काम करण्याची प्रेरणा देणारे शिक्षक यांच्याबद्दल सतत कृतज्ञतेच्या भावना व्यक्त केल्या. दगड आणि धातूला जिवंत करणारा, शिल्पात जीव ओतून हुबेहूब पुतळे बनवणारा या अवलिया शिल्पकाराचा सन्मान केंद्र सरकारने पद्मश्री, पद्मभूषण आणि महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र भूषण सन्मानाने केला होता. शिल्पकलेचा चालता बोलता इतिहास असलेला श्रीराम सुतार यांचा शिल्पकलेचा वारसा त्यांचा मुलगा अनिल पुढे चालवत आहे. शतायु शिल्पकार सुतार हे आधुनिक युगातले विश्वकर्मा होते. त्यांनी घडविलेल्या पुतळ्यांमुळे त्यांची स्मृती चिरंतन राहील!

**श्रीहरी**

## वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब

पश्चिम बंगालमधील सत्ताधारी पक्षातील तृणमूल काँग्रेसचे आमदार मदन मित्रा यांचे वक्तव्य 'राम हिंदू नव्हते तर मुसलमान होते'.देशभरात चर्चा आणि वाद निर्माण झाला.भगवान रामांविषयी केलेले विधान केवळ एक वैयक्तिक मत म्हणून न राहता, समाजातील श्रद्धा, इतिहास आणि राजकीय संवेदनशीलता यांना स्पर्श करणारे आहे.भारतीय संस्कृतीत श्रीराम हे केवळ धार्मिक श्रद्धेचेच नव्हे, तर नैतिक मूल्यांचे, आदर्श जीवनाचे प्रतीक मानले जातात. अशा व्यक्तिमत्त्वाबाबत केलेली कोणतीही सार्वजनिक टिप्पणी ही अत्यंत जबाबदारीने करायला हवी.मात्र,या प्रकरणात तसे झाले नसल्याची भावना अनेक नागरिकांमध्ये दिसून येते.

या वक्तव्यावरून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात असून, अशा विधानांमुळे भारतीय इतिहास व सांस्कृतिक परंपरेचा अवमान होतो,असा आरोप केला आहे. यामागे केवळ व्यक्तीगत अज्ञान नसून,एका विशिष्ट वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब दिसते, असेही मत व्यक्त करण्यात आले.याच पार्श्वभूमीवर राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भूमिकेकडेही लक्ष वेधले जात आहे. या संपूर्ण प्रकरणावर त्यांची स्पष्ट प्रतिक्रिया न आल्याने, सार्वजनिक जीवनातील जबाबदारी आणि मौन याविषयी प्रश्न उपस्थित होत आहेत.दरम्यान, संबंधित आमदारांनी आपल्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावण्यात आल्याचे सांगत स्पष्टीकरण दिले आहे.मात्र, सार्वजनिक व्यासपीठावरून केलेल्या विधानांचे परिणाम केवळ शब्दांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर समाजमनावर त्याचा खोल प्रभाव पडतो,हे विसरून चालणार नाही.अशा घटनांमधून एक गोष्ट प्रकर्षाने अधोरेखित होते.राजकारण करताना श्रद्धा, इतिहास आणि समाजभावना यांचा आदर राखणे ही केवळ अपेक्षा नव्हे, तर लोकप्रतिनिधींची नैतिक जबाबदारी आहे.

**डॉ.स्वाती देशमुख**

## शाळकरी मुलांच्या वाहतूक सुरक्षिततेचा प्रश्न

सर्वसाधारण पणे आजही अनेक ठिकाणी नर्सरीपासूनची मुले शाळा, क्लास व ट्युशनसाठी ऑटो रिक्षातून प्रवास करताना दिसतात.मात्र या ऑटो रिक्षांची सुरक्षितता चिंताजनक आहे. अनेक रिक्षांना नीट दरवाजे, सुरक्षित कड्या किंवा आवश्यक संरक्षक व्यवस्था नसते. त्याशिवाय क्षमते पेक्षा अधिक मुले रिक्षात बसलेली असतात.बरेचदा चार-पाच वर्षांची लहान मुले थकव्यामुळे रिक्षात बसून डुलकी देत असतात, तर काही मुले आपल्याच धुंदीत खेळत-मस्ती करत करतात. तर रिक्षावाले कुठे कट मारून जातात तर कुठे मुलांनी भरलेली रिक्षा सिग्नल तोडून नेतात. हे सगळ बघून काळजात धस्स होत. शाळकरी मुलांच्या वाहतुकीसाठी ऑटो रिक्षांबाबत स्पष्ट व कडक नियम आहेत का, याबाबत प्रश्न निर्माण होतो. प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. सुरक्षिततेचे ठोस नियम अमलात आणावेत व नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा आहे.

**प्रांजली ब्रम्हे**

## भारतीय व्यक्तीनिष्ठता कधी त्यागणार?

प्रख्यात फुटबॉलपटू लायोनेल मिस्सी यांचा कोलकत्ता शहरातील एका मैदानात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.फुटबॉलचे दैवत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मेस्सीला डोळे भरून पाहण्यासाठी जवळ जवळ ५० हजार लोक हजारो रुपये खर्च करून आले होते.आयोजकांच्या ढिसाळ नियोजनामुळे दोन तासाचा कार्यक्रम वीस मिनिटे मैदानात थांबून मेस्सी निघून गेले त्यामुळे चाहत्यांचा हिरमोड झाला. त्यांच्यातील निराशेचे रूपांतर संतापात झाले.चाहत्यांनी पूर्ण मैदानात गोंधळ घालत खुर्च्या तसेच अन्य साहित्याची तोडफोड केली.या वृत्ताला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात कुप्रसिद्धी मिळाली आणि भारताची प्रतिष्ठा धुळीला मिळाली. भारतीय समाजाला व्यक्तीनिष्ठता ही लागलेली सर्वात मोठी कीड आहे.खेळाडू, अभिनेते यांना डोक्यावर घेऊन नाचण्याचा प्रकार भारतीय समाजात जेवढा पाहिला मिळतो तेवढा अन्यत्र कोठेच पाहायला मिळत नसेल.व्यक्तिपूजेमुळे माणूस सारासार विवेक बुद्धी गमवतो आणि त्याचा उत्कर्ष ही थांबतो. वैयक्तिक हानी होण्यासह समाजाची हानी होते ती वेगळीच.एक सुसंस्कृत आणि शिस्तप्रिय समाज म्हणून भारतीय समाज जगात कधी ठसा उमटविणार? व्यक्तीनिष्ठ समाजामुळे राष्ट्राचा विकास खुंटतो तर तत्त्वनिष्ठ समाजामुळे राष्ट्राचा उत्कर्ष होतो.

**लीना गाडगीळ**

# यवतमाळ नगरपरिषद निवडणूक घोषणांचा पाऊस, आश्वासनांची सरबत्ती

## ‘विकासाचे स्वप्न’ वास्तविक मुंगेरीलाल चे स्वप्नच राहणार का?




जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - यवतमाळ शहरात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था नगरपरिषद निवडणुकीने अक्षरशः रणधुमाळीचे स्वरूप धारण केले होते. शहरातील प्रत्येक २९ प्रभागांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळत असून, नगराध्यक्ष पदासाठीही दिग्गजांनी मैदानात उडी घेत प्रचाराचा सपाटा लावला होता. रस्ते, पाणी, स्वच्छता, रोजगार, विकास अशी आश्वासनांची सरबत्ती करत नागरिकांसमोर ‘विकासाचे स्वप्न’ रंगवले जात होते. मात्र, या घोषणां आड दडलेले वास्तव आजही तितकेच विदारक आहे. की बहुदा ही सर्व आश्वासने मुंगेरीलाल यांच्या सपनाप्रमाणे नसावी. अशी चर्चा आता निवडणुकीच्या तोंडावर नागरिकांमधून होत आहे.

उमेदवारांकडून ‘आमच्याकडे सत्ता आहे, मनुष्यबळ आहे, व्हिजन आहे, निधी आणण्याची क्षमता आहे’ अशा आश्वासनांचे डोंगर उभे केले जात असताना, शहरातील रस्त्यांची अवस्था मात्र अत्यंत दयनीय आहे. अनेक प्रभागांमध्ये अजूनही खड्डेमय रस्ते, तुटलेले ड्रेनेज,अपुरा पाणीपुरवठा आणि मूलभूत सुविधांचा अभाव हेच वास्तव आहे. पिण्याच्या पाण्यासाठी आजही अनेक नागरिकांना वणवण भटकावे लागत आहे. विशेष म्हणजे, प्रचारासाठी उमेदवारांनी ऑटो रिक्षा, चारचाकी वाहने व हातगाड्या मोठ्या प्रमाणावर वापरल्या आहेत. मात्र, या वाहन चालकांकडून रोजचे मानधन देताना त्यांच्या अनुभवाकडे दुर्लक्ष केले जात आहे. प्रत्यक्ष रस्त्यावरून फिरताना खड्डे, खराब रस्ते, वाहतूक कोंडी, पाणी साचणे याचा अनुभव या चालकांना रोज येतो. किमान या चालकांशी संवाद साधून त्यांच्या अनुभवातून प्रभागातील नेमक्या समस्या जाणून घेण्याची तयारी उमेदवार दाखवतील का, हा खरा प्रश्न आहे. शहराचा सर्वांगीण विकास तर दूरची बाब किमान रस्ते, पाणी व स्वच्छता या मूलभूत गरजांवरही ठोस उत्तर देण्यात अनेक उमेदवार अपयशी ठरत असल्याचे चित्र आहे. विकासाच्या घोषणा करणाऱ्यांना विकास कधीच दिसत नाही आणि सामान्य नागरिकांनाही तो प्रत्यक्षात अनुभवता येत नाही, अशी तीव्र भावना मतदारांमध्ये आहे. दरम्यान, या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे गट, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी, मित्र पक्ष तसेच अपक्ष उमेदवार मोठ्या संख्येने रिंगणात उतरले आहेत. आजी-माजी मंत्री, आमदार आणि खासदारांनीही आपली प्रतिष्ठा पणाला लावत उमेदवार निवडीपासून प्रचारा पर्यंत रात्रंदिवस मेहनत घेतल्याचे चित्र आहे. या निवडणुकीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांचा मोठा सहभाग विविध पक्षांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एकूण नऊ महिला उमेदवार निवडणूक लढवत असून, नगराध्यक्ष पदासाठीही नऊ महिला व पाच इतर उमेदवार रिंगणात आहेत. नगरपरिषदेच्या २९ प्रभागांतून प्रत्येकी दोन नगरसेवक निवडले जाणार असून, एकूण ५८ नगरसेवकांची निवड होणार आहे.

या निवडणुकीत तब्बल २८९ उमेदवार आपले भवितव्य आजमावत आहेत. प्रभाग निहाय उमेदवारांची संख्या पाहिली तर स्पर्धेची तीव्रता स्पष्ट होते. प्रभाग क्रमांक १ मधून १०, प्रभाग क्रमांक २ मधून १८, प्रभाग क्रमांक ३ मधून १३, प्रभाग क्रमांक ४ मधून ९, प्रभाग क्रमांक ५ मधून ११, प्रभाग क्रमांक ६ मधून ८, प्रभाग क्रमांक ७ मधून तब्बल ५९, प्रभाग क्रमांक ८ मधून १४, प्रभाग क्रमांक ९ मधून १३, प्रभाग क्रमांक १० मधून १७, प्रभाग क्रमांक ११ मधून ९, प्रभाग क्रमांक १२ मधून ६, प्रभाग क्रमांक १३ मधून १२ आणि प्रभाग क्रमांक १४ मधून २० उमेदवार निवडणूक लढवत आहेत. उर्वरित प्रभागांतही अशीच अटीतटीची लढत आहे. सध्या सर्व उमेदवार जोरदार प्रचारात व्यस्त आहेत. काही श्रीमंत उमेदवार पैशाच्या जोरावर प्रचार करत असताना, सामान्य उमेदवार आपल्या कामाच्या अनुभवावर व थेट जन संपर्कावर विश्वास ठेवून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, खरा प्रश्न असा आहे की मतदार जाती, पैसा आणि प्रभावाला बळी पडणार की विवेक, कामगिरी आणि प्रामाणिक पणाच्या आधारे योग्य उमेदवार निवडणार? आज २० डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानानंतर २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार असून, या निवडणुकीतून कोण ‘वचनांचे ओझे’ घेऊन सत्तेत येणार आणि कोण ‘विकासाच्या कसोटीवर’ उतरणार, हे स्पष्ट होईल.

विजयी उमेदवारांनी किमान आपल्या वचन नाम्यांप्रमाणे प्रभागाचा विकास करून सामान्य नागरिकांचा लोकशाही व निवडून दिलेल्या प्रतिनिधीं वरील विश्वास टिकवावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. अन्यथा, ‘दूरचा डोंगर साजरा’ ठरण्याची वेळ येऊ नये, हीच यवतमाळकरांची मागणी आहे.

## नगरपरिषद निवडणूक पोलिंग पार्ट्या रवाना



यवतमाळ नगरपरिषद निवडणुकीसाठी आज जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रियेत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानासाठी आवश्यक निवडणूक साहित्य वितरित करण्यात आले. त्यानंतर सर्व पोलिंग पार्ट्या आपापल्या मतदान केंद्रांच्या ठिकाणी रवाना झाल्या. निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून सर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे. नगर परिषद यवतमाळ सार्वत्रिक निवडणूक २०२५ दि. २० डिसेंबर रोजी सकाळी ७:३० ते दुपारी ५:३० पर्यंत मतदान होणार आहे. आज दिनांक १९ डिसेंबर रोजी सर्व २४८ केंद्रावर मतदान पथके रवाना करण्यात आली.

# पुसद नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक मतमोजणीकरिता प्रशासन यंत्रणा सज्ज




पुसद - येथील नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासह १५ प्रभाग मधील ३१ सदस्य पदासाठी २ डिसेंबर रोजी मतदान झालेले एकुण ६३,२३२ मतदारापैकी ३९,१७० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानाची टक्केवारी ही ६१.९५% झाली आहे.

उद्या २१ डिसेंबर मतमोजणी व निकाल लागणार!

२१ डिसेंबर रोजी जाजु चौक शंकर नगर येथील दवाबाजार समोरील योगभवनात होईल. स्ट्रांग रूममध्ये कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.

मत मोजणीसाठी तयारी सुरू असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी आशिष बिजवल यांनी सांगितले.२१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होईल आणि दुपारी ३ वाजेपर्यंत सर्व निकाल जाहीर होतील. एकूण १२ फेऱ्या होतील आणि ७ टेबलवर मशीनमधील मतमोजणी होईल.

सर्वप्रथम, १ ते प्रभाग ७ प्रभागाची मतमोजणी होईल त्यानंतर प्रभाग८ ते प्रभाग १४ आणि शेवटी, फक्त प्रभाग १५ साठी मतमोजणी केली जाईल. सोबतच अध्यक्षपदाच्या उमेदवांचीही मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार आहे. यावेळी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस बंदोबस्तात राहणार आहे.यासाठी सर्व उमेदवार प्रतिनिधी त्याचा नागरिक यांनी सहकार्य करण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी असेच भिजवले यांनी केले आहे.

## वेचक

### भोजला आदिवासी विविध कार्यकारी संस्थेतून जिल्हा बँकेवर अनुकूल चव्हाण



पुसद : भोजला येथील आदिवासी विविध कार्यकारी संस्थेच्या संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली होती.त्या बैठकीमध्ये जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांच्या कार्यालयाचे एक पत्र प्राप्त झाले. त्या पत्रावर दि.१८ नोव्हेंबर २०२५ रोजी संस्थेच्या संचालक मंडळाची सभा दि.१७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान घेण्यात आली होती.त्यामध्ये जिल्हा बँकेवर प्रतिनिधी म्हणून अनुकूल विजयराव चव्हाण यांची सर्वानुमते निवड केली आहे. संस्थेचे भोजला येथील कार्यालयात बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीत सभापतीच्या अध्यक्षतेखाली विषयावर चर्चा व निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकच्या सन २०२५ ते २०३० या पाच वर्षाकरिता संचालक मंडळाच्या होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवार सूचक व अनुमोदक होण्यासाठी प्रतिनिधित्व अधिकार देण्यात आले आहे.अनुकूल चव्हाण हे संस्थेचे नियमित कर्जदार व सभासद असून त्यांची निवड करण्यात आली असल्याचे ठरावातून घोषित करण्यात आले आहे. सदर बैठकीला त्रिवेणी गणेश फोले, नानाराव खंडाळे, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर मोहकर, महेश धुमाळ, मनोहर धुळे, पंजाब इंगळे, दादाराव खानजोडे, पंजाब जटाळे, सदाशिव पांडे आदी उपस्थित होते.

### साहेबराव कांबळेंनी हिवाळी अधिवेशनात काँग्रेस गटनेत्यांकडे मांडल्या विधानसभा मतदार संघातील समस्या !



उमरखेड - नागपूर हिवाळी अधिवेशनात उमरखेड महागाव विधानसभा मतदार संघातील ज्वलंत समस्या सरकार दरबारी मांडण्यासाठी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस साहेबराव कांबळे यांनी विधानसभेतील काँग्रेस गटनेते विजय वडेट्टीवार यांच्याकडे समस्यांचे निवेदन शासनापर्यन्त पोहचविण्यासाठी साकडे घातले आहे. मागील विधानसभा निवडणुकीत निसटता पराभव स्वीकारावा लागला असला, तरी मतदारसंघाशी नाळ तुटू न देता नागरिकांच्या प्रश्नांसाठी, त्यांनी हिवाळी अधिवेशन काळात पूर्ण वेळ उपस्थित राहून आपल्या पक्षाच्या गटनेत्यांमार्फत मतदार संघातील अडचणी शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी पाठपुरावा करून याबाबत विधानसभा अध्यक्षांपर्यन्त मतदार संघातील समस्या मांडण्याची गळ घातली असल्याचे सामाजिक कार्यकर्ते साहेबराव कांबळे यांनी म्हटले आहे. प्रधानमंत्री आवास योजना, रमाई व शबरी घरकुल योजना तसेच गोठा अनुदानाचे हप्ते मागील अनेक महिन्यांपासून रखडले असून, त्यामुळे लाभार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेकांनी व्याजाने पैसे काढून घरकाम अर्धवट अवस्थेत ठेवले असल्याचे वास्तव त्यांनी शासनापर्यंत पोहोचविले. याशिवाय डिजिटल इंडिया, आयुष्यमान भारत, पीएम विश्वकर्मा, लाडकी बहीण, शेतकरी कर्जमाफी, आपले सरकार आदी योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या डाटा एन्ट्री ऑपरेटरचे मानधन मागील सहा महिन्यांपासून थकीत असल्याने त्यांनाही तातडीने दिलासा देण्याची मागणी त्यांनी काँग्रेसच्या विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांच्या मार्फत सरकारपर्यंत पोहोचविल्या आहेत. याशिवाय मतदारसंघातील जीर्ण रस्ते, शेतकऱ्यांवरील सहस्त्रकुंड प्रकल्पाचे घोंघावते संकट, वीज समस्या, इसापूर धरणाच्या पाण्याचे नियोजन, बंदी भागातील रस्ते व मूलभूत सुविधांचा प्रश्न अशा अनेक विषयांवर साहेबराव कांबळे यांनी नागरिकांचा आवाज अधिवेशनात काँग्रेस गटनेते विजय वडेट्टीवार यांच्या माध्यमातून शासनापर्यंत पोहोचवल्या आहेत.

### लोकशाही दिनानिमित्त उपजिल्हाधिकारी खत्री साहेबांचे जनतेला आव्हान

राळेगाव : तालुक्यातील नागरिकांसाठी लोकशाही दिन हा महत्त्वाचा दिवस असून, जनतेच्या तक्रारी व समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रशासन तत्पर आहे. याच अनुषंगाने, उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी खत्री साहेब यांनी तालुक्यातील समस्त नागरिकांना आवाहन केले आहे की, येणाऱ्या लोकशाही दिनाचे आयोजन दिनांक 17 मार्च 2025 रोजी राळेगाव तहसील कार्यालयात करण्यात आले आहे. या दिवशी नागरिकांनी आपल्या विविध तक्रारी, अडचणी व समस्या घेऊन तहसील कार्यालयात उपस्थित राहावे, जेणेकरून प्रशासनाच्या माध्यमातून त्यावर तातडीने योग्य तो निर्णय घेता येईल. प्रशासन लोकशाही मूल्यांप्रती वचनबद्ध असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असेही खत्री साहेबांनी सांगितले. तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने तहसील कार्यालयात उपस्थित राहून आपले प्रश्न मांडावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# महागाव खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष विशाल पवार यांची जिल्हा मध्यवर्ती बँकेचे प्रतिनिधी म्हणून निवड

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - तालुका खरेदी-विक्री सहकारी संस्थेचे विद्यमान अध्यक्ष तथा युवा नेतृत्व म्हणून ओळख असलेले विशाल पवार यांची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याने महागाव तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या निवडीमुळे सहकार क्षेत्रात नव्या विचारांना आणि गतिमान नेतृत्वाला चालना मिळणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

विशाल पवार हे गेल्या अनेक वर्षांपासून सहकार, कृषी व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून त्यांनी महागाव तालुका खरेदी विक्री शेतकी संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले आहे. शेतमालाला योग्य दर, खते-बियाण्यांचा वेळेवर पुरवठा, तसेच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना सहकार्य करण्यासाठी त्यांनी राबवलेल्या उपक्रमांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला आहे. त्यांच्या कार्यकाळात संस्थेची आर्थिक शिस्त, पारदर्शक व्यवहार आणि विश्वासार्हता वाढल्याचे चित्र दिसून येते. मध्यवर्ती जिल्हा सहकारी बँक ही जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानली जाते. शेतकरी, शेतमजूर, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक बळ देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ही बँक करते. अशा प्रतिष्ठित संस्थेच्या संचालक मंडळावर विशाल पवार यांची निवड होणे, ही महागाव तालुक्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. त्यांच्या निवडीमुळे तालुक्यातील सहकारी संस्था आणि बँक यांच्यात समन्वय अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निवडीनंतर तालुक्यातील विविध सहकारी संस्था, राजकीय, सामाजिक व कृषी क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकऱ्यांनी विशाल पवार यांचे अभिनंदन केले आहे. अनेकांनी प्रत्यक्ष भेट घेऊन तसेच दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या कार्यालयात जल्लोषाचे वातावरण असून कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंद व्यक्त केला. निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना विशाल पवार म्हणाले, माझ्यावर विश्वास दाखवून मला मध्यवर्ती जिल्हा बँकेच्या संचालकपदी संधी दिल्याबद्दल मी सर्व सभासद, सहकारी बांधव आणि मार्गदर्शकांचे शेतकऱ्यांचे मनापासून आभार मानतो. शेतकरी, ग्रामीण भागातील नागरिक आणि सहकार क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा माझा संकल्प आहे. बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि पारदर्शक कारभारासाठी मी कटिबद्ध राहीन. विशाल पवार यांच्या निवडीमुळे सहकार क्षेत्रात सकारात्मक बदल घडतील, शेतकऱ्यांचे हित अधिक प्रभावीपणे जपले जाईल आणि जिल्हा बँकेचा विश्वासार्ह व लोकाभिमुख कारभार अधिक मजबूत होईल, अशी आशा सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

# काळी (दौ.खान) वनपरिक्षेत्रातील असंख्य वृक्षतोडीची चौकशी कधी होणार ?

## परवाना दुसरीकडे, वृक्षतोड आदिवासींच्या जमिनीतून वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - विधानसभा क्षेत्रात येत असलेल्या काळी दौ. वनपरिक्षेत्रातील माळवागद येथील शेतकऱ्यांच्या शेतातील ३० ते ३५ झाडे तोडण्याचा परवाना घेण्यात आला. मात्र लगतच्या आदिवासींच्या शेतजमिनीवरील ८० ते ९० झाडे तोडण्याचा प्रताप घडल्याची ओरड आहे. या प्रकरणी काही सामाजिक कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या तक्रारी केल्या असून त्यावर आता वनविभाग कुठली चौकशी करणार, याकडे लक्ष लागले आहे.

पुसद वन विभागाअंतर्गत सध्या वन कायद्याची पायमल्ली होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. काळी दौलत वनपरिक्षेत्राअंतर्गतच्या माळवाकदमधील वृक्षतोडीचा विषय बराच चर्चेत आला. परवाना एका जागेवरचा मात्र वृक्षतोड आदिवासींच्या शेतजमिनीवरील असा हा प्रकार आहे. यामध्ये वनरक्षकाला बळीचा बकरा बनविण्याचा डाव आहे. विशेष म्हणजे ही वृक्षतोड अचानक झालेली नाही. तर गेल्या अनेक दिवसांपासून टप्याटप्प्याने केली जात आहे. सुरुवातीला ३० ते ३५ झाडे तोडण्यात आली, त्यानंतर ही संख्या वाढत जाऊन तब्बल ९० हून अधिक झाडांची तोड झाल्याची माहिती आहे. हा सर्व प्रकार वनविभागाच्या नाकाखालून घडत असताना संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याने संशय अधिक गडद झाला आहे. वृक्षतोड करणाऱ्यांनी आधी झाडे तोडून ती जागेवरच साठवून ठेवली, त्यानंतर हळूहळू ट्रॅक्टर व वाहनांच्या साहाय्याने वाहतुक केल्याचे बोलले जाते. ही लाकडे सिंगदनंतर हिवळणी परिसरात हलविण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेत वनविभागाचा एकही कर्मचारी घटनास्थळी फिरकला नाही. त्यामुळे 'ही अवैध वृक्षतोड कोणाच्या आशीर्वादाने घडली, असा थेट सवाल उपस्थित होत आहे. काळी दौ. वनपरिक्षेत्रात घडलेल्या सागवान झाडांच्या कत्तल प्रकरणाचे खापर वरिष्ठांनी वनरक्षकावर फोडल्याची माहिती आहे. आपण कारवाईच्या चौकटीत येऊ नये यासाठी दोषींनी राजकारणाचा आधार घेतल्याची माहिती समोर येत आहे. प्रामुख्याने पुसद विभागात वन विभागातील काही अधिकारी राजकारण्यांचे हस्तक बनले असून त्याआधारे वनविकासाच्या कामासह इतरही वृक्षतोडसारख्या प्रकरणात नियमांची पायमल्ली होत असल्यामुळे काळी दौ. वनपरिक्षेत्र पुन्हा एकदा अवैध वृक्षतोडीने वादग्रस्त ठरले आहे. आरएफओंच्या सदोष कार्यपद्धतीमुळे व कर्तव्याची जवाबदारी न पार पाडल्याने वनरक्षकाला बळ मिळाले. तेव्हाच असा वृक्षतोडीसारखा अफलातून प्रकार घडला. याला वनरक्षकाबरोबर आरएफओसह डीएफओ सुद्धा तेवढेच जबाबदार असल्याचे बोलल्या आहे.

# मुख्याध्यापकाने परस्पर विकले शाळेचे भंगार साहित्य ईजनी येथील जिल्हा परिषद शाळेतील प्रकार

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - ग्राम पंचायत व शाळेत मागील अनेक वर्षांपासून जमा झालेले भंगार,इलेक्ट्रॉनिक साहित्य कोणतीही परवानगी न घेता परस्पर विकुन मुख्याध्यापकाने आपले उखळ पांढरे करून घेतल्याचा प्रकार ईजनी येथे उघडकीस आला असुन ग्राम पंचायत पदाधिकाऱ्यांनी या मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

महागाव तालुक्यातील ईजनी येथील जिल्हा परिषद शाळेत मागील काही वर्षांपासून शाळेचे व ग्राम पंचायतचे मोटार पंप,लोखंडी,प्लास्टिक पाईप, एंगल, व्यायाम करण्याचे साहित्य,लोखंडी बेंच, टिन पत्रे, प्लास्टिक व लोखंडी कचरा कुंडी ,पाईप लाईट,हात पंपाचे साहित्य यांसह ईतर जमा झाले लाखो रुपये किंमतीचे भंगार साहित्य शाळेचे मुख्याध्यापक यांनी ग्राम पंचायत तसेच वरिष्ठांना कोणतीही पुर्व सुचना किंवा परवानगी न परस्पर दिनांक १७डिसेंबर व १८डिसेंबर २०२५ या दिवशी टाटा एस या वाहनाने बाहेर गावी नेवून विकले.मुख्याध्यापकांच्या या भंगार विक्री कारनाम्याची माहिती गावकऱ्यांना व ग्राम पंचायत पदाधिकाऱ्यांना झाल्यानंतर त्यांनी शुक्रवार(दि.१९डिसेंबर) रोजी सकाळी शाळेत जावून याबाबत मुख्याध्यापकांकडे याबाबत विचारणा केली असता ते साहित्य तुमचेच होते याचा काय पुरावा आहे? तुम्ही मला विचारणारे कोण,तुम्हाला माझ्याविरोधात कोठे तक्रार करायची ते करा कारण वरिष्ठ माझ्यासोबत असल्याचे उलट उत्तर त्यांनी ग्राम पंचायत पदाधिकारी व गावकऱ्यांना देवून धुडकावून लावले त्यामुळे संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी अखेर गटविकास अधिकारी कदम यांच्याकडे तक्रार करून परस्पर साहित्य विकणाऱ्या मुख्याध्यापकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी शिवसेना(उबाठा) तालुका प्रमुख तथा ग्राम पंचायत सदस्य रविंद्र भारती, सौ.अनुराधा संदेश वानखेडे, सतीश हराळे, सौ.संतोष तुळशीराम वाघमारे यांच्यासह गांवकरी उपस्थित होते. शाळेचे किंवा ग्राम पंचायत चे जुने साहित्य विकण्यापूर्वी वरिष्ठ स्तरावरून परवानगी घेणे आवश्यक असताना मुख्याध्यापकाने परस्पर ते साहित्य विकल्याने त्यांना असे करण्यास वरिष्ठांचे तर पाठबळ नाहीना याची चौकशी होणे गरजेचे आहे. गावकऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवर गटविकास अधिकारी काय कारवाइ करतात याकडे सर्व गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# वाऱ्हा-१ मधून अवैध रेतीउपसा धडाक्यात

## महसूल विभागाचे कर्मचारी व तलाठींचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

जनमाध्यम प्रतिनिधी

राळेगाव - तालुक्यातील वाऱ्हा-१ परिसरात अवैध रेतीउपसा मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची गंभीर माहिती समोर आली आहे. नियमबाह्यरित्या सुरू असलेल्या या उत्खननाबद्दल स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून सातत्याने तक्रारी होत असल्या तरी महसूल विभागाकडून ठोस कारवाई होत नाही, अशी भावना ग्रामस्थांत निर्माण झाली आहे.

स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, महसूल विभागाचे काही कर्मचारी वाऱ्हा गावातीलच असल्याने त्यांना प्रत्येक हालचालीची पूर्ण माहिती मिळत असते. तरी देखील कोणतीही प्रभावी कारवाई केली जात नसल्याने जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा संशय नागरिकांमध्ये वाढत आहे. यातील सर्वात चिंतेची बाब म्हणजे, वाऱ्हा गावातीलच एक जबाबदार नागरिक स्वतः अवैध रेतीउपशात सहभागी असल्याचे आरोप ग्रामस्थांनी केले आहेत.

त्यामुळे गावातील प्रशासन व स्थानिक महसूल यंत्रणेच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.रेतीउपसा बंदी असताना देखील सर्रासपणे ट्रॅक्टरद्वारे वाहतूक सुरू असल्याचे नागरिकांनी सांगितले.

रात्री उशिरा किंवा पहाटेच्या वेळी उत्खनन अधिक सुरू असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. यामुळे नदीपात्रासह पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असून भविष्यात पूरपरिस्थितीची शक्यता वाढणार असल्याचे पर्यावरण प्रेमींनी सांगितले.गावातील जबाबदार पदाधिकारी, महसूल अधिकारी, तलाठी, ग्रामपंचायत प्रतिनिधी यांनी याबाबत तातडीने बैठक घेऊन कठोर भूमिका घेणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की अवैध उत्खनन थांबवण्यासाठी विशेष पथक नेमावे गावातील संबंधित महसूल कर्मचाऱ्यांची चौकशी करावी दोषींवर गुन्हे नोंदवून कठोर दंडात्मक कारवाई करावी, अवैध रेतीउपसा हा केवळ महसुलाचे नुकसान नाही तर पर्यावरणाचा मोठा प्रश्न असल्याने तत्काळ आणि प्रभावी कारवाईची मागणी सर्वत्र होत आहे.

# खोटे दस्तऐवज सादर करणे पडले महागात..!, कंत्राटदारा विरोधात गुन्हे दाखल

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील बेंबळा सिंचन प्रकल्पातील गंभीर आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अखेर यवतमाळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) तक्रारीवरून मोठी कारवाई करण्यात आली असून खोटे व बनावट अनुभव प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक करत कोट्यवधी रुपयांचे कंत्राट मिळविल्या प्रकरणी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात कंत्राटदारां विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणी सतीश दत्तात्रेय भोयर (रा. सत्यनारायण ले-आऊट, वडगाव रोड, यवतमाळ), अभय कुमार नथुजी पनवेलकर (रा. नागपूर) आणि सुमित रमेश चंद बाजोरिया (रा. दर्डा नगर) यांच्याविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम 461, 466, 471 व 34 अंतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील जलसिंचन प्रकल्पांमधील अनियमिततेबाबत नागपूर उच्च न्यायालयात सन 2012 मध्ये जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी करताना 12 डिसेंबर 2014 रोजी उच्च न्यायालयाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अप्पर महासंचालकांना उघड चौकशीचे आदेश दिले होते. त्यानंतर 17 जानेवारी 2018 च्या आदेशान्वये बेंबळा सिंचन प्रकल्प, तालुका बाबुळगाव, जिल्हा यवतमाळ येथील कामांची सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले. पोलीस अधीक्षक, एसीबी अमरावती यांच्या आदेशानुसार बेंबळा मुख्य कालवा किलोमीटर 85 ते 86 या टप्प्यातील माती व बांधकाम निविदेची चौकशी करण्यात आली. सदर कामाची अंदाजित किंमत 364.63 लक्ष रुपये इतकी होती आणि हे काम सन 2006–2007 मध्ये निविदेद्वारे सुचित करण्यात आले होते. या निविदेसाठी सहा कंत्राटदारांनी प्रपत्र खरेदी केले होते, त्यापैकी पाच कंत्राटदारांनी निविदा सादर केली होती. कामाची किंमत तीन कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याने कंत्राटदारांची निविदा भरण्याची पूर्व सक्षमता तपासणी आवश्यक होती. यासाठी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांनी निविदा पूर्व सक्षमता संचास मंजुरी दिली होती आणि त्याकरिता समिती गठित करण्यात आली होती.

मूल्यांकन तक्त्यानुसार अटी पूर्ण केल्याने वैष्णवी कन्स्ट्रक्शन नागपूर, बाजोरिया कन्स्ट्रक्शन कंपनी, टेक्सन बिल्डर्स पुणे आणि एस. डी. भोयर अँड कंपनी, यवतमाळ हे कंत्राटदार सर्वात कमी दराची बोली लावल्याने यशस्वी ठरले आणि त्यांना कामाचे कंत्राट मंजूर करण्यात आले. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, एस. डी. भोयर अँड कंपनी या संयुक्त उपक्रमामार्फत एकूण 18 अनुभव प्रमाणपत्रे निविदेसोबत सादर करण्यात आली होती. यामध्ये सतीश दत्तात्रेय भोयर यांनी सादर केलेली 13 आणि पी. के. कन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर यांनी सादर केलेली 5 अनुभव प्रमाणपत्रे होती. या प्रमाणपत्रांची सत्यता पडताळणी करण्यासाठी नागपूर येथील सुधार प्रन्यास कार्यालयाकडे चौकशी करण्यात आली असता पी. के. कन्स्ट्रक्शन कंपनीने सादर केलेली अनुभव प्रमाणपत्रे बनावट व खोटी असल्याचे स्पष्ट झाले. त्या संदर्भातील अधिकृत अहवाल संबंधित कार्यालयाने यवतमाळ एसीबी कार्यालयाकडे सादर केला.बनावट कागदपत्रे व खोट्या स्वाक्षऱ्यांच्या आधारे शासनाची फसवणूक करून कंत्राट मिळविण्यात आल्याचे चौकशीत स्पष्ट झाल्यानंतर यवतमाळ एसीबीचे पोलीस निरीक्षक अभय मुरलीधर आष्टेकर यांनी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात सविस्तर तक्रार नोंदविली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संबंधित आरोपींविरोधात गुन्हे दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणात कंत्राट मंजुरी प्रक्रियेत सहभागी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका तपासली जाण्याची शक्यता असून पुढील कारवाई होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# राळेगाव पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंद्यांचा सुळसुळाट; नागरिकांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका

जनमाध्यम प्रतिनिधी

राळेगाव - राळेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील अनेक गावांमध्ये खुलेआम बेकायदेशीर व्यवसायांना चालना मिळत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. अवैध देशी दारूची विक्री, वरली मटका तसेच अवैध वाळू वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असून त्यामुळे संपूर्ण परिसरात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेषतः राळेगाव शहरातील मुख्य जुना ट्रॅव्हल्स पॉईंट, मध्यवर्ती बँक व वना बँक परिसरात दिवस-रात्र अवैध देशी दारू व गांजाची सर्रास विक्री सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या परिसरालगतच आदिवासी मुलींचे शासकीय वस्तीगृह तसेच क्रीडा संकुल आहे. या क्रीडा संकुलात दररोज लहान वयातील तसेच किशोरवयीन मुले-मुली सरावासाठी ये-जा करतात. मात्र रात्रीच्या वेळी परिसरात अंधार असतो आणि मद्यपी रस्त्यावरच बसून दारू पितात. दारूच्या नशेत हे मद्यपी रस्त्यावर उभे राहून अश्लील शिवीगाळ करणे, भांडणे करणे असे प्रकार करत असल्याने खेळाडू मुला-मुलींना नाहक मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. याचा अल्पवयीन मुला-मुलींवर विपरीत परिणाम होत असल्याची तीव्र चिंता पालक वर्गातून व्यक्त होत आहे. यापूर्वी नवोदय क्रीडा मंडळाचे ज्येष्ठ खेळाडू व माजी सैनिक गुरुदास नगराळे यांनी यासंदर्भात निवेदन तयार करून पहिले त्या व्यवसायिकांना समज दिला होता. त्यानंतर काही दिवस अवैध व्यावसायिकांनी आपले धंदे बंद ठेवले होते. मात्र केवळ दोन-चार दिवसांनंतर पुन्हा एकदा या अवैध व्यवसायांना जोर चढल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. या संपूर्ण प्रकाराकडे राळेगाव पोलीस स्टेशन कठोर कारवाई करून अंकुश लावणार का, की हे अवैध धंदे पोलीस प्रशासनाच्या मूक संमतीने सुरू आहेत का, असा गंभीर प्रश्न आता नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

# आंतरराष्ट्रीय एआय परिषद 'ICAIISD'२०२५ चा उद्घाटन





**अमरावती/का.प्र.**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे आयोजित ICAIISD'2025 – International Conference on AI Innovations for Societal Development या आंतरराष्ट्रीय परिषदेचा उद्घाटन समारंभ १९ डिसेंबर रोजी अत्यंत शिस्तबद्ध, अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. देश-विदेशातील संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, उद्योग प्रतिनिधी आणि विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे उद्घाटन सत्राला विशेष महत्त्व प्राप्त झाले.उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. आशिष महल्ले यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून संशोधन, नवोन्मेष आणि समाजोपयोगी तंत्रज्ञान यांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणे हेच या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अशा आंतरराष्ट्रीय परिषदांमुळे विद्यार्थ्यांना जागतिक संशोधन प्रवाह समजतात तसेच उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील दुवा अधिक दृढ होतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## डॉ. फणिंद्र कुमार यलवर्थी यांचे डिजिटल हेल्थवर प्रभावी की-नोट भाषण

प्रमुख पाहुणे समीर सावरकर यांनी एआय व डिजिटल हेल्थ क्षेत्रातील दोन दशकांहून अधिक अनुभव मांडत मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील आरोग्यसेवा सक्षम करण्यासाठी एआय आधारित निदान व स्क्रीनिंग तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी नमूद केले. 'उत्पादन' आणि 'मार्केट-रेडी उत्पादन' यातील फरक स्पष्ट करत, योग्य मार्गदर्शन व निधी उपलब्ध झाल्यास विद्यार्थी नवोन्मेषक प्रभावी स्टार्टअप्स उभारू शकतात, असे त्यांनी सांगितले.एसीएम नागपूर प्रोफेशनल चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. रविंद्र केसकर यांनी एआय आणि डेटा विश्लेषणाच्या वाढत्या महत्त्वावर प्रकाश टाकला. केवळ मॉडेल तयार करणे नव्हे, तर सखोल निरीक्षण आणि विश्लेषण हे संशोधनाचे खरे बलस्थान असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भविष्यात एसीएमच्या सहकार्याने परिषद आयोजित करण्याची तसेच महाविद्यालयात एसीएम स्टुडंट चॅप्टर स्थापन करण्याची सूचना त्यांनी केली.डॉ. निरंजन जोशी यांनी नवोन्मेष व समाजविकास या संकल्पनांवर भर देत, अभियंत्यांनी तांत्रिक ज्ञानासोबत सामाजिक जाणिवा विकसित करणे आवश्यक असल्याचे नमूद केले. आरोग्य, कृषी आणि पर्यावरण क्षेत्रातील नवकल्पनांना मिळणाऱ्या पाठबळाचा त्यांनी उल्लेख केला. यावेळी Book of Abstract चे औपचारिक प्रकाशन करण्यात आले.परिषदेतील विशेष सत्रात प्रा. डॉ. फणिंद्र कुमार यलवर्थी (सीडीएस विभाग, आयआयएससी, बंगळुरू) यांनी डिजिटल हेल्थ, कृत्रिम बुद्धिमत्तेतील आव्हाने आणि भविष्यातील संधी यांवर प्रभावी की-नोट ॲड्रेस दिला. चार औद्योगिक क्रांती, ग्राहककेंद्रित जगतातील एआयची भूमिका, आरोग्य क्षेत्रातील अंमलबजावणीतील अडचणी, एज कम्प्युटिंग, नॉन-कम्युनिकेबल आजार आणि 'थ्री डी' संकल्पनेचे महत्त्व त्यांनी सविस्तरपणे मांडले. की-नोट सत्रानंतर झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. यलवर्थी यांनी अभ्यासपूर्ण उत्तरे दिली. या सत्रामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल हेल्थ आणि एआयच्या भविष्यातील दिशेबाबत स्पष्टता मिळाली. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजन समितीचे समन्वयक डॉ. शंतनु लोही यांनी सर्व मान्यवर, वक्ते, आयोजन समिती, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. राष्ट्रगीताने उद्घाटन समारंभाची सांगता झाली.

---

**डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे**

# आठ विद्यार्थी विद्यापीठ गुणवत्ता यादीत



**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२५ परीक्षेमध्ये डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयाचे आठ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असून दोन विद्यार्थ्यांनी संपूर्ण विद्यापीठ यादीतून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय हे गुणवत्तेची खाण म्हणून ओळखले जाणारे विद्यापीठ क्षेत्रातील एकमेव विधी महाविद्यालय आहे. यावर्षी देखील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची परंपरा कायम राखत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आपला दबदबा कायम ठेवला आहे.

एल.एल.एम या दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उन्हाळी परीक्षेत डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाची कुमारी विशाखा शेखर बिडवाई हिने संपूर्ण गुणवत्ता यादीत प्रथम स्थान पटकावले आहे.

तर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत याच महाविद्यालयाची एलएलबी पाच वर्षीय अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी कुमारी साक्षी भरत कुपारेल हिने देखील प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. यासोबतच पाच वर्षीय अभ्यासक्रमाच्या कृणाली वासुदेव चालक हिने पाचवा क्रमांक, ऋषिकेश श्याम काळकर याने गुणवत्ता यादीत आठवा क्रमांक तसेच आदित्य राघवेंद्र उपाध्याय याने विद्यापीठाचा गुणवत्ता यादीत दहावा क्रमांक प्राप्त केला आहे.

एल.एल.बी तीन वर्षीय अभ्यासक्रमांमधून वैजयंतीराजे विश्वास काळे हिने गुणवत्ता यादीत तृतीय क्रमांक, शिल्पा राजू गुल्हाने हिने सातवा क्रमांक आणि योगेश रामकृष्ण सोळंके यांनी दहावा क्रमांक प्राप्त करत विद्यापीठ गुणवत्ता यादीत आपले स्थान प्राप्त केले.

गुणवंत विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ वर्षा देशमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

---

# १६ हजार सरकारी कार्यालयांना लागले महावितरणचे स्मार्ट मीटर

## मीटर पूर्णत: प्रमाणित, अचूक आणि मोफत



**अमरावती/का.प्र.**

महावितरणच्या अमरावती परिमंडळाअंतर्गत येत असलेल्या १५ हजार ९६५ शासकीय कार्यालयांना महावितरणचे स्मार्ट ( टिओडी ) मीटर लावण्यात आले आहे. स्मार्ट मीटर हे पूर्णत: प्रमाणित असून अत्याधूनिक तंत्रज्ञानावर आधारीत आहे. त्यामुळे प्रत्येक महिन्याचे मीटर वाचन स्वंयचलीत पध्दतीने मीटरव्दारेच होणार असल्याने सरासरी वीजबिल, मीटर रिडींग झाले नाही, अशा तक्रारी शुन्य होवून वीज ग्राहकांना अचूक आणि वेळेत वीज बिल मिळणार आहे.

राज्यात कृषी ग्राहक वगळता सर्वच वर्गवारीतील वीज ग्राहकांना स्मार्ट (टिओडी) मीटर लावण्यात येत आहेत. यात शासकीय कार्यालयाचा देखील समावेश आहे. नवतंत्रज्ञानावर आधारीत असलेले हे मिटर तांत्रिकदृष्या अधिक स्मार्ट असले तरी हे मीटर मोफत बसविण्यात येत आहे, त्यामुळे याचा वीज ग्राहकांना कुठलाच आर्थिक भुर्दंड बसणार नाही. शिवाय या मीटरमध्ये मानवी हस्तक्षेपाला वाव नाही.

अमरावती परिमंडळात टप्पाटप्प्याने सर्वच वर्गवारीतील (कृषी ग्राहक वगळून) वीज ग्राहकांना स्मार्ट (टिओडी) मीटर बसविण्यात येत असून, सुरूवातीच्या काळात सरकारी कार्यालये, सरकारी निवास स्थाने, मोबाईल टॉवर, नादुरूस्त असलेले मीटरच्या ठिकाणी हे मीटर बसविण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. याशिवाय नविन वीज जोडणी देतांनाही स्मार्ट (टिओडी) मीटर बसविण्यात येत असून सोलर नेट मीटरींगसाठी त्याचा वापर करण्यात येत आहे.

परिमंडळात विविध शासकीय कार्यालयात बसविण्यात आलेल्या १५ हजार ९६५ मीटरपैकी अमरावती जिल्ह्यात ७ हजार ७०६ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ८ हजार २५९ शासकीय कार्यालयांना स्मार्ट (टिओडी) मीटर बसविण्यात आले आहे.

स्मार्ट (टिओडी) मीटर हे अत्याधूनिक तंत्रज्ञानावर आधारीत असल्याने ग्राहकांना वीज वापराचे अचूक वीजबिल मिळणार आहे. तसेच मोबाईल एप्लिकेशनच्या माध्यमातून प्रतितासाचा वीज वापर कळतो, त्यामुळे वीज वापरावर नियंत्रण मिळविण्यास मदत होते. त्यामुळे एकंदरीत वीज ग्राहकांसाठी फायद्याचे असणारे स्मार्ट ( टिओडी) मीटर लावण्यास वीज ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.

---

# राज्यातील शिक्षकांना आता केंद्राच्या 'ॲप'चा ताप




**अमरावती/का.प्र.**

राज्य सरकारच्या शिक्षण विभागाच्या आदेशानुसार राज्यातील शाळांचे 'जिओ टॅगिंग' करण्यात आल्यानंतर आता केंद्र सरकारच्या ॲपसाठी पुन्हा 'जिओ टॅगिंग' करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे राज्यातील शिक्षकांना आता केंद्र सरकारच्या ॲपचा ताप सहन करावा लागणार आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव यांनी परिपत्रकाद्वारे विभागीय उपसंचालक, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिकांचे आयुक्त यांना शाळांच्या 'जिओ टॅगिंग'बाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, शाळेच्या ठिकाणाची (अक्षांश रेखांश) अचूक माहिती मोबाइल ॲपद्वारे नोंदवण्यासाठी 'यूडायस प्लस जीआयएस कॅप्चर मोबाइल ॲप' विकसित करून उपलब्ध करण्यात आले आहे.केंद्र सरकारच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने ते तयार केले आहे.या ॲपद्वारे संगणकीकृत केलेल्या माहितीचा उपयोग केंद्र, राज्य, जिल्हा, तालुका स्तरावर प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी, नियोजन, शैक्षणिक साधने, धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, तसेच आलेखात्मक विश्लेषण करण्यासाठी होणार आहे. हे ॲप अँड्राइड आणि आयओएस प्रणाली असलेल्या मोबाइलवर उपलब्ध करून देण्यात आले आहे.शाळेच्या मुख्याध्यापकांनी मोबाइलमध्ये 'यूडायस प्लस जीआयएस कॅप्चर मोबाइल ॲप' घेऊन 'यूडायस'च्या लॉगिन आयडी आणि पासवर्डद्वारे मोबाइल ॲपमध्ये जाऊन शाळेच्या ठिकाणाची माहिती अचूक नोंदवावी. जिल्ह्यातील सर्व शाळांना 'यूडायस प्लस जीआयएस कॅप्चर मोबाइल ॲप'द्वारे शाळेच्या ठिकाणाची माहिती मार्गदर्शक सूचनांनुसार तत्काळ नोंदवण्यासाठी कळवण्यात यावे, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.काही महिन्यांपूर्वी राज्यातील शाळा आणि अंगणवाड्यांचे 'जिओ टॅगिंग' करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेऊन शाळांना जिओ टॅगिंग करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार शिक्षक, मुख्याध्यापकांनी 'जिओ टॅगिंग'ची प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र, आता केंद्र सरकारच्या ॲपसाठी मुख्याध्यापक, शिक्षकांना तेच काम पुन्हा करावे लागणार असल्याचे चित्र आहे.

'यूडायस'मध्ये प्रत्येक शाळेचे ठिकाण, भौतिक सुविधांविषयी माहिती आधीच अद्ययावत केली आहे. आता 'यूडायस प्लस जीआयएस कॅप्चर ॲप'च्या माध्यमातून पुन्हा शाळेचे ठिकाण, भौतिक सुविधांची माहिती देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यासाठीचे ॲप शिक्षकांना स्वतःच्या मोबाइलमध्ये घ्यावे लागणार आहे.

---

# आजपासून तिसरे परिवर्तन विचारवेध जिल्हा साहित्य संमेलन

**अमरावती/का.प्र.**

मराठी भाषा विभाग,महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ ,मुंबई यांच्या अनुदानातून आयोजित तिसरे परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन उद्या पासून स्व. रामचंद्रजी पोटे साहित्य नगरी,अभियंता भवन, शेगाव नाका अमरावती येथे होणार असून या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी जेष्ठ साहित्यिक व विचारवंत,साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक तथा ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके,उदघाटक सुदर्शनजी गांग (जैन) विश्वस्त अखिल भारतीय जैन संघटना पुणे, तर स्वागताध्यक्ष जेष्ठ साहित्यिक, स्तंभलेखक व विचारवंत डॉ. श्यामसुंदर निकम उपस्थित असतील.शनिवार २० डिसेंबर रोजी सुरु होणाऱ्या साहित्य संमेलनाची सुरुवात ग्रंथदिंडीने होणार असून संमेलनाध्यक्षांच्या हस्ते ग्रंथपूजन होऊन संमेलनाची यथोचित सुरुवात होईल.ग्रंथदिंडीमध्ये प्रमुख अतिथी म्हणून मा.विलास मराठे अध्यक्ष विदर्भ साहित्य संघ अमरावती,अतुल वर वरिष्ठ पोलीस निरीक्षक गाडगे नगर पो. स्टे. अमरावती, श्री गोविंद कासट, प्रदीप जैन आदि मान्यवर उपस्थित राहतील.

यानंतर संमेलनाचे यथोचित उदघाटन मा. सुदर्शनजी गांग(जैन) यांचे हस्ते, संमेलनाध्यक्ष मा. वसंत आबाजी डहाके, स्वागताध्यक्ष डॉ. श्यामसुंदर निकम,विशेष अतिथी डॉ.अविनाश आवलगावकर, कुलगुरू मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर, प्रमुख अतिथी मा.प्रवीणभाऊ पोटे,डॉ. प्रभा गणोरकर,डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. रा. गो. चवरे,डॉ. गजानन कोटेवार,इंजि. सुनील राठी,इंजि. राम विघे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडेल.त्यानंतर महाराष्ट्रातील प्रख्यात स्त्रीवादी लेखिका संजीवनी तडेगावकर यांची प्रकट मुलाखत आमने सामने डॉ. शोभा रोकडे घेतील.मराठी भाषेला अभिजात दर्जा व लेखकांपुढील आव्हाने या विषयावरील प्रा. मधुकर केचे स्मृती परिसंवादाचे अध्यक्ष मा. डॉ. काशिनाथ बऱ्हाटे तर प्रमुख अतिथी मा अविनाश दुधे, मा. रजिया सुलताना, राजेंद्र राऊत असतील.प्रसिद्ध गझलकार नितीन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कविता डवरे स्मृती गझल मुशायऱ्याचे प्रमुख अतिथी देविका देशमुख,नितीन पवित्रकार,अनंत नांदुरकर,ललिता देशमुख हे असतील.जेष्ठ वऱ्हाडी कवी आबासाहेब कडू यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कविवर्य तुळशीराम काजे स्मृती वऱ्हाडमाती या कविसंमेलनाला प्रमुख अतिथी मा. राजा धर्माधिकारी, मा. हिम्मत ढाळे,मा. प्रमोद काकडे,मा. अरुणकुमार बुंदेले,खुशाल गुल्हाने यांची उपस्थिती असेल.त्यानंतर शिवमती शोभना देशमुख प्रस्तुत सैनिकाच्या आईचा हृदयस्पर्शी एकपात्री प्रयोग सादर होईल.

रविवार २१ डिसेंबर २०२५ रोजी स्व. उद्धव शेळके स्मृती बालकुमार कविसंमेलनाने साहित्य संमेलनाची सुरुवात होईल. या कविसंमेलनाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. मंदा नांदुरकर, तर प्रमुख अतिथी मा. गणेश भाकरे, मा.विशाल कन्हेरकर, मा. कांचनताई उल्हे, ॲड. डॉ. नीता कचवे,उपस्थित राहतील. सुप्रसिद्ध साहित्यिक मा. विलास सिंदगीकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या मिर्झा रफी अहमद बेग स्मृती कथाकथन या सत्राचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सतीश तराळ,शंकर घोरसे,सुरेश आकोटकर,प्रभाकर तांडेकर यांची उपस्थिती असेल.डॉ. अशोक पळवेकर यांच्या अध्यक्षतेत कविवर्य ज्ञानेश्वर दमाये स्मृती निमंत्रितांचे पहिले कविसंमेलन व विशाल मोहोड यांच्या अध्यक्षतेत कवयित्री जयश्री तोटे स्मृती निमंत्रितांचे दुसरे कविसंमेलन होईल.या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष,संमेलनाध्यक्ष मा. वसंत आबाजी डहाके,सत्राध्यक्ष डॉ. मोना चिमोटे,प्रमुख अतिथी डॉ. नरेशचंद्र काठोळे, मा.प्रकाशजी बोके,हरिशजी मोहोड,इंजि. वा. पा. जाधव, इंजि. दीपक दारव्हेकर,डॉ. श्यामसुंदर निकम,कृष्णा पाळेकर,संजीवनी काळे आदि मान्यवर उपस्थित राहतील.

साहित्य संमेलनाला साहित्यिक व रसिकांनी आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन परिवर्तन प्रबोधिनीच्या अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक मुख्य संयोजिका प्राचार्य डॉ. शोभाताई रोकडे, प्रमुख सल्लागार, इंजि.वा.पां. जाधव,इंजि.श्री दीपक दारव्हेकर, इंजि.आबासाहेब कडू, कांचन उल्हे,डॉ.राजेंद्र राऊत,प्रभा आवारे,संजीवनी काळे,कृष्णा पाळेकर, ॲड.डॉ.सुरेश चापोरकर, प्रा.डॉ शुभांगी इंगोले, तसेच आयोजन समिती प्रमुख सदस्य ,विशाल मोहोड,खुशाल गुल्हाने,विशाल कन्हेरकर,रंजना कराळे,डॉ. मंदा नांदुरकर,शीतल राऊत, संदीप देशमुख, गजानन काकडे,डॉ.आशय रोकडे,डॉ. अक्षय उताणे ,नयन पऱ्हाड, वृषाली वानखडे यांनी केले आहे.

---

# संक्षिप्त

## स्केटिंग स्पर्धेत अद्विक बारंगेची भरारी



**अमरावती**-परमानंद स्पोर्ट्स अकॅडमी, नाशिकच्या येथे आयोजित राज्यस्तरीय रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप २०२५- २६ मध्ये अमरावतीच्या अद्विक उज्वल बारंगे याने दोन सिल्वर आणि एक ब्रॉंझ मेडल प्राप्त करीत अमरावतीचे नाव रोशन केले आहे.रोलर स्पोर्ट्स आणि कोचेस फेडरेशन ऑफ इंडिया द्वारा संचालित महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रोलर स्पोर्ट्स अँड कोचेस (एमएआरएससी) च्या वतीने ही रोलर स्केटिंग स्टेट चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली होती. अद्विक हा शहरातील प्रसिध्द रेडिओ फ्रिक्वेन्सी लेझर सर्जन डॉ. उज्वल आणि डॉ. वैशाली बारंगे यांचा मुलगा असून तो नारायणा विद्यालयाचा चौथीचा विद्यार्थी आहे. आठ ते दहा वर्षे वयोगटातील राज्यस्तरीय स्पर्धेत उत्तम खेळाचे प्रदर्शन करत अद्विकने राष्ट्रीय स्पर्धेत आपले स्थान पक्के केले आहे. आजवर विविध रोलर स्केटिंग स्पर्धेत अद्विकने १७ पदके प्राप्त केली आहेत, हे विशेष. तो आपल्या यशाचे श्रेय प्रसाद रोलर स्केटिंग अकॅडमीचे संचालक प्रसाद जोशी, मार्गदर्शक मिलिंद सराफ, नारायणा विद्यालयाचे प्राचार्य सचिन भेलकर आणि क्रीडाशिक्षक क्षितिज मोहोड यांना देतो. त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे शेतीशाळा



**अमरावती**- येथील पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय तर्फे रब्बी पीक उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर दर्यापूर तालुक्यातील मौजे शिरजदा व म्हैसपूर मुचर्डा येथे शेती शाळा व प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. कृषी महाविद्यालया तर्फे कृषी विद्या विभागाच्या प्रा. श्वेता गणवीर यांनी शेतकऱ्यांना हरभरा पिकातील खत व कीड व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर भेट देऊन हरभरा व तूर पिकातील अन्नद्रव्य व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांशी चर्चा केली त्यांच्या शंकांचे निरसन केले.सदर शेती शाळा व प्रक्षेत्र भेटी मधील मार्गदर्शना बाबत उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करून भविष्यात देखील पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे पिक उत्पादन, संरक्षण, काढणी पश्चात तंत्रज्ञान व शेतमालाचे विपणन यासंदर्भात मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. सदर कार्यक्रमाला मंडळ कृषी अधिकारी विपिन चंदनकर, सहाय्यक कृषी अधिकारी सौ होले व श्री कळसकर, ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मार्गशीर्ष अमावास्येनिमित्त चंदनउटी उत्सव



**चांदूर रेल्वे**- मार्गशीर्ष अमावास्येनिमित्त श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) नगरीत पारंपरिक 'चंदनउटी' उत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे.श्री विठोबा संस्थानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शनिवार, २० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता विधीपूर्वक चंदनउटी उत्सवाची सुरुवात होणार आहे. अवधूत परंपरेतील भजनगायनामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे.सावंगपूर नगरी ही भाविकांचे माहेर मानली जाते. त्यामुळे परिसरासह राज्याच्या विविध भागांतून मोठ्या प्रमाणावर भाविक दाखल होण्याची शक्यता आहे. भाविकांच्या सोयीसाठी सायंकाळी ६.०० वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून यासाठी संस्थानच्या महाप्रसाद नियोजन समितीने व्यापक तयारी केली आहे.संस्थानच्या वतीने सर्व भाविकांना या पवित्र सोहळ्यात तन-मन-धनाने सहभागी होऊन भक्तीचा आनंद लुटावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## योगा (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

**अमरावती**-स्वामी विवेकानंद योगा अनुसंधान संस्थान, बंगलोर येथे ०५ ते ०९ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगा (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.चमूंमध्ये डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची जागृती पटले, आयुषी पांडे, प्रांजली जगताप व दिपाली राऊत, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीची समिक्षा कडू, नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंतची प्रतिक्षा तुपट, जे.डी. पाटील महाविद्यालय, दर्यापूरची श्रावणी चव्हाण, जी.एस. गावंडे महाविद्यालय, उमरखेडची तेजस्विनी बहाळे व एस.एस.जी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेगांवची प्राची वैराळे हिचा समावेश आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# वासना विकृतीच्या दलदलीची साक्ष - एपस्टीन फाइल्स!

आपल्या देशातील राजकीय वर्तुळात 'एपस्टीन फाइल्स' हे शब्द मागील काही दिवसापासून चर्चेत आहेत. तसे तर याची चर्चा जगभरात आहे, खास करुन अमेरिकेत तर मागील कित्येक महिन्यांपासून आहे.आपल्याकडे काहींना वाटते की, या फाइल्सचे तपशील अमेरिकन संसदेत सार्वजनिक केल्यानंतर राजकीय घडामोडींना उत येईल. असे काही होईल की नाही हे काही तासांनी कळेलच. तूर्त एपस्टीन फाइल्सची आणि या मागच्या विकृत वासना कांडांची माहिती.एपस्टीन स्वतः सेक्स हाउंड होता, विकृत होता. त्याने केवळ बाललैंगिक शोषण केले अशातली बाब नव्हती त्याने जगभरातील धनाढ्य धेंडांना लहान मुली पुरवल्या. त्या मुलींचे एकदा नव्हे तर अनेकदा शोषण केले. दोन दशक तो हा उद्योग करत होता. त्याचे स्वतःच्या मालकीचे एक बेट होते. तिथे तो या ओंगळवाण्या श्रीमंतीच्या चिखलात बुडालेल्या गलिच्छ लोकांना बोलवायचा, त्यांच्या विकृत वासनांना तो आकार द्यायचा. मात्र त्याचा नीचपणा अधमपणा इथवरच सीमित नव्हता, हे सर्व शोषण होत असताना त्याचे त्याने रेकॉर्डिंग केले आणि त्या बदल्यात त्यांच्याकडून त्याने अनेक डील करवून घेतल्या, इतरांना करवून दिल्या. अल्पवयीन मुलींचा पुरवठा करुन तो जगातला सर्वात मोठा सेटलर झाला होता! जगातल्या सर्वात पॉवरफुल देशाच्या राष्ट्राध्यक्षाला त्याने आपल्या पिकपॉकेटमध्ये ठेवले होते, बाकीच्यांची काय बिशाद!

सेक्स सिंबॉल असणारी 'घिस्लेन मॅक्सवेल'ही त्याची स्टेपनी कम गर्लफ्रेंड होती. तिचे काम एकच होते, ते म्हणजे ज्या ज्या लोकांना ही घाणेरडी सर्विस पुरवायची असेल त्यांची लिस्ट बनवणे आणि त्यांना ईमेल पाठवून, फोन कॉल करुन बेटावर अय्याशीसाठी बोलवणे!काही वेळा तिने एपस्टीनच्या फोनवरून टेक्स्ट मेसेज केले आहेत तर बऱ्याचदा तिच्या फोनवरून तिने संपर्क साधला. तिने ज्यांना बोलवले त्यातले किती लोक प्रत्यक्षात तिथे आले आणि त्यांनी या घाणीत स्वतःला डुबवले हे आज कळेल. कारण यात ज्यांची नावे आली आहेत अशा अनेकांचे म्हणणे आहे की, आम्हाला केवळ कॉन्टॅक्ट केला होता आम्ही त्यात सामील झालो नाही! खरे खोटे आज कळू शकते, मात्र आज जे उघड होईल तेच अंतिम सत्य असेल काय, हे काळच ठरवेल!

एपस्टीनचे जाळे अत्यंत व्यवस्थित होते. अल्पवयीन मुलींना पाम बीच, न्यूयॉर्क आणि खासगी बेटावर बोलावले जाई. या मुलींची भरती कशी केली जाई याची माहिती मस्तक सुन्न करणारी आहे.एका मुलीचे शोषण पूर्ण झाले की, तिच्या सेक्स टेप्स दाखवून तिच्यावर जबरदस्ती केली जायची की तिने दुसरी मुलगी आणावी! ती मुलगी दुसऱ्या मुलीला आणायची- मॉडेलिंग किंवा मसाजच्या नोकरीचे आमिष दाखवले जायचे. नव्या मुलीला आणल्यास तिला बोनस दिला जायचा.बऱ्याचदा या मुलींना खरोखरच मसाजचे काम दिले जायचे, त्या कुणाचा मसाज करत आहेत हे त्यांना कधीही कळू दिले जात नसे. याचेही शूटिंग होई. मसाजपासून सुरू झालेले किळसवाणे कृत्य प्रत्यक्षात लैंगिक शोषणापर्यंत जाई तेव्हा तया मुलीपाशी पर्याय उरलेले नसत. या घाणीत एपस्टीन आणि त्याचे निवडक मित्र सहभागी होत. बऱ्याचदा एकत्रित शोषण केले जाई! हे सर्व रेकॉर्ड करण्यामागे त्याचे वासनेने, अधिक पैशाच्या हव्यासाचे माइंड होते.

**अनिल अंबानी यांचे एपस्टीन सोबतचे चॅट सार्वजनिक प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. मेसी, बेकहॅम, टायगर वुड्स या खेळाडूंसह सचिन तेंडुलकर याचाही एका ठिकाणी उल्लेख आला आहे.**



जेफरी एपस्टीन हे नाव आज जगभरात उच्चभ्रू वर्गातील लैंगिक शोषण आणि मानवी तस्करीच्या प्रकरणाशी कायमचे जोडले गेलेय. अमेरिकन अब्जाधीश आणि फायनान्शिअल तज्ज्ञ असलेल्या एपस्टीनने अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणासाठी एक व्यापक जाळे विणले होते, ज्यात जगभरातील राजकारणी, उद्योगपती, वैज्ञानिक आणि सेलिब्रिटींचा समावेश होता.हे प्रकरण २००० च्या दशकापासून उघडकीस येत गेले, आणि २०२४ - २०२५ पर्यंतच्या कोर्टातील दस्तऐवज उघडकीस आल्याने त्याची व्याप्ती अधिक स्पष्ट झाली. नोव्हेंबर २०२५ मध्ये Epstein Files Transparency Act हा अधिनियम अमेरिकेच्या काँग्रेसने पास केला आणि त्यानंतर U.S. न्याय विभागाने ३० दिवसांत Epstein-संबंधित फाइल्स सार्वजनिक करण्याची अनिवार्यता जाहीर केली.

आज १९ डिसेंबर रोजी अमेरिकन न्याय विभागाला नव्या कायद्याअंतर्गत एपस्टीनशी संबंधित हजारो पानांच्या गोपनीय दस्तऐवजांचे उघड करणे बंधनकारक झाले आहे.यातील अनेक तपशील जसेच्या तसे उघड झाल्यास अनेक प्रभावशाली व्यक्तींच्या नावांचा अधिक खुलासा होऊ शकतो. जेफरी एपस्टीनचा जन्म १९५३ मध्ये झाला. तो वॉल स्ट्रीटवर यशस्वी ट्रेडर, डिलर झाला आणि अनेक श्रीमंतांसोबत मैत्री निर्माण केली.२००५ मध्ये फ्लॉरिडामधील पाम बीच पोलिसांना पहिल्यांदा तक्रारी मिळाल्या की एपस्टीन अल्पवयीन मुलींना पैशांसाठी मसाजच्या निमित्ताने बोलावतो आणि त्यांचे यौन शोषण करतो. २००८ मध्ये फ्लॉरिडा कोर्टात एपस्टीनने अल्पवयीन वेश्याव्यवसायाशी संबंधित आरोप मान्य केले आणि फक्त तेरा महिन्यांची शिक्षा झाली, त्यात वर्क रिलीजची सोयही होती. त्याला ठोठावलेली शिक्षा आणि त्यात काढलेली पळवाट आजही अत्यंत सौम्य मानली जाते.

२०१९ मध्ये न्यूयॉर्कमध्ये त्याला पुन्हा अटक करण्यात आली. त्याच्यावर अल्पवयीन मुलींच्या सेक्स ट्रॅफिकिंगचे गंभीर आरोप ठेवण्यात आले. तुरुंगात असताना त्याने आत्महत्या केली असे फेडरल एजन्सीच्या तपासात समोर आले.मात्र हा मृत्यू आजही अनेकांना संशयास्पद वाटतो, ज्या तुरुंगात इंचभर लांबीचा दोरीचा तुकडा मिळणे पूर्णतः दुरापास्त होते तिथे त्याने चक्क आत्महत्या केली हे कुणाच्याही पचनी पडणार नाही. मात्र या विषयीचे अन्य कोणतेही पुरावे समोर आले नाहीत त्यामुळे ती आत्महत्याच मानली गेली.

२०२१ मध्ये एपस्टीनची मैत्रीण घिस्लेन मॅक्सवेलला हिला सेक्स ट्रॅफिकिंगसाठी वीस वर्षांची शिक्षा सुनावली गेली. मात्र यावर अनेकांनी असामाधान व्यक्त केले. २०२४ मध्ये व्हर्जिनिया गिफ्रे विरुद्ध मॅक्सवेल खटल्यातील शेकडो पाने सार्वजनिक करण्यात आली, त्यातून संवेदनशील माहिती समोर आली आणि अनेकांचे धाबे दणाणले.

यंदाच्या फेब्रुवारीमध्ये डिक्लासिफाइड फाइल्स समोर आल्या आणि आज १९ डिसेंबर रोजी ग्रँड ज्युरीसमोर सर्व ट्रान्स्क्रिप्ट्स उघड केल्या जाणार आहेत. या फाइल्समध्ये बिल क्लिंटन, प्रिन्स अँड्र्यू, अलन डर्शोविट्झ यांसारख्या शक्तिशाली नावांचा उल्लेख आहे, पण बहुतेकांवर थेट आरोप नाहीत.आपल्या देशातीलही काहींची नावे यात आली आहेत. अनिल अंबानी यांचे एपस्टीन सोबतचे चॅट सार्वजनिक प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. मेसी, बेकहॅम, टायगर वुड्स या खेळाडूंसह सचिन तेंडुलकर याचाही एका ठिकाणी उल्लेख आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विश्वासू असलेले पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी यांचे नावही त्यात आलेय. मोदी आणि ट्रम्प यांची मुलाखत घडवण्यासाठी आपण मोदी यांच्या संपर्कात आहोत असाही एक उल्लेख आहे ज्यात एपस्टीन याने 'मोदी ऑन बोर्ड' असे मेन्शन केले आहे! अमेरिकन वेलनेस गुरु दीपक चोप्रा याचे नाव तर अनेक वेळा आहे.हे सेक्स स्कॅन्डल पिरॅमिड स्कीमसारखे होते – मुली स्वतः पीडित आणि रिक्रूटर दोन्ही बनत असे. अशीच मोडस ऑपरेंडी असणारी रॅकेट्स जगात वेळोवेळी उघडकीस आलीत. राजकीय नेते, प्रभावशाली उद्योगपती, उच्चभ्रू वर्गातले श्रीमंत आणि सेलिब्रिटी यांच्या विरोधातील सेक्स आणि शोषणाच्या आरोपांची अनेक प्रकरणे जगात गाजली आहेत.

प्लेबॉय या सेक्स मॅगेझिनचा संस्थापक ह्यू हेफनर यानेही असेच शेण खाल्ले होते. त्याच्या प्लेबॉय मॅन्शनमध्ये ड्रग्स, ऑर्गीज आणि जबरदस्तीचे आरोप झाले. अनेक प्लेमेट्सनी हेफनरवर बलात्कार आणि शोषणाचे आरोप केले.विन्स्टन चर्चिल, जॉन एफ. केनेडी, बिल क्लिंटन, डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी निगडीत अनेक सेक्स स्कॅन्डल्स समोर आले आहेत. या विवादांचा समावेश मीडिया आणि ऐतिहासिक दस्तऐवजांमध्ये केला गेला आहे, काही ठिकाणी आरोप सिद्ध झाले तर काही ठिकाणी नाकारले गेले आहेत.

नेक्सीअम या पंथाचा संस्थापक कीथ रॅनियरेने महिलांना सेक्स स्लेव्ह बनवले होते. २०२० मध्ये त्याला १२० वर्षांची शिक्षा झाली. त्याच्यासोबत एलिसन मॅक या अभिनेत्रीला महिलांच्या रॅकेटरिंगच्या आरोपात शिक्षा झाली.इंग्लंड स्थित मँचेस्टर नजीकच्या रोचडेल उपनगरात पाकिस्तानी वंशाच्या पुरुषांनी शेकडो अल्पवयीन मुलींचे शोषण केले. रॅकेटच्या प्रमुखास नुकतीच शिक्षा सुनावली गेलीय. बीबीसी स्टार जिमी सॅविल याने आयुष्यात शेकडो मुलांचे शोषण केल्याचे त्याच्या मृत्यूनंतर उघड झाले.

अमेरिकन रॅपर सीन उर्फ डिडी कॉम्ब्स याने तर वेश्यांनाच टार्गेट करुन त्यांचे रॅकेट चालवले. खेरीज त्याने मोठ्या प्रमाणात सेक्स ट्रॅफिकिंग केले. विकृतांच्या या मांदियाळीते हॉवर्ड ह्यूजेसचेही नाव घेतले जाते. तो अत्यंत एकाकी आणि विक्षिप्त सेक्स हाउंड म्हणून ओळखला जातो.प्रिन्स अँड्र्यू यांनी एपस्टीनशी संबंध असल्याचे मान्य केले मात्र अल्पवयीन मुलीचे शोषण आरोप नाकारले. बिल क्लिंटन यांनी एपस्टीनच्या खाजगी विमानात अनेकदा प्रवास केल्याचे उल्लेख आढळले आहेत, पण सेक्स ॲक्टिविटीमध्ये सामील असल्याचे थेट पुरावे अद्याप तरी समोर आले नाहीत.मॅट गेट्झ याच्यावरही एपस्टीन सोबत अल्पवयीन मुलींच्या ट्रॅफिकिंग केल्याचे आरोप आहेत. डेनिस हॅस्टर्ट या अमेरिकन स्पीकरवरही मुलांच्या शोषणाचे आरोप आहेत.

जगभरातील मानवी तस्करीची आकडेवारी डोळे पांढरे करणारी आहे. [illegible] च्या अहवालानुसार, २०२२ मध्ये २७.६ दशलक्ष लोकांवर जबरदस्ती केली गेली. यात सेक्स ट्रॅफिकिंगचा मोठा वाटा आहे. गत सालच्या [illegible] च्या रिपोर्टनुसार २०२२ मध्ये ज्यांची ओळख निश्चित झाली अशा पीडितांमध्ये तब्बल २५% वाढ झाली, यात मुली आणि महिलांचा वाटा ६१ड इतका अफाट होता. एक कोटी वीस लाख मुले ह्युमन ट्रॅफिकिंगमध्ये फसली.

अल्पवयीन मुलींचे शोषण ही गुन्हेगारांची एक विकृत मानसिकता असते, जिला पेडोफिलिया असे म्हटले जाते. ही एक मानसिक विकृती आहे, ज्यात प्रीप्युबेसेंट मुलांप्रती आकर्षण निर्माण झालेले असते. मेंदूतील असामान्यता, बालपणीचे ट्रॉमा, पॉवर आणि कंट्रोलची इच्छा, शमन न झालेल्या इच्छांचे सुप्त प्रकटन यातून ही विकृती बळावते.यातील अनेक गुन्हेगारांना स्वतःचे वर्तन विकृती वाटत नाही; ते त्याचे सामान्यीकरण करतात! अल्पवयीन मुले कमकुवत असल्याने सहज लक्ष्य होतात हे इथे लक्षात घेतले पाहिजे.एपस्टीन फाइल्स हे फक्त एका व्यक्तीचे प्रकरण नसून सत्तेच्या गैरफायदा घेण्याच्या अनैतिक अधाशी वृत्तीचे, मानवी हव्यासाचे, विकारग्रस्त वासनांचे आणि संस्थात्मक अपयशाचे प्रतीक आहे.

आज उघड होणाऱ्या फाइल्समुळे अधिक सत्य बाहेर येईल, पण खरा बदल तेव्हाच येईल जेव्हा पीडितांचे संरक्षण आणि गुन्हेगारांना कठोर शिक्षा होईल. मानवी तस्करी ही जागतिक समस्या आहे; तिच्या मुळाशी असलेली असमानता आणि लैंगिक विकृती दूर करण्याची गरज आहे.एपस्टीन फाइल्सच्या खुलाशानंतर जगभरात यासंबंधी विस्तृत न्याय आणि सार्वजनिक चर्चा सुरु आहे. मानव तस्करी ही आधुनिक गुलामीच्या स्वरूपात आहे, ज्याला जागतिक स्तरावर सामोरे जाणे हे केवळ कायद्याचे काम नसून आपली सामाजिक जबाबदारी आहे.

एपस्टीन किती अधम नीच होता याचे काही ताजे पुरावे काल लीक झाले आहेत, त्यात त्याने शाळकरी मुलींच्या अंगावर लोलिता या विख्यात कादंबरीमधील गाजलेली वाक्ये लिहिली आहेत. मुलींची छाती, पाठ, कंबर, पोट, पायाचा तळवा, कपाळ अशा ठिकाणी त्याने ही लिखावट केली.१९५५ मध्ये अमेरिकन लेखक व्लादिमीर नॅबकोव यांनी ही कादंबरी लिहिली. फ्रेंच साहित्याचा एक विकृत प्राध्यापक बारा वर्षीय मुलीला बंधक बनवतो आणि तिचे शोषण करतो. शेवटी तो हृदयविकाराच्या धक्क्याने मरतो आणि १७ वर्षांची लोलिता प्रसूती दरम्यान अपत्याला जन्म देऊन मरण पावते अशी यातली कथा.

या कादंबरीतील वाक्ये एपस्टीनने या कोवळ्या मुलींच्या देहावर लिहिली होती यावरून तो काय लेव्हलचा विकृत होता याची कल्पना यावी. अशा नीच व्यक्तीशी जवळीक असणाऱ्या, त्याच्या मदतीने शोषण केल्याचे सिद्ध झालेल्या कोणत्याही व्यक्तीला जगाने माफ करू नये, कसलाही मुलाहिजा न बाळगता त्याला कठोर शिक्षा दिली पाहिजे. तरच जग खऱ्या अर्थाने न्यायप्रिय समाजात वावरत असल्याचा मेसेज जाईल!

**- समीर गायकवाड**

# निवडणूक तयारीला वेग:महानगरपालिका आयुक्तांची बडनेरा झोन कार्यालयास भेट

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बडनेरा झोन कार्यालयाची सविस्तर पाहणी केली. निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक व सुरळीतपणे पार पडावी, यासाठी प्रशासनाकडून सुरू असलेल्या नियोजनाचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला.

या पाहणीदरम्यान आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी बडनेरा प्रभागातील सर्व मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध असणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.मतदान केंद्रांवरील स्वच्छता, पिण्याचे पाणी, विद्युत



व्यवस्था,रॅम्प, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा तसेच सुरक्षा व्यवस्थेची योग्य आखणी करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

पाहणी दरम्यान बडनेरा झोनचे अधिकारी, कर्मचारी तसेच निवडणूक नियोजनाशी संबंधित विविध विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अमरावती महानगरपालिकेने निवडणूक तयारीला गती दिल्याने आगामी निवडणुका यशस्वीपणे पार पडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी विवेक जाधव दक्षिण झोन क्र.४ बडनेरा, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी क्र.१ श्रीमती निकीता जावरकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी क्र.२ तथा सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे मनपा दक्षिण झोन क्र.४ बडनेरा, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी क्र.३ तथा सहाय्यक अभियंता श्रीरंग तायडे, सहाय्यक आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर उपस्थित होते.

# काँग्रेसचे सिराजखान यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**अमरावती/का.प्र.**

महानगर पालिकेच्या रणधुमाळीला वेग आला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेवर विश्वास दर्शवून अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांना पक्षाकडे कल व आकर्षण वाढत आहे. विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी हे राष्ट्रवादीच्या संपर्कात असून पक्षप्रवेश केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षात कार्यरत सिराजखान हयात खान यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश संघटक महासचिव संजय खोडके यांनी सिराजखान हयात खान यांना पार्टीचा दुपट्टा देऊन पक्षात स्वागत केले. तसेच त्यांना राष्ट्रवादीच्या अल्पसंख्याक विभाग शहर



अध्यक्ष म्हणून नियुक्तीपत्र सुद्धा देण्यात आले.त्याचबरोबर सरताज खान,यासोबतच यावेळी विद्यापीठ रोड -व्यंकय्यापुरा परिसर निवासी सचिन दादाराव निकम तसेच स्वाती सचिन निकम यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला.यावेळी आ.संजय खोडके यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधून अमरावती महानगर पालिका काबीज करण्यासाठी सज्ज व्हा असे आवाहन केले. यावेळी यश खोडके, अमरावती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहराध्यक्ष - प्रशांत डवरे,माजी महापौर - ॲड. किशोर शेळके, मनपा स्थायी समिती माजी सभापती - अविनाश मार्डीकर ,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक शहराध्यक्ष - ऋतुराज राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मागासवर्गीय अध्यक्ष मंगेश मनोहरे, जितेंद्रसिंह ठाकूर, हाजी रफिक, आदिसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या सर्व फ्रंट चे पदाधिकारी व सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. असे वृत्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अमरावती शहर प्रसिद्धी प्रमुख अमित तायडे यांनी कळविले आहे.

# मानवतेच्या नंदादीपा



मानवतेच्या नंदादीपा
स्मृती पुष्पांच्या अर्पण
तुजला
जनकल्याण जगी
करण्या
सखूमाते पोटी
जन्मला...।१।

करूनी अंध अपंगांची सेवा
स्वच्छता मंत्राचा देऊन ठेवा
मानवतेच्या संदेशाचा करावा हेवा
आजही स्मरणात तुम्ही बाबा देवा...।२।

कण कण जमवूनी केले कोटी
अर्पूणी जीवन जनसेवे साठी
कणही न राखीला स्वहीता पोटी
बाबांची ख्याती आजही जगात मोठी..।३।

रसांची मेजवानी किर्तनातूनी
रीमझीम सरी विनोदातूनी
ज्ञान विलसे लोका शब्दांतूनी
सद्गुणी,सद्ववर्तनी बने ऐकूनी..।४।

महापुरुष दडला चिद्ध्यांच्या मागे
श्रवूणी किर्तन लोकां उमगे
प्रभू रूपी श्रोत्यांना समजे
बाबा ज्ञानरूपी सागर असे... ।५।

**योगिता भुसारी**
(ग्रामगिताचार्य) (सशिक्षिका)
पंस.मोर्शी जिल्हा, अमरावती
मो.७०५७५४३९८५



# अमरावतीत मनपा निवडणुकीत ठाकरे बंधूंची युती

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचा बिगुल वाजला असून १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारणात हालचालींना वेग आला असतानाच ठाकरे बंधूंच्या युतीबाबत एक मोठी आणि निर्णायक बातमी समोर आली आहे.

मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिकनंतर आता विदर्भातील आणखी चार महापालिकांमध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना (उबाठा) आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. नागपूर, चंद्रपूर, अमरावती आणि अकोला या



चारही महापालिकांमध्ये ठाकरे बंधू एकत्र निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. त्यामुळे आता शिवसेना-मनसेची युती एकूण आठ जिल्ह्यांतील महापालिकांमध्ये होणार असल्याचे जवळपास निश्चित मानले जात आहे. या घडामोडीमुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा 'ठाकरे ब्रँड' सक्रिय होत असल्याचे चित्र दिसत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष राजू उंबरकर यांनी याबाबत माहिती देताना विदर्भातील चारही महापालिकांमध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसह मनसे एकत्रितपणे निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट केले. विदर्भात ठाकरे ब्रँड एकत्र येत असून त्याचा सकारात्मक परिणाम निवडणुकांमध्ये दिसेल आणि मोठे यश मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजू उंबरकर हे सध्या अकोला जिल्हा दौऱ्यावर असून त्यांनी मनसेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची आढावा बैठक घेतली. याच बैठकीत इच्छुक नगरसेवक उमेदवारांच्या मुलाखतीही घेण्यात आल्या. यावरून विदर्भात शिवसेना-मनसे युतीची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचल्याचे स्पष्ट होत आहे. आधीच मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिकमध्ये ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याचे संकेत मिळाले होते. त्यात आता विदर्भातील चार प्रभावी ठरण्याची शक्यता आहे.

# 'मेरी पंचायत' ॲपमधून होणार ८४१ ग्रामपंचायतींचा कारभार

**अमरावती/का.प्र.**

डिजिटल युगात स्थानिक संस्थेच्या कारभारात पारदर्शकता यावी यासाठी केंद्र सरकारच्या पंचायतराज मंत्रालयाने 'मेरी पंचायत' ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून ग्रामस्थांना आता आपल्या ग्रामपंचायतीचा कारभार घरबसल्या एका क्लिकवर कळणार आहे.

केंद्र तसेच राज्य शासनाकडून ग्रामपंचायती अधिक बळकट करण्यावर भर दिला आहे. विकासात येणारे अडथळे दर व्हावेत यासाठी थेट ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करून दिला जात आहे. ग्रा. पं.च्या कारभारात पारदर्शकता असावी व आपल्या ग्रा.पं. च्या हद्दीत काय विकास सुरू आहे. गावात कोणत्या योजना आल्या आहेत ? आदी माहिती सहजरीत्या उपलब्ध होणार आहे. त्यासाठीच केंद्र शासनाच्या पंचायतराज मंत्रालयाने 'मेरी पंचायत' ॲप आणले आहे. 'मेरी पंचायत' ॲप हे केंद्र सरकारचे एक डिजिटल व्यासपीठ आहे. नागरिकांना ग्रामपंचायतीचा कारभार, विकासकामे, निधीचा वापर आणि विविध योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध स्थानिक पातळीवरील एखाद्या विकास कामाची सूचना फोटोसह सूचित करून प्रशासनाच्या निदर्शनास आणून देऊ शकता.

तसेच काही समस्यांचे फोटो अपलोड करून झालेल्या करून देणार आहे हे ग्रामीण भागात ई-गव्हर्नन्स सुधारण्यासाठी पंचायतीच्या कामांत नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी व प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी पंचायतराज मंत्रालयाने कामातील चुका किंवा त्या कामाचे कौतुक समोर आणता येणार आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीने केलेल्या कामाबाबत ग्रामस्थांना आपला अभिप्राय नोंदवता येणार आहे. 'मेरी पंचायत' ॲपच्या माध्यमातून ग्रामपंचायतीचा आर्थिक बाबींचा संपूर्ण लेखोजोखा ग्रामस्थांसमोर येणार आहे.

# २०११ मधील जातीय हिंसाचार प्रकरणात सर्व ५९ आरोपी निर्दोष मुक्त

## ॲड. नजीब शेख यांचा युक्तिवाद

■ प्रतिनिधी| अकोला ■

*२०११ साली घडलेल्या कथित जातीय हिंसाचार प्रकरणात अकोला जिल्हा व सत्र न्यायालयाने सर्व ५९ आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. पुरावे व साक्षीदारांच्या अभावामुळे न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.*



२०११ मध्ये कारंजा येथील एका युवकाने पैगंबर मोहम्मद साहेब यांच्याबाबत फेसबुकवर वादग्रस्त पोस्ट केल्याच्या निषेधार्थ २८ नोव्हेंबर २०११ रोजी अकोला शहरात काही सामाजिक संघटनांनी बंदचे आयोजन केले होते. या बंददरम्यान तिलक रोडवरील मुख्य बाजारपेठेत घोषणाबाजी, दुकानांची लूट, मारहाण तसेच वाहनांची तोडफोड झाल्याचा आरोप करण्यात आला होता. या संदर्भात तत्कालीन सिटी कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी तक्रार दाखल केली होती. या प्रकरणात मुस्लिम नुमाइंदा कौन्सिलच्या बंददरम्यान दंगल, लूटमार व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याचा आरोप ठेवत तब्बल ५९ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते. आरोपींवर भा.दं.वि. (IPC) चे कलम ३९७, ३९५, ३९४, १४३, १४७, १४८, १४९, ३२३, ३२४, ३३६, ३३७, ४२७, १२०(ब) तसेच 'डेमेज टू पब्लिक प्रॉपर्टी ॲक्ट'चे कलम ३ व ४, 'क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट'चे कलम ७ आणि मुंबई पोलीस अधिनियमाचे कलम १३५, १४० अंतर्गत गुन्हे दाखल होते. चार्जशीट दाखल झाल्यानंतर या प्रकरणाची सुनावणी विद्यमान प्रथम जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. श्रीसागर यांच्या न्यायालयात झाली. न्यायालयात तक्रारदार व तपास अधिकारी विलास पाटील यांच्यासह एकूण पाच साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. मात्र, अभियोजन पक्ष आरोपींविरुद्ध ठोस पुरावे सादर करू न शकल्याने न्यायालयाने सर्व ५९ आरोपींना निर्दोष मुक्त करण्याचा आदेश दिला.

या प्रकरणात ४५ आरोपींच्या वतीने ज्येष्ठ फौजदारी वकील ॲड. नजीब शेख यांनी प्रभावी बाजू मांडली. त्यांना ॲड. शिबा मलिक, ॲड. सोहराब जागीरदार व ॲड. सय्यद अरबाज यांनी सहकार्य केले. तसेच 'वहादत-ए-इस्लामी हिंद' या स्वयंसेवी संस्थेने गरीब व मजूर आरोपींना कायदेशीर मदत पुरवली होती. या निकालामुळे १४ वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रकरणावर अखेर पडदा पडला असून, आरोपी व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले आहे.

# उतावडी प्रकल्पातून लाखो लिटर पाण्याची नासाडी

## पिंपळखुटा परिसरात शेतकऱ्यांच्या पिकात पाणी साचल्याने नुकसान

**खेट्री :** पातूर तालुक्यातील पिंपळखुटा परिसरात उतावडी प्रकल्पातून लाखो लिटर पाण्याची नासाडी होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. प्रकल्पांतर्गत पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी थेट शेतजमिनीत व मोकळ्या जागेत सोडण्यात येत असून, त्यामुळे अनेक शेतांमध्ये पाणी साचून उभी पिके धोक्यात आली आहेत.

या भागातील शेतकऱ्यांच्या विविध पिकांवर या पाण्याचा विपरीत परिणाम होत आहे. पाणी साचल्यामुळे पिकांची मशागत व संगोपनाची कामे करणे अशक्य झाले असून, यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. पाण्याची अशी उधळपट्टी होत असल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. उतावडी प्रकल्प विभागाकडून या प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन पाण्याचा अपव्यय थांबवावा व शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होणार नाही यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.



पिंपळखुटा परिसरात विहिरींना मुबलक पाणी उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांना सिंचनासाठी उतावडी प्रकल्पाच्या पाण्याची गरज नाही. याबाबत उतावडी प्रकल्प विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही केवळ बिले काढण्यासाठी हेतूपरस्पर पाणी सोडले जात आहे. त्यामुळे लाखो लिटर पाण्याची नासाडी होत असून, शेतांमध्ये पाणी साचून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

**केशव राखोंडे,** शेतकरी, पिंपळखुटा

# महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे आज अकोला दौऱ्यावर

## मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण बैठक

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाकडून रणनीती आखण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. राज्याचे महसूल मंत्री व भाजपचे राज्य निवडणूक प्रभारी नामदार चंद्रशेखर बावनकुळे हे आज शनिवार, २० डिसेंबर रोजी अकोल्यातील राज राजेश्वर नगरी येथे भेट देणार असून, स्थानिक हॉटेल सिटी स्पोर्ट येथे पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहेत.



या बैठकीत आगामी महानगरपालिका निवडणुकीसंदर्भातील रणनीती, संघटनात्मक तयारी, तसेच निवडणुकीतील बारकावे व अडचणी यावर सखोल चर्चा केली जाणार आहे. विशेष म्हणजे, या बैठकीसाठी जबाबदारी असलेल्या १५६ प्रमुख पदाधिकाऱ्यांनाच निमंत्रण देण्यात आले असून, नोंदणी व निमंत्रणधारकांनाच प्रवेश देण्यात येणार आहे.

भाजप नेहमीप्रमाणे निवडणुकीची तयारी हॉटेल सिटी स्पोर्ट येथूनच सुरू करत असल्याची परंपरा कायम ठेवत, यंदाही याच ठिकाणी ही महत्त्वाची बैठक होत आहे. चंद्रशेखर बावनकुळे हे पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून पक्षाची भूमिका, दिशा व निवडणूक मंत्र देणार असल्याची माहिती निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांनी दिली.

या बैठकीस भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकले, जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, जयंत मसने, किशोर पाटील, कृष्णा शर्मा यांच्यासह अनेक प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचेही विजय अगरवाल यांनी स्पष्ट केले आहे.

## प्रभू प्राप्तीत कासावीसता आवश्यक -हभप हर्षद बुवा

■ प्रतिनिधी | अकोला ■

मनुष्य कोणतेही कार्य आपणास झेपेल तेवढेच करतो. यामध्ये परमार्थ सुद्धा अंगीकृत आहे. यामुळे प्रभू प्राप्तीच्या मार्गात अनेक अडथळे व चंचलता निर्माण होते. म्हणून प्रभू प्राप्तीच्या मार्गात अंतर्मनाच्या कासावीसतेची गरज असून ही गरज भक्ती मार्ग सुकर करीत असल्याचा हितोपदेश हभप हर्षद बुवा जोगळेकर यांनी केला. आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाच्या वतीने किर्तन सेवेकरी स्व. सौ शालिनी वामनराव नाईकवाडे यांच्या स्मृतीत आयोजित तीन दिवसीय कीर्तन महोत्सवास शुक्रवारी स्थानीय प्रमिलाताई ओक हॉल सभागृहात प्रारंभ झाला.

# उमरा–सावरगाव–अकोला हद्द रस्त्याची दुरवस्था

## ३० डिसेंबरला रस्तारोकोचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील उमरा गाव ते सावरगाव मार्गे अकोला जिल्हा हद्दीपर्यंत जाणाऱ्या मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांसाठी तो जीवघेणा ठरत असून, वारंवार अपघात घडत आहेत. या अपघातांत अनेक नागरिक जखमी झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.

खराब रस्त्यामुळे परिसरातील शेतकरी वर्गाला शेतात जाणे तसेच शेतमाल बाजारपेठेत नेणे कठीण झाले आहे. तसेच शाळकरी मुलांना दैनंदिन ये-जा करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून, त्यांच्या शिक्षणावरही विपरीत परिणाम होत आहे. या गंभीर समस्येच्या पार्श्वभूमीवर आलेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्यासह परिसरातील ग्रामस्थांनी १९ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन सादर करून रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली आहे. निवेदनात सदर रस्त्याचे तातडीने नव्याने बांधकाम मंजूर करावे, अन्यथा येत्या ३० डिसेंबर रोजी रस्तारोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. प्रशासनाने या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.




### जाहीर सुचना

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री. प्रमोद सदाशिव कळमकर रा. वाघा वस्तापूर ता. बर्शिटाकली जि. अकोला यांनी खालील वर्णनाची मालमत्ता जना स्मॉल फायनान्स बँक लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे ग्रा. पं. वाघा वस्तापूर ता. बर्शिटाकली जि. अकोला च्या हद्दीतील मालमत्ता क्र. ६८ ज्याचे एकूण क्षेत्रफळ १५००चौ. फु. असून ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : रमेश कळमकर, ऊत्तरेस : रस्ता व दक्षिणेस : मोतीराम बहादरे

येणे प्रमाणे वरील मालमता हि श्री. प्रमोद सदाशिव कळमकर ह्यांना वडिलोपार्जित मिळालेली असून गावठाण हद्दीतील आहे. श्री. प्रमोद सदाशिव कळमकर हे वरील मालमत्ता जना स्मॉल फायनान्स बँक लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज गहाण, बोजा, हक्क, अधिकार, आक्षेप अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन १४(चौदा) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन जना स्मॉल फायनान्स बँक लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १९/१२/२०२५

**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल, मलकापुर रोड,
अकोला - ४४४००४ मोबा. ९८९०४४४८२४

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१६५/२०२५ — प्रोसेस नं.१९६६६/२०२५
चौ.ता. १९/०१/२०२६ — दिनांक : ०१/१२/२०२५

**अर्जदार :** १. जयप्रकाश गुलाबचंद पेठकर २. दिलीप गुलाबचंद पेठकर दोघेही रा. जठार पेठ, गुप्ते मार्ग, स्टेट बॅक लाइन, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गुलाबचंद बालचंद पेठकर
**पत्ता :-** रा. जठार पेठ, गुप्ते मार्ग, स्टेट बॅक लाइन, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गुलाबचंद बालचंद पेठकर यांचे दि. १२/०१/२००८ रोजी अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०१/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com



### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे दीपक उमाशंकर दुबे यांचे मालकीचे गिरीराज बिल्डिंग मधील दुकान क्र. ३ आणी ९, नझुल प्लॉट क्र. १८६/१८८ नझुल शीट क्र. ३९-ब, चे एकून क्षेत्रफळ ३६३.३७ चौ. फुट., असून त्यास चतुर्सिमा पूर्वेस - स्टेअरकेस क्र. २, पश्चिमेस - दुकान क्र. ४ आनी १०, उत्तरेस- ब्राम्हणवाडी चा रस्ता, दक्षिण - कोठारीची खुली जागा, कसबे - अकोला, ता. जी. अकोला, याचे साखळीचे मूळ रजी. खरेदी खत क्र. ३९०७ दिनांक २०/११/२००९ मधील पान क्र. १ ते ४ दि. १७/१२/२०२५ रोजी झेरॉक्स काढण्याकरीता जात असताना कोठेतरी हरवले आहे त्याबाबत दीपक उमाशंकर दुबे यांनी पोलीस स्टेशन सिटी कोतवाली अकोला, ता. जी. अकोला येथे दि. १८/१२/२०२५ रोजी तक्रार दिली आहे त्याचे तक्रार क्र. १९३७३००८०७२५००२४८ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ३ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी. तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती. करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक :- १९/१२/२०२५

**ॲड. अजय वा. गोडे**
ऑफीस - शॉप क. २३ - ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला
ता. जि. अकोला, मो. क्र.९१७५८३८२४२

**No. 3**
**FAMILY COURT AMRAVATI**
**IN THE COURT OF Shri. H. B. Shelke**
Principal Judge Family Court Amravati, Amravati, Amravati.

SUMMONS TO APPEAR IN PERSON
(0.5, R. 3.)

Petition No.A/280/2025
Priyanka Mangesh Shrikhandkar Vs
Mangesh Nilkanthrao Shrikhandkar
NEXT DATE: 03-02-2026

To,
Mangesh Nilkanthrao Shrikhandkar
R/o. Suryabeng Apartment, Bypass Highway, Khadki, Akola, Tq. and Dist. Akola., AKOLA, MAHARASHTRA

Whereas Priyanka Mangesh Shrikhandkar has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person on the 03-02-2026 at 11:00 o'clock in the forenoon, to answer the claim; and you are directed to produce on that day all the documents upon which you intend to rely in support of your defence.

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **बबनराव भिमरावजी गावंडे,** रा.अचलपूर, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी दि.२९/०३/२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र.११६५ नुसार मौजे -परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील नझुल शिट नं.१९-डी मधील नझुल प्लॉट नं.१७०/१ भाग ज्याचे क्षेत्रफळ २६५.७९ चौ.मि. व त्यावरील बांधकाम सह हा मनोजकुमार गुलाबचंदजी जोशी यांचे कडून विकत घेतला आहे.

हयाप्रमाणे सदर खरेदी दि.२९/०३/२०१० रोजीचे दस्त क्र.११६५ चे **मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकार बबनराव भिमरावजी गावंडे यांचे जवळ आहे. परंतु सदर मालमत्तेचे पूर्वीचे मुळ खरेदी दस्त जसे दि.२५/०४/२००६ रोजी दस्त अ.क्र.१२०५ चे दस्त **अ.क्र.१२०५ चे दस्त, हे या जाहीर सुचनेचा विषय असुन** सदर दस्ताचे मुळ खरेदीखत व त्याची पावती माझे पक्षकार यांचे कडून गहाळ झालेली आहे.

सदर हरविलेल्या दस्ताची रितसर दि.११/१२/२०२५ पोलीस स्टेशन परतवाडा येथे तक्रार दाखल केलेली आहे.

तरी सदर प्लॉट बाबत कोणाचोही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक १२/१२/२०२५
अमरावती.

ॲडव्होकेट
**राहुल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०

## जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जाचा नमुना

**प्रति,**
निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**विषय** - **जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**अर्जदाराचे नांव** - नईम अहमद अ.हफिज, रा.घाटलाडकी
मोबाईल नंबर - ७९७२६४४१०१

मा.महोदय,

वरील विषयान्वचये सविनय अर्ज सादर करतो/करते की, माझ्या बहिणीचा नामे **नईम अहमद अ.हफिज** यांचा जन्म ग्रामपंचायत घाटलाडकी कार्यक्षेत्रातील घाटलाडकी या गावी दिनांक **०७/१२/१९८६** रोजी झालेला आहे.

सदरील जन्म/मृत्यू घटनेची नोंद आपल्या ग्रामपंचायतीला झालेली नाही. तसेच इतर कुठल्याही निबंधकाकडे केलेली नाही. सदरील जन्म विलंब नोंदणी करण्यासाठीचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून आणण्यासाठी मला जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि.१२ मार्च २०२५ नुसार आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सादर जोडलेले आहेत. जोडण्यात आलेले कागदपत्रे व माहिती सत्य असल्याबाबत मी खात्री देत असून चुकीचे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशीर कार्यवाही होण्यास मी पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

करीता मला जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

शिक्का

अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा
(**नईम अहमद**)

## जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जाचा नमुना

**प्रति,**
निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**विषय** - **जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**अर्जदाराचे नांव** - शैला शबनम नूर मोहम्मद, रा.घाटलाडकी
मोबाईल नंबर - ९५११९७०१६३

मा.महोदय,

वरील विषयान्वचये सविनय अर्ज सादर करतो/करते की, माझ्या मुलीचा नामे शैला शबनम नूर मोहम्मद यांचा जन्म ग्रामपंचायत घाटलाडकी कार्यक्षेत्रातील घाटलाडकी या गावी दिनांक ८/६/१९८७ रोजी झालेला आहे.

सदरील जन्म/मृत्यू घटनेची नोंद आपल्या ग्रामपंचायतीला झालेली नाही. तसेच इतर कुठल्याही निबंधकाकडे केलेली नाही. सदरील जन्म/मृत्यू विलंब नोंदणी करण्यासाठीचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून आणण्यासाठी मला जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि.१२ मार्च २०२५ नुसार आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सादर जोडलेले आहेत. जोडण्यात आलेले कागदपत्रे व माहिती सत्य असल्याबाबत मी खात्री देत असून चुकीचे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशीर कार्यवाही होण्यास मी पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

करीता मला जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

शिक्का

अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा
(शैला शबनम)

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७१०/२०२५
**श्रीमती संगीता -वि- निरंक**
पुढील ता.०९.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Sangita W/o Santosh Meshram Age 44 Yrs. Occu.: Housewife R/o At Po.Nargavandi, Tq.Dhamangaon Rly. Dist.Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शंकर बिसनजी शेंडे** हे दिनांक 24.01.2022 रोजी **वलगांव, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **संगीता विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संगीता विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस
## विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि. अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.७०७/२०२५ — ने.ता.२३.०१.२०२६

**अर्जदार :**
१. **राजेंद्र भीमराव काळमेघ,** वय ४६ वर्षे, धंदा - मजुरी
२. **महानंदा भीमराव काळमेघ,** वय ४४ वर्षे, धंदा - घरकाम
रा. जळका हिरापुर, ता.भातकुली, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात.**भिमराव नथ्थूजी काळमेघ** यांचा **मृत्यू दि.२७/१०/१९८३** रोजी रा.मौजा राजना पूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती व **किसनाबाई भिमराव काळमेघ** यांचा **मृत्यू दि.३१/०८/२००७** रोजी रा.जळका हिरापुर, ता.भातकुली, जि.अमरावती येथे झालेला आहे.त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

अर्जदार मयताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरिता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं.७०७/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.११.१२.२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - २८५३/२०२५**
**स्नेहा विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ०९.०२.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** **Sneha Subhashchandraji Tawani**
Age 35 yrs., Occu.- Housewife
R/o. Badnera Road, Behind Tirupati Balaji Apartment
Kailas Nagar, Gopal Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत सुषमा सुभाषचंद्रजी टवानी व सुभाष रामबिलासजी टवानी हे अनुक्रमे दि.१९.०२.२०१२ व २१.०९.२०२५** रोजी अमरावती येथे मयत झाले.**अर्जदार स्नेहा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार स्नेहा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १६.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जाचा नमुना

**प्रति,**
निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**विषय** - **जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**अर्जदाराचे नांव** - मोहम्मद वाजीद अब्दुल नशीर, रा.घाटलाडकी
मोबाईल नंबर - ८६९८२५५०८५

मा.महोदय,

वरील विषयान्वचये सविनय अर्ज सादर करतो/करते की, माझ्या मुलाचा नामे **मोहम्मद वाजीद अब्दुल नशीर** यांचा जन्म ग्रामपंचायत घाटलाडकी कार्यक्षेत्रातील घाटलाडकी या गावी दिनांक **१२.०३.१९८९** रोजी झालेला आहे.

सदरील जन्म/मृत्यू घटनेची नोंद आपल्या ग्रामपंचायतीला झालेली नाही. तसेच इतर कुठल्याही निबंधकाकडे केलेली नाही. सदरील जन्म विलंब नोंदणी करण्यासाठीचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून आणण्यासाठी मला जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि.१२ मार्च २०२५ नुसार आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सादर जोडलेले आहेत. जोडण्यात आलेले कागदपत्रे व माहिती सत्य असल्याबाबत मी खात्री देत असून चुकीचे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशीर कार्यवाही होण्यास मी पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

करीता मला जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

शिक्का

अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा
(**मोहम्मद वाजीद**)

## जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जाचा नमुना

**प्रति,**
निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**विषय** - **जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**अर्जदाराचे नांव** - नूर मोहम्मद शे.खैरु, रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार जि.अमरावती
मोबाईल नंबर - ९५६११६०८७८

मा.महोदय,

वरील विषयान्वचये सविनय अर्ज सादर करतो/करते की, माझ्या मुलाचा नामे **नांव नूर मोहम्मद शे.खैरु** यांचा जन्म ग्रामपंचायत घाटलाडकी कार्यक्षेत्रातील घाटलाडकी या गावी दिनांक **१/०७/१९६४ (१ जुलै १९६४)** रोजी झालेला आहे.

सदरील जन्म घटनेची नोंद आपल्या ग्रामपंचायतीला झालेली नाही. तसेच इतर कुठल्याही निबंधकाकडे केलेली नाही. सदरील जन्म विलंब नोंदणी करण्यासाठीचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून आणण्यासाठी मला जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि.१२ मार्च २०२५ नुसार आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सादर जोडलेले आहेत. जोडण्यात आलेले कागदपत्रे व माहिती सत्य असल्याबाबत मी खात्री देत असून चुकीचे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशीर कार्यवाही होण्यास मी पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

करीता मला जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

शिक्का

अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा
(नूर मोहम्मद)

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्रीमती एस.एस.भिंगरदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२६९८/२०२५
**श्री.विजय अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०८.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Vijay S/o Arun Rathod, Age 42 Yrs. Occu.: Farmer R/o Lalkhed, Tq. Dist. Amravati-444904
2. Sau.Jyoti Naresh Pawar, Age 41 Yrs. Occu.: Housewife R/o Mangaldham Colony, Dastur Nagar, Behind New Bypass, Rukhmini Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati-444606
3. Sau.Deepa Raju Jadhav, Age 39 Yrs. Occu.: Housewife R/o Chatri Talao Road, Dastur Nagar, Mangaldham Colony, Rukhmini Nagar,Amravati. Tq. Dist. Amravati-444606
4. Varsha Arunrao Rathod, Age 37 Yrs. Occu.: Housewife R/o Behind New Bypass, Mangaldham Colony, Dastur Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati-444601

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अरुण मोहनसिंग राठोड** हे दिनांक 03.08.2025 रोजी **वाना डोंगरी, ता.जि.नागपूर** येथे मयत झाले. व मयत **कांताबाई अरुण राठोड** ही **१९.०४.२००६** रोजी लालखेड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **विजय अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विजय अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## संक्षिप्त

### जानेवारीपासून सुरू होणा-या लेखी परीक्षा पुढे ढकलले

**अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी - २०२५ लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. तथापि राज्यात आगामी होऊ घातलेल्या महानगरपालिकांच्या निवडणुकांमुळे १४, १५ व १६ जानेवारी, २०२६ पासून सुरू होणा-या लेखी परीक्षा पुढे ढकलण्यात येत असून १४ जानेवारी रोजीच्या परीक्षा २७ जानेवारीपासून, १५ जानेवारी रोजीच्या परीक्षा २८ जानेवारी व १६ जानेवारी रोजीच्या परीक्षा ह्या २९ जानेवारी पासून होतील, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून कळविण्यात आले आहे.यासंदर्भात सर्व प्राचार्य, केंद्राधिकारी, संबंधित महाविद्यालये, परीक्षा केंद्र यांना पत्राव्दारे परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून, संबंधितांनी याची सर्व विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

### ग्रामपंचायत अधिकाऱ्याच्या बदलीसाठी ग्रामस्थांचा उपोषणाचा इशारा

**अंजनगाव सुर्जी -** तालुक्यातील ग्रामपंचायत वरूड खुर्द येथे कार्यरत असलेल्या ग्रामपंचायत अधिकारी सतीश किसनराव गवई यांच्या कामकाजाविरोधात ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या संदर्भात ग्रामपंचायत वरूड खुर्द पदाधिकारी यांच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी जि प अमरावती, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, तहसीलदार, पोलीस स्टेशन तसेच लोकप्रतिनिधींना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे गावातील अनेक कामे प्रलंबित असून याबाबत वारंवार गट विकास अधिकारी यांना तोंडी व लेखी तक्रारी करूनही कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही.प्रशासनाकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे अखेर ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला असून दि. २२ पासून पंचायत समिती अंजनगावसुर्जी परिसर येथे बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या उपोषणात सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.वेळीच दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला असून, संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्याची तात्काळ बदली करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

### २१ डिसेंबर रोजी शंकरपटाचे आयोजन

**नांदगावपेठ-** ग्रामदैवत संत श्री काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त नांदगाव पेठ येथे तब्बल दोन दशकांनंतर पुन्हा एकदा भव्य शंकरपटाचे आयोजन करण्यात आले असून, या ऐतिहासिक उपक्रमासाठी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. युवा शेतकरी मित्र परिवार व स्व. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २१ व २२ डिसेंबर रोजी हा शंकरपट पार पडणार आहे. शंकरपटाच्या यशस्वी आयोजनासाठी सध्या पुसदकर कला महाविद्यालयासमोरील विशाल मैदानात जय्यत तयारी सुरू असून ती अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. शंकरपटप्रेमी प्रेक्षकांसाठी स्वतंत्र आसनव्यवस्था, धुरकऱ्यांसाठी सुसज्ज मैदान, अपघातप्रसंगी तत्काळ वैद्यकीय सुविधा तसेच सुरक्षेसाठी प्रशिक्षित रक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. शंकरपट नांदगाव पेठच्या कृषी व सांस्कृतिक परंपरेला नवचैतन्य देणारा ठरणार असून, या उपक्रमात धुरकऱ्यांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजन समितीचे रुपेश इंगळे, भूषण तुळे, अक्षय डाखोडे, अंकुश बोबडे, अतुल हटवार, वैभव धर्मे, श्याम तायडे, चरणभाऊ खराटे, ज्ञानेश्वर ढेंगे व भास्कर राजुरकर यांनी केले आहे.







तयारी निवडणुकीची

## जिल्हा परिषद शाळेत शिक्षण परिषद

**भातकुली/ वार्ताहर**

पंचायत समिती भातकुली मधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,खल्लार येथे गणोरी केंद्राची शिक्षण परिषद झाली.शिक्षण परिषदेचे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आ.श्रीकृष्ण सोनबावणे हे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून गणोरी केंद्राच्या केंद्रप्रमुख निता सोमवंशी आणि विशेष अतिथी खल्लार शाळेचे माजी मुख्याध्यापक गजानन सायंके उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन तथा दीप प्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते



करण्यात आली.त्यानंतर सामूहिक प्रार्थना व राष्ट्रगीत घेऊन, मान्यवरांचे स्वागत गीताने शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागत केले तसेच विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पोषण आहार गीत सादर केले. त्यानंतर मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.शिक्षण परिषदेचे प्रास्ताविक निता सोमवंशी (कें. प्र.) यांनी केले तर चंदा मते,नंदकुमार जिरापूरे,सतिश पवार,अभिषेक खांडे,गजानन येलोने, मनिष गाडबैल, संजय आष्टुनकर, हिरालाल सोळंके सर यांनी शिक्षण परिषदेला मार्गदर्शन केले.यावेळी सकारात्मक शिस्त,इयत्ता ५ व ८ चे शिष्यवृत्ती मार्गदर्शन,माहे जानेवारी२०२६ चे मासिक नियोजन यावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरीता मुठाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन खल्लार येथे नव्याने रुजू झालेले स. शिक्षक हिरालाल सोळंके यांनी केले. शिक्षण परिषद मध्ये सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला व शिक्षण परिषदेची सांगता वंदे मातरम नी करण्यात आली. अशाप्रकारे गणोरी केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात पार पडली.या शिक्षण परिषदला गणोरी केंद्रातील मुख्याध्यापक,शिक्षक उपस्थित होते. सर्वांनी उत्तम सहकार्य केले.असे प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

### युवकावर अस्वलीचा हल्ला; युवक गंभीर जखमी

चिखलदरा - तालुक्यातील कोटमी परिसरात शेतात काम करत असताना २३ वर्षीय बलराम बिसराम कास्देकर या युवकावर अस्वलीने अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. सकाळी १० ते १०:३० वाजताच्या सुमारास दाट कडब्यात दबा धरून बसलेल्या अस्वलीने मागून झडप घालत युवकाच्या चेहऱ्यावर व पायांवर हल्ला केला.जीव वाचवण्यासाठी युवकाने आरडाओरड करत प्रतिकार केला, त्यानंतर अस्वली पळून गेली. मात्र या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला.

### शेताजवळ, बोलेरो सेव्हन सीटर प्रवासी वाहन पलटी

**चांदूर बाजार - १९** डिसेंबरला सकाळी सात वाजता पिंपरी गणेशपुर मार्गावरील पाटेकर यांचे शेताजवळ, बोलेरो सेव्हन सीटर प्रवासी वाहन पलटी झाल्याचे आढळून आले असून, या मार्गावरून ये जा करणाऱ्या नागरिकांनी पिंपरी येथील पोलीस पाटील पांडव यांना याबाबतीत माहिती दिल्यावर, पिंपरी येथील पोलीस पाटील पांडव तथा गणेशपुरचे पोलीस पाटील कुलदीप देशमुख यांनी घटनास्थळावर पोहोचून, घटनेची माहिती मोर्शी पोलीस स्टेशनला देण्यात आली आहे.

## तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयात 'मानसिक आरोग्य' विषयावर व्याख्यान

**अमरावती-**श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालय, दारापूर येथे शासनमान्यताप्राप्त रेड रिबन क्लब आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमानाने विद्यार्थ्यांसाठी 'मानसिक आरोग्य' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी डिप्रेशन (उदासीनता), अँक्साईटी (चिंता), स्ट्रेस आणि बायपोलर



डिसऑर्डर यांसारख्या गंभीर समस्यांची कारणे व त्यावरील उपाययोजनांवर सखोल प्रकाश टाकला. मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना नियमित व्यायाम आणि योगासने करणे, संतुलित आणि पौष्टिक आहार घेणे,किमान ७ ते ८ तासांची पुरेशी झोप घेणे, मित्र आणि कुटुंबाशी संवाद कायम ठेवणे. त्यांनी वेळेचे योग्य नियोजन करा, छंद आणि आवडीच्या गोष्टींना वेळ द्या, नकारात्मक विचारांपासून दूर राहा. या बाबींवर भर दिला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. अधिकारी प्रा. डॉ. संतोष यावले यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. अपेक्षा इंगळे यांनी केले. उपस्थितांचे आभार इस्टेट मॅनेजर मुकेश बनसोड यांनी मानले. कार्यक्रमाचे वृत्तांकन सहाय्यक ग्रंथपाल देवेंद्र चोरे यांनी केले.या कार्यक्रमाला प्रा. डॉ. एस. टी. वरघट, प्रा. डॉ. निलेश घोटकर, प्रा. पूजा देशपांडे, प्रा. पी. एस. दंडे, प्रा. अतुल कौशल, प्रा. अतुल चिंचमलातपुरे, प्रा. ए. एस. बोंबटकर, प्रकाश मोहोड, प्रा. गौरी गुल्हाने, प्रा. मेघा चिंचमलातपुरे, प्रा. ए. एन. कोरडे, सागर निर्मळ कार्यालय अधीक्षक अर्पित काळमेघ, यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सोनेगाव खर्डा येथे संताजी महाराज जयंती

**अमरावती-**सोनेगाव खर्डा येथे तेली समाजातर्फे संत श्री संताजी जगनाडे महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. समाजातील एकता टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून धनंजय शेलोकार, कृष्णा बोडणे, नारायण रघुते, निलिमा वरटकर, तुकाराम वरटकर, रघुनाथ चकोले, जयश्री शेलोकार आदी लाभले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व श्री संत संताजी महाराज व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमांना हार अर्पण करून झाली.

कार्यक्रमात प्रारंभी धनंजय शेलोकर यांनी मत मांडले. तर कृष्णा बोडणे यांनी समाजकारण आणि राजकारण या दोन्हीचा मेळ साधण्याचे उपस्थितांना आव्हान केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन ॲड. चैत्राली कारंजेकर बोडणे यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने तेली समाज बांधव उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोपाल रघुते, योगेश सावरकर, सुमीत रघूते, भूषण शेलोकार, प्रदीप बोडणे, सूरज बोडणे, राहुल बोडणे, शुभम शेलोकार, तेजस वैद्य, हरी गभणे, लोकेश सावरकर, मंथन सावरकर, प्रविण पिसे आदींनी परिश्रम घेतले.

## कुऱ्हा-मारडा-मार्डी केंद्र अंतर्गत विद्यानिकेतन विद्यालयात सांस्कृतिक महोत्सव

**कुऱ्हा/ वार्ताहर**

कुऱ्हा परिक्षेत्रस्तरीय जि.प. प्राथमिक शालेय क्रिडा व सांस्कृतिक महोत्सव घेण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांचे विद्यानिकेतन व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थीनी कुऱ्हा जि.प.मराठीशाळा लेझीम पथकाद्वारे कुंकुम तिलक लावून स्वागत करण्यात आले.

यावेळी झालेल्या सामन्यापूर्वी निदर्शने व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये कुऱ्हा प्रा.म.शाळा, मुर्तिजापूर तरोडा, बोर्डा, दिवानखेड, विरगव्हाण या शाळांनी उत्कृष्ठ कार्यक्रम सादर केले.तसेंच कुबड्डी, खो खो, लंगडी, व्हॉलीबॉल, बॅडमिटन, टेनिक्वाईड, या सांघिक खेळासह वैयक्तीक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना गटशिक्षणाधिकारी डॉ. नितीन उंडे यांनी निदर्शने यात समाजाचे प्रतिबिंब विद्यार्थ्यांनी अधारोरेखीत केल्याचे सांगितले. यावेळी मंचावर उपस्थित महोत्सवाच्या उदघाटिका म्हणून मिना सुनिल नायर ग्रा.प. सरपंच कुऱ्हा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नितीन उंडे गटशिक्षणाधिकारी प.स. तिवसा, प्रमुख अतिथी म्हणुन सलीम खाँ रहेमान खाँ ग्रा.प.उपसरपंच कुऱ्हा, सुरेश सपाटे अध्यक्ष व्य.स.जि.प.




मराठी शाळा कुऱ्हा, अ.सईद अ. हाफीज अध्यक्ष प्रा.व मा उर्दू शाळा कुऱ्हा, नलिनी कन्नाके मुख्याध्यापिका विद्यानिकेतन व उच्च माध्यमिक विद्यालय कुऱ्हा, अशोक पवार (पत्रकार कुऱ्हा) सुनिल गवळी, शिक्षण विस्तार अधिकारी प.स. तिवसा, चंद्रशेखर रामटेके शिक्षण विस्तार अधिकारी प.स.तिवसा,अतुल देशमुख (गट समन्वयक) यांची उपस्थिती होती.

वरील शालेय क्रीडी व सांस्कृतिक महोत्सवामध्ये वेलकम १, सांस्कृतिक २, निदर्शने ३, सांघीक व वैयक्तीक प्राथमिक विभाग मुले व मुली ११, सांघिक खेळ माध्यमिक विभाग मुले-मुली २२, व वैयक्तीक अशा सहभागी ३०० कुऱ्हा परिक्षेत्रिय सामाविष्ट केंद्र मुख्याध्यापक व शिक्षक ८८, यात कुऱ्हा-मारडा-मार्डी यांचा सहभाग होता.या कार्यक्रमाचे संचालन प्रास्ताविक रविंद्र तायडे केंद्रप्रमुख कुऱ्हा) यांनी केले, तर संचालन दिनेश पाटील आणि आभार प्रदर्शन सरिता काठोळे (केंद्र प्रमुख मार्डी) यांनी केले. क्रिडा महोत्सवासाठी नितीन कांबळे केंद्रप्रमुख मारडा, नंदकिशोर कळसकर मुख्याध्यापक प्रा.म शाळा चेनुष्ठा, देवेंद्र फड मुख्याध्यापक प्रा.म.शाळा कुऱ्हा सुनिल सुने, तेहसीम , मनोहर चव्हाण सर्व शिक्षक शिक्षिका विशेष परिश्रम घेतले.

## फुले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादरकेला आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध



**अमरावती-**स्थानिक महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती येथील मानसशास्त्र विभागाचे एम. ए. भाग दोनचे विद्यार्थी मनस्वी रोहणकर व युवराज तायडे यांनी जयपुर, राजस्थान, येथे इंडियन ॲकॅडमी ऑफ हेल्थ सायकॉलॉजी द्वारा आयोजित दहाव्या आंतरराष्ट्रीय परिषदेत The Relationship Between Chronotype, OnFOMO, Absent-Minded Social Media Scrolling and Digital Burnout Among Young Adults. या विषयावर यशस्वीरित्या शोधनिबंध सादरीकरण केले.

याप्रसंगी आंतरराष्ट्रीय परिषदेस मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले फ्रान्स येथील प्रि - नॅटल सायकॉलॉजिस्ट डॉ. फ्रेंशॉ गारलँड व डॉ.जुली गारलँड तसेच स्वीडन येथील हेल्थ सायकॉलॉजिस्ट डॉ. लीना ख्रिस्तीना यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यां सोबत विशेष संवाद साधला वत्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या संशोधन कार्यास प्रोत्साहन दिले. त्यामध्ये प्रामुख्याने डॉ. श्रीकांत देशमुख, प्रा.डॉ.शंकर वाकोडे, डॉ.रोहित देशमुख, डॉ. पंकज वसाडकर यांनी विद्यार्थ्यांनांचे कौतुक केले तसेच या शोधनिबंधा करिता नागपूर येथील हिस्लॉप कॉलेजचे माजी मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हेमंत यावलीकर यांनी सुद्धा विशेष मार्गदर्शन केले महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधून आंतरराष्ट्रीय स्तरावर शोधनिबंध सादरीकरणाची सुरुवात या विद्यार्थ्यांनी केली.

याशिवाय यापूर्वी हैदराबाद येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेत देखील या विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केला होता. याकरिता शैक्षणिक बाबींमध्ये महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचाल्याबाद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.मीनल भोंडे

तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पोटे अभियांत्रिकीच्या संगणक विज्ञान व अभियांत्रिकी व आर्टीफिशीअल इंटेलिजन्स व डेटा सायन्स विद्यार्थ्यांची इंडस्ट्री भेट

**अमरावती/ का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप च्या अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील संगणक विज्ञान व अभियांत्रिकी (CSE) तसेच आर्टीफिशीअल इंटेलिजन्स व डेटा सायन्स (AI & DS) विभागातील विद्यार्थ्यांनी नुकताच इन्फोसेप्ट (InfoCepts Technologies Pvt. Ltd.), नागपूर येथे शैक्षणिक उद्योग भेट दिली.

या उद्योग भेटीत संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागातील ३० विद्यार्थी तसेच आर्टीफिशीअल इंटेलिजन्स व डेटा सायन्स विभागातील १८ विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना आयटी उद्योगातील



प्रत्यक्ष कार्यपद्धती, आधुनिक तंत्रज्ञान व व्यावसायिक वातावरणाची सखोल माहिती मिळाली.इन्फोसेप्ट कंपनीतील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना डेटा ॲनालिटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट प्रक्रिया व करिअर संधी याविषयी मार्गदर्शन केले. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या उद्योग भेटीचे प्रमुख (Tour Incharge) म्हणून प्रा. एम. के. निचत (संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभाग) व प्रा. एस. एस. सगणे (आर्टीफिशीअल इंटेलिजन्स व डेटा सायन्स) यांनी जबाबदारी पार पाडली.

सदर उपक्रमाला संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. विजय गडिचा तसेच आर्टीफिशीअल इंटेलिजन्स व डेटा सायन्स विभागप्रमुख डॉ. अजय गडिचा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.अशा उद्योग भेटींमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो व उद्योगाभिमुख शिक्षणास चालना मिळते, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी इन्फोसेप्ट व्यवस्थापनाचे आभार मानण्यात आले.

### वाघोली येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन

**शिराळा-** नजिकच्या वाघोली येथे संत गाडगेबाबा पुण्यतिथी महोत्सव व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिनानिमित्त सामाजिक धार्मिक सांस्कृतिक प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २० डिसेंबर ला भंन्ते प्रज्ञाबोधी, भंन्ते करुणाबोधी डवरगाव, भंन्ते करुणाप्रिय नांदुरा पिंगळाई यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात येईल. कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा अमरावती जिल्हा सरचिटणीस गणपतराव तिडके राहतील, राहुलभाऊ मेश्राम तसेच स्वागताध्यक्ष व आयोजक संत कबीर संस्था वाघोली अध्यक्ष नंदकुमार खंडारे हे करतील तर प्रमुख मार्गदर्शक बुध्दीट पर्सनल



लॉ विदर्भ अध्यक्ष मनोजभाऊ छापाणी, आदिवासी सामाजिक कार्यकर्ते मनिष धुर्वे, संजय चोरपगार, प्रकाश इंगळे, कैलास पाटील, सालोरा सरपंचा बबता हरडे, ग्रामविकास अधिकारी वाघोली राजेश इंगळे, वाघोली सरपंचा मनिषाताई बारबुध्दे, वाघोली उपसरपंच रविभाऊ चव्हाण, कवी व गायक बुध्दभुषण खंडारे, आदी उपस्थित राहतील रात्री बुद्ध भिम गिताचा बहारदार कार्यक्रम राहिल. तरी परिसरातील बौद्ध उपासक उपासिका व सर्व नागरिकांना लाभ घ्यावा अशी आयोजकांनी विनंती केली आहे.

# भरदिवसा युवकाची निर्घृण हत्या

## खुनाचा रक्तरंजित बदला; घटनेनंतर चार आरोपी पसार

**बोरनदी धरणाच्या प्रवेशद्वारा वरील घटना**





**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** वाळकी रोडस्थित बोरनदी प्रकल्पाच्या प्रवेशद्वारासमोर शुक्रवारी (दि.१९) दुपारी ३:३० वाजताच्या सुमारास चार हल्लेखोरांनी मिळून धारदार शस्त्राने सपासप वार करत एका युवकाची निर्घृण हत्या केली.या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.हत्या झालेल्या युवकाचे नाव मन्या उर्फ मंथन रवींद्र पाळनकर (वय १७) रा.शिलांगण रोड, सातुर्णा, अमरावती असे आहे.मन्या उर्फ मंथन हा काही महिन्यांपूर्वी अमरावतीत झालेल्या यश रोडगे हत्याकांडातील आरोपी असल्याचे समजते.

आठ दिवसांपूर्वी गुन्हे शाखेने मंथन ला एका प्रकरणात अटक केली होती. त्यांनतर तो जमानत वर बाहेर आला होता. शुक्रवारी सकाळी घटनेतील ☞(पान २ वर)

### आरोपींच्या दिशेने पथक रवाना-

मन्या उर्फ मंथन पाळनकर याच्या हत्येची माहिती मिळताच पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू करण्यात आला. मंथन ज्या वाहनाने घटनास्थळी आला होता त्या वाहनाच्या आधारे मालकाची माहिती घेऊन तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली आहेत.तसेच हत्या करणाऱ्या आरोपींचा माग काढण्यासाठी विशेष पथक तयार करून त्यांच्या संभाव्य दिशेने रवाना करण्यात आले आहे. पोलिसांकडून तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू असून लवकरच या हत्याप्रकरणातील आरोपींना अटक करण्यात येईल. **-दिनेश दहातोंडे** वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पो.स्टे. नांदगाव पेठ

# भरधाव ट्रकची दुचाकीला धडक

## चालकाचा मृत्यू, पत्नी गंभीर

**मोर्शी/प्रतिनिधीः** मोर्शी ते वरुड रोडवर भरधाव येणाऱ्या एका ट्रकने मोटर सायकल स्वाराला जोरदार धडक दिली. या अपघातात मोटर सायकल चालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला असून त्यांची पत्नी गंभीररित्या जखमी आहे. ही घटना आज दि.१९ डिसेंबर रोजी हिवरखेड फाट्यानजीक सायंकाळी ५ वाजताचे सुमारास घडली.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, बद्रीनाथ रूपसा मसराम (वय ३५ वर्ष रा.जापका तालुका प्रभात पट्टन) व त्यांची पत्नी ज्योती बद्रीनाथ मसराम (वय ३०) हे दांपत्य शेंदुरजना बाजार येथून काम आटोपून आपली मोटर सायकल क्र.एम एच ४० जी ५५ ५७ ने आपल्या गावी जापका येथे मोर्शी/हिवरखेड मार्गे जात होते. दरम्यान समोरून वरुड येथून मोर्शीकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या एलपी ट्रक क्र.एम एच ४० सीडी ३४३४ ने त्यांना जबर धडक दिली.या अपघातात



मोटर सायकल चालक बद्रीनाथ मसराम यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांची पत्नी गंभीररित्या जखमी झाली.लगेच स्थानिकांनी जखमी महिलेला प्राथमिक आरोग्य केंद्रात भरती केले असून बद्रीनाथचा मृतदेह उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील शवागारात ठेवण्यात आला आहे.या घटनेची माहिती मोर्शी पोलिसांना प्राप्त होताच मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले ☞(पान २ वर)

# प्रलंबित मागण्यासाठी शेकडो ग्रामस्थांची सामदा ग्रामपंचायतवर धडक

**तणावाचे वातावरण, घटनास्थळी पोलिस दाखल**

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील सामदा ग्रामपंचायत कार्यालयावर आज शुक्रवारी (दि.१९) दुपारी बारा वाजताच्या सुमारास शेकडो ग्रामस्थांच्या आक्रोश मोर्चाने धडक दिली. यामुळे काही वेळ ग्रामपंचायत परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर दर्यापूर पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता.गेल्या कित्येक वर्षापासून ग्रामस्थांच्या



विविध समस्या प्रलंबित आहेत. ग्रामपंचायतला वारंवार तक्रारी देऊन सुद्धा ग्रामपंचायतने ग्रामस्थांच्या घरकुल,शेत रस्ते, गावठाण जमिनीचा मुद्दा याचा निर्णय लावला नाही.त्यामुळे आज सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर चौरपगार यांच्या नेतृत्वात ग्रामपंचायतवर आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. विशेष म्हणजे ग्रामपंचायत कार्यालयातूनच गावातील गावठाण जमिनी संदर्भात दस्तावेत गहाळ झाल्याने हा मुद्दा चांगला तापल्याचे पाहायला मिळाले. प्रभाकर चौरपगार यांनी यासंदर्भात सरपंच व ☞(पान २ वर)

# २० तासानंतर आढळला ओम चा मृतदेह

## जिल्हा शोध व बचाव पथकाला यश, -तिवसा येथील कालव्यात घडली होती घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा ते सातरगाव मार्गावर असलेल्या कालव्यात काल (दि.१८) ११:३० वाजताच्या सुमारास २१वर्षीय ओम अरविंद सहारे (रा.अमरावती) हा तरुण आपल्या वडिलांच्या समोरच पाय घसरून वाहून गेल्याची घटना घडली होती.

आज (दि.१९) सकाळी ८:३०वाजताच्या दरम्यान घटनास्थळापासून काही अंतरावर जिल्हा शोध व बचाव पथकाला ओमचा मृतदेह सापडला. तिवसा उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छदान करून मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला.



यावेळी रुग्णालयात नातेवाईकांसह मित्रांची मोठी गर्दी झाली होती.

वडिलांसोबत कामाची साईड पाहायला आलेला ओम हा कालव्यावर पाय धुण्यासाठी गेला होता. दरम्यान त्याचा पाय घसरून तो कालव्यात पडला.वडिलांनी जोरजोरात मदतीकरीता हाक दिली मात्र तोपर्यंत ओम हा बऱ्याच लांब वाहून गेला.

त्यामुळे वडिलांनी एकच हंबरडा फोडला. दरम्यान घटनेची माहिती मिळताच (दि.१८) सायंकाळी ५वाजेपर्यंत जिल्हा शोध व बचाव टीमने जवळपास आठ किलोमीटर पर्यंत शोध मोहीम राबविली. मात्र कालव्यातील पाण्याची पातळी जास्त असल्यामुळे ओम मिळून आला नाही.

आज पाण्याची पातळी कमी होताच सकाळी ओमचा घटनास्थळापासून तीनशे मीटर अंतरावर मृतदेह आढळून आला. जिल्हा शोध व बचाव पथकात गजानन वाडेकर,सचिन धरमकर, विशाल निमकर,आकाश निमकर, सुमित बांबल यांच्या समवेत आपदा मित्र संदीप दाहाट यांनी मदतकार्य केले.

# मनपा निवडणूकीसाठी आचारसंहिता कक्ष स्थापन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, मतमोजणीच्या निकालापर्यंत महानगरपालिका कार्यक्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात आदर्श आचारसंहिता उल्लंघनासंबंधी तक्रारी नोंदविण्यासाठी तसेच त्यावर तात्काळ व आवश्यक कार्यवाही करण्यासाठी आचारसंहिता कक्षाची स्थापना केली आहे. या कक्षाच्या प्रमुखपदी राम लंके उपजिल्हाधिकारी मो.क्र.८८८८३५२८०० यांची नियुक्ती करण्यात आली असून, नागरिक व राजकीय पक्षांनी आचारसंहिता उल्लंघनाबाबतच्या तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर तक्रारी आचारसंहिता कक्ष मध्य झोन क्र.२ राजापेठ, अमरावती महानगरपालिकेची इमारत, पहिला मजला येथे करता येणार आहे. निवडणूका मुक्त, निष्पक्ष व शांततापूर्ण वातावरणात पार पडाव्यात, यासाठी नागरिकांनी व राजकीय☞(पान २ वर)

# दर्यापूर पंचायत समितीत कायमस्वरूपी गटविकास अधिकारी नाही

## कारभार प्रभारी अधिकाऱ्यांच्या भरवश्यावर

**-कर्मचाऱ्यांच्या मनमानीने जनता त्रस्त**

**-घरकुल विभागातील कर्मचारी करतात पैशाची मागणी!**

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर पंचायत समितीमध्ये बरेच महिन्यापासून कायमस्वरूपी गटविकास अधिकारी नियुक्त नसल्याने संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा ढिसाळ झाली आहे.पंचायत समिती सारख्या महत्त्वाच्या संस्थेचा कारभार सध्या फक्त प्रभारी गटविकास अधिकाऱ्यांच्या भरवश्यावर सुरू असून याचा फटका ग्रामिण भागातील सामान्य नागरिकांना बसत आहे. कायमस्वरूपी प्रमुख




अधिकारी नसल्यामुळे पंचायत समितीतील काही कर्मचारी मनमानी हलगर्जी आणि बेजबाबदारीचे वर्तन करत असल्याचे वारंवार दिसून येत आहे. नागरिकांच्या विकास कामाचे प्रस्ताव, ग्रामपंचायतीच्या फाईल्स, योजनाचे अर्ज हे आठवडे -आठवडे प्रलंबित राहत असून कार्यालयात गेल्यावर नागरिकांना अधिकारी उपलब्ध नाहीत तुमची फाईल साहेबांच्याकडे पाठविली आहे, अशी उत्तरे मिळतात. प्रभारी गटविकास अधिकारी स्वतः प्रयत्नशील असले तरी प्रभारी पदांची मर्यादा अतिरिक्त जबाबदाऱ्या आणि अधिकाऱ्यांचा अभाव यामुळे पंचायत समितीवर आवश्यक ते नियंत्रण ठेवता येत नाही. परिणामी काही कर्मचाऱ्यांना शिस्त लावणे कठीण झाले असून याचा गैरफायदा घेत कार्यालयीन कामकाजात अनागोंदीपणा निर्माण झाला आहे. ग्रामिण विकास पाणीपुरवठा स्वच्छता, मनरेगा, प्रधानमंत्री ☞(पान २ वर)

# दारू पिऊन शिवीगाळ केल्याच्या कारणावरून वृद्धाची हत्या

## -तीन आरोपी अटक; ब्राह्मणवाडा थडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**बेलोरा/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार तालुक्यातील ब्राह्मणवाडा थडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घाटलाडकी येथे दारू पिऊन शिवीगाळ केल्याच्या कारणावरून ६६ वर्षीय वृद्धाची काठी व लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून हत्या केल्याची घटना घडली आहे. महादेव बारकाजी कुरवाडे (वय ६६) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. काल दुपारी ते दारूच्या नशेत शिवीगाळ करत असल्याने शेजारी राहणारे अनिल चैत्राम कुरवाडे, संतोष शंकरराव कुरवाडे व प्रकाश गणपतराव कुरवाडे यांनी त्यांना काठी तसेच लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत महादेव कुरवाडे गंभीर जखमी झाले. जखमी अवस्थेत त्यांना मुलगा सतीश महादेवराव कुरवाडे यांनी ग्रामीण रुग्णालय, चांदूरबाजार येथे दाखल केले.☞(पान २ वर)

# उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे रक्तदान शिबिर

## २५३ रक्तदात्यांचे रेकॉर्ड ब्रेक रक्तदान

**मोर्शी/प्रतिनिधीः-** रक्तदाता संघ मोर्शीच्या वतीने आज दि.१९ डिसेंबर रोजी उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे पार पडलेल्या रक्तदान शिबिरात एकूण २५३ रक्तदात्यांनी रेकॉर्ड ब्रेक रक्तदान करून मोलाचे सहकार्य केले.मोर्शी शहरात रक्तदान चळवळ राबवून जवळपास २६५० व आज २५३ अशा एकूण २९०३ रक्तपिशव्या संकलित करण्याचा विक्रम मोडला. सर्वप्रथम उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांच्या




वाढदिवसानिमित्त त्यांनी व त्यांच्या पत्नी यांनी रक्तदान करून रक्तदानाची सुरुवात करण्यात आली.यावेळी महिलांनी सुद्धा रक्तदान करून आपले सामाजिक दायित्व निभावले.जिल्ह्यात अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असून अनेक वेळा अपघात झाल्यास रुग्णाला रक्ताची नितांत गरज भासते तसेच शस्त्रक्रिया करतांना रुग्णाला रक्त मिळविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. प्रसंगी मोठी किंमत☞(पान २ वर)

# प्रभाग क्र.१० बेनोडा - दस्तूर नगरात भाजपाला जोरदार झटका

## अर्चना मनीष पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

**अमरावती/प्रतिनिधी :-** अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीला वेग आला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश संघटक,महासचिव आमदार संजय खोडके यांच्या नेतृत्वावर व कुशल कार्यशैलीवर विश्वास दर्शवून अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश होत आहे. अशातच प्रभाग क्रमांक १० बेनोडा -दस्तूर नगर प्रभागातील भाजपचे कार्यकर्ता मनीष उर्फ



छोटूभाऊ पाटील व त्यांच्या पत्नी अर्चना पाटील यांनी आपल्या समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी पक्षाचे संघटक महासचिव आ.संजय खोडके यांनी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचा दुपट्टा देऊन स्वागत करीत पक्ष प्रवेश केला.

यशोदा नगर भागातील शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीचे घड्याळ बांधले आहे. त्याचवेळी अर्चना मनीष उर्फ छोटू पाटील यांना प्रभाग क्रमांक १० बेनोडा -दस्तूर ☞(पान २ वर)

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वर्धापन दिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रम



**अमरावती/प्रतिनिधीः-** देशातील आघाडीची सार्वजनिक क्षेत्रातील बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या ११५व्या वर्धापन दिनानिमित्त अमरावती क्षेत्रीय कार्यालयाने 'सेवा ही संकल्प' ही संकल्पना राबवत वर्धापन सप्ताह साजरा केला. १५ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या सप्ताहात बँकेने नफ्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचे उत्तम उदाहरण समोर ठेवले आहे.

या उपक्रमाचा मुख्य भाग म्हणून क्षेत्रीय प्रमुख सुनील पांडेय यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेच्या अधिकाऱ्यांनी वलगांव येथील श्री संत गाडगे महाराज परमधाम वृद्धाश्रमाला भेट दिली. यावेळी बँकेच्या ☞(पान २ वर)

# रजनी अंबादे यांच्या 'अमूर्त चित्र' ॲब्स्ट्रॅक्ट आर्ट प्रदर्शनीचे उद्घाटन

## छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पहिल्यांदाच कला प्रदर्शनीचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** जागतिक स्तरावर आपल्या अनोख्या कलेने स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या सुप्रसिद्ध चित्रकार अंबादासजी खोब्रागडे आर्ट फाउंडेशनच्या अध्यक्ष रजनी अंबादे यांच्या 'अमूर्त चित्र' या ॲब्स्ट्रॅक्ट आर्ट प्रदर्शनीचे भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन करण्यात आले.

डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती उत्सवाच्या निमित्ताने डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहातील गॅलरीमध्ये ही प्रदर्शनी सात दिवसाकरिता भरविण्यात आली आहे. निर्मलाताई हर्षवर्धन देशमुख आणि प्रेरणाताई दिलीपराव इंगोले यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रदर्शनीचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी प्रसिद्ध चित्रकार विजय राऊत, आर्किटेक सतीश पिंपळे अकोला, प्रभजीत सिंह बछेर मानद सचिव इंडियन रेड क्रॉस सोसाइटी अकोला, उमेद पंख विश्वासाचे निशुल्क जयपूर फूट वितरणाचे मानद सचिव संदीप पुंडकर, आर्किटेक्ट रामेश्वर मनियार पुणे



आकाश अंबादे, अधिष्ठाता डॉ.ए.टी देशमुख, यांची प्रमुख उपस्थिती होती.या प्रदर्शनीत रजनी अंबादे यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण ॲब्स्ट्रॅक्ट शैलीतून मानवी भावना, जीवनातील संघर्ष, आशा, ऊर्जा आणि अंतर्मनातील भावविश्व प्रभावीपणे मांडले आहे. रंगसंगती, रेषांचा मुक्त वापर आणि कल्पकता यामुळे प्रत्येक चित्र प्रेक्षकांशी थेट संवाद साधताना दिसून येते. असे विचार विजय राऊत यांनी व्यक्त केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी परिषदेने विशेष पुढाकारातून आयोजित केलेल्या या प्रदर्शनीतील प्रत्येक कलाकृती प्रेक्षकांना☞(पान २ वर)

# मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचा दावा खोटा

**निवडणुकी वरून काँग्रेस नेत्यांचा आरोप**

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकी संदर्भात मतदार यादीतील गंभीर अनियमितता व सत्ताधाऱ्यांचा हस्तक्षेप वाढला आहे. निवडणुकांमध्ये पारदर्शकतेबाबतचा मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचा दावा खोटा असल्याचा आरोप काँग्रेस नेता मुन्ना राठोड आणि समीर जवंजाळ यांनी आज शुक्रवार १९ डिसेंबर रोजी झालेल्या पत्रकार परिषदेतून केला आहे.

त्यांनी सांगितले की,



महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तयार करण्यात आलेल्या मतदार यादी बाबत नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे. अंतिम यादी मध्ये मोठ्या प्रमाणावर मतदान वाढलेले आहे. संख्येमध्ये तफावत आहे. बनावट पत्ता, एकाच ठिकाणी शेकडो मतदार आणि आपत्ती असूनही कोणताही बदल केल्या गेल्या नाही. ही प्रक्रिया लोकशाही साठी घातक आहे. अनेक नागरिकांनी व माजी लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेले आक्षेप आज ही जसै थे ठेवण्यात आले आहे. राठोड व जवंजाळ ☞(पान २ वर)